म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय चा.वा
दा. क्र. १२५३६



# असे

# बापू

IRBK-0112737

ले. गोपाळ किराणे

# असे होते बापू

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ........ ........ ... दि ........
क्रमांक........ ........नोंद दि...........

लेखक : गोपाळ किराणे
एम. ए., एम्. एड्.

आनंदवन प्रकाशन

IRBK-0112737
IRBK-0112737

मूल्य रु. ३

प्रकाशक
सौ. निर्मला गोपाळ किराणे
आनंदवन प्रकाशन,
सी/२३, अल्ट्रा सोसायटी,
माहीम, मुंबई–१६

●

सर्व हक्क स्वाधीन

●

प्रथमावृत्ती विजयादशमी–१९६९

●

मुद्रक :
बॉम्बे पेपर स्टेशनरी
के. एस्. ए. बिल्डींग,
भवानी शंकर रोड, मुंबई २८.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ...१२८३५... दि ...............
वि. ......८१.१:८१ क्र. ...................

महात्मा गांधींच्या

पवित्र स्मृतीस

सादर समर्पण

# अनुक्रमणिका


१ जन्म, बालपण व शिक्षण

२ दक्षिण आफ्रिकेतील कार्य

३ गुरू-शिष्य

४ राजकारणात पदार्पण

५ असहकार व दांडीयात्रा

६ म. गांधींचे आश्रमातील जीवन

७ म. गांधींचे कौटुंबिक जीवन

८ गांधीजींचे उपवास

९ गांधीजींची प्रभावळ

१० चलेजाव

११ गांधीजींचे विधायक कार्य

१२ अखेरचे दिवस

१३ असे स्मरूया गांधीजी

मराठी ... ग्रंथालय शाखा
अ. ६०६४६ ख्या. वा.
३४९६ १८।११।८९

प्रकरण पहिले

# जन्म-बालपण व शिक्षण

## असामान्य विभूती

२ ऑक्टोबर १८६९ या दिवशी भारतमाता धन्य झाली! एका श्रेष्ठ विभूतीला जन्म देण्याचे भाग्य तिला या दिवशी लाभले! पोरबंदर गावी याच दिवशी मोहनदास गांधींचा जन्म झाला. या मोहनदासने आपल्या आचार विचाराने सर्व जगात एक वेगळे मानाचे स्थान मिळविले. साधी राहाणी आणि उच्च विचारसरणी या उक्तीचे गांधी हे मूर्तिमंत प्रतीक होते! त्यांनी मांडलेले विचार सरळ सोपे पण प्रत्येक व्यक्तीच्या अन्तःकरणाला भिडणारे होते. त्या विचारांचे आचरण करण्यात गांधींची हयात गेली. म. गांधींचा जन्म एका सामान्य कुटुंबात एक सामान्य व्यक्ती म्हणून झाला. ते आपल्या विचारांनी आणि कृतींनी असामान्य बनले.

## २ : असे होते बापू

गांधीजी सत्य मार्गी होते. अहिंसा हे त्यांचे ब्रीद होते. माणुसकीवर त्यांची अढळ श्रद्धा होती. प्रेमाने हृदयपरिवर्तन होऊ शकते यावर त्यांचा विश्वास होता. त्यांच्यात कोणतेहि दोष नव्हतेच असे नाही पण या दोषांशी त्यांनी निकराचा सामना दिला. त्यांत अनेकवेळा ते यशस्वी झाले ! आपल्या उणीवा कोणत्या हे त्याना माहीत होते. आपली चूक उघडपणे बोलून दाखवि-ण्याचा मनाचा मोटेपणा त्यांच्या-जवळ निश्चित होता. धाडस होते. सामान्य मोहनदास असामान्य महात्मा कसे झाले ? पोरबंदरची एक सर्वसाधारण व्यक्ती असामान्य विभूती कशी झाली ? हे सर्व समजा-वून घेणे मोटे मनोरंजक व उद्बोधक ठरेल.



### बालपण

मोहनदास करमचंद गांधी यांचे आजोबा उत्तमचंद हे पोरबंदरचे दिवाण होते. वयाच्या पंचविसाव्या वर्षी करमचंद–मोहनदासाचे वडील–दिवाण झाले. उत्तमचंद आणि करमचंद हे दोघेहि अतिशय करारी. त्याच करारीपणाचा, बाणेदारपणाचा आणि स्वाभिमानाचा वारसा मोहनदास यांना मिळाला. मोहनदास विचारपूर्वक एखादी गोष्ट ठरवीत पण एकदा निश्चय झाला की कशाचीहि तमा न बाळगता ती गोष्ट आचरणात आणण्यासाठी प्रयत्न करीत. म. गांधीनीं पुढील जीवनात केलेले सत्याग्रह,

उपवास, अंगिकारलेले कठोर आश्रमी जीवन, या सर्वांची बीजे या त्यांच्या करारी वृत्तीत आढळतात. हा करारी बाणा म्हणजे त्याना वारसा हक्काने मिळालेली एक अभूतपूर्व देणगीच !

'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाउले' या तुकाराम महाराजांच्या विचाराची आठवण म. गांधींचे जीवनचरित्र अभ्यासताना ठायी ठायी होते.

करमचंद राजकोटचे दिवाण होते. म्हणून म. गांधींचे प्राथमिक शिक्षण राजकोटलाच झाले. पुढे तेथील आल्फ्रेड विद्यालयात त्यांनी माध्यमिक शिक्षण घेतले. पण हे शिक्षण घेत असतानाच वयाच्या १३ व्या वर्षी त्यांचेपेक्षा सहा महिन्याने मोठ्या असलेल्या कस्तुरबाशी त्यांचा विवाह झाला. पण दोघांचाही जन्म मात्र इ. स. १८६९ मध्ये पोरबंदर या गावीच झाला होता! विवाहाच्या या गडबडीत मोहन-दासचे शाळेचे एक वर्ष फुकट गेले. ते त्यांनी पुढे एका वर्षात दोन इयत्ता करून भरून काढले.

## कलियुगातील हरिश्चंद्र

माध्यमिक शाळेत शिक्षण घेत असतानाच, मोहनदास यांनी हरिश्चंद्र हे नाटक पाहिले. झाले ! संस्कारक्षम अशा बालमनावर त्याचा खोल परिणाम झाला. या नाटकातील प्रसंगावद्दल ते विचार करीत बसत. स्वप्नात दिलेले वचन खरे करणारा हरिश्चंद्र त्यांना अतिशय प्रिय वाटू लागला. सत्यासाठी आणि न्यायासाठी हरिश्चंद्राने राज्याचा, सर्व सुखोप-भोगाचा त्याग केला. या घटनेचा मोहनदासांच्या मनावर विलक्षण पगडा बसला. सत्यप्रिय हरिश्चंद्र हा त्यांचा आदर्श ठरला. आपणही तसेच सत्यनिष्ठ व्हावे असेही त्यांना वाटू लागले. त्या आदर्शाप्रत जाण्याची

म. गांधींनी आपल्या जीवनात पराकाष्ठा केली ! त्यांना कलियुगातील हरिश्चंद्र असे जर म्हटले तर ते योग्यच ठरेल ! !

मोहनदास स्वभावाने भिडस्त होते. व्यायामाचे, खेळाचे त्यांना फारसे आकर्षण वाटले नाही. पण आपण त्या वयात व्यायाम करावयास पाहिजे होता असे त्यांना नंतर वाटू लागले.

## कवायत चुकली

मोहनदासला व्यायामाची, खेळाची फारशी आवडच नव्हती. व्यायामापेक्षा मोकळ्या हवेत फिरायला जाणेच अधिक योग्य असे मोहनदासने कोठेतरी वाचले होते, त्याचाही परिणाम झाला होता. शिवाय व्यायामाचा तास संध्याकाळी असे आणि तो वडिलांचे सेवेत खंड पाडीत असे. गांधीनी व्यायाम शिक्षक गिमीसाहेब यांच्याकडे सवलत मागितली. पण ती मिळाली मात्र नाही.

एकदा शनिवारी व्यायामाचा तास संध्याकाळी चार वाजता होता. आकाशात ढग होते व हातात घड्याळही नव्हते. तेव्हा मोहनदासाना किती वाजले ते समजले नाही. ते जेव्हा शाळेत पोचले तेव्हा शाळा बंद झाली होती. निराश होऊन ते परतले. दुसरे दिवशी गिमीसाहेबांनी त्यांची हजेरी घेतली. मोहनदासने खरी हकीगत सांगितली पण त्यावर कोणाचाही विश्वास बसला नाही. त्यांना दोन आणे दंड झाला. या दंडापेक्षा गुरुजींचा आपल्यावर विश्वास नाही याचे मोहनदासला फार वाईट वाटले. सत्य बोलणाराने जराही गाफील राहून चालणार नाही याची तीव्रपणे त्यांना जाणीव झाली ! !

शाळेत असताना काही मित्रांच्या संगतीमुळे मोहनदास यांना वाईट सवयी लागल्या. आपल्या आईवडीलांना त्यामुळे वाईट वाटते असे

सजल्याबरोबर त्यांनी त्या सवयी सोडून दिल्या. अगदी कायमच्या !

## मातापित्याची सेवा

मोहनदास यांच्या मनावर पितृभक्त श्रावण याच्या जीवनाचाही परिणाम झाला होता. ते आपल्या आईवडिलांची सेवा अगदी मनोभावे करीत. त्यांच्या आज्ञा पाळत. त्यांना आवडत नसेल अशी गोष्ट करत नसत. त्यांना आईवडिलांचे बद्दल प्रेम आणि आदर वाटे. त्यांची सेवा करण्यात मोहनदास यांना अतिशय आनंद होई.

वडील आजारी होते. मोहनदासने त्यांची पाच वर्षे सेवा केली. पण मोहनदास सोळा वर्षाचे असतानाच त्यांचे वडील निधन पावले. मोहनदासांनी आपल्या जीवनात सेवेला फार महत्व दिले. ही त्यांची पितृभक्ति पुढे देशभक्तीत रुपांतरीत झाली ! या देशसेवेत म. गांधी अगदी रमून गेले. एकरूप झाले !

## अक्षर चांगले असू द्या

शाळेत शिक्षण घेत असताना अक्षर व्यवस्थित काढण्याकडे त्यांचे लक्ष नव्हते. त्यांचे अक्षर वळणदार बनले नाही. पुढे आफ्रिकेत निरनिराळ्या वकिलांची सुंदर अक्षरे पाहिल्यावर त्यांना स्वतःच्या वाईट अक्षराबद्दल दुःख झाले. पश्चात्ताप झाला. पण आता त्याचा काय उपयोग ? म्हणूनच त्यानी पुढे विद्यार्थ्यांना अक्षर वळणदार काढा असा उपदेश केला.

मोहनदास इंग्रजी शाळेत शिकत होता. शाळा तपासनीस आले. इंग्रजीचे पाच शब्द स्पेलिंगसाठी त्यांनी मुलांना सांगितले.

विषय शिक्षक वर्गातून हिंडत होते. मोहनदासचा एक शब्द चुकला आहे हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी मोहनदासला खूण करून शेजारच्या

विद्यार्थ्यांच्या पाटीवरील शब्द पाहून लिहिण्यास इशारा केला. मोहनदासला अशा प्रकारे नक्कल करून लिहिणे योग्य वाटले नाही. मोहनदासने शिक्षकांचा इशारा मानलाच नाही. परिणाम असा झाला की त्यांचे पाचपैकी चार शब्द बरोबर आले. बाकीच्या सर्व विद्यार्थ्यांचे सर्व शब्द बरोबर होते. शिक्षकांनी त्याला 'ढ' म्हटलेच पण त्याचा राग मोहनदासला आला नाही. आपण लबाडी केली नाही याच आनंदात तो मग्न होता!!

बालवयात मोहनदास भित्रा होता. अंधाराचे त्याला फारच भय वाटे. रंभा या त्यांच्या मोलकरणीस मोहनदासचा हा भित्रेपणा आवडत नसे. तिने मोहनला 'तू भीती सोड' असे अनेक वेळा सांगितले पण उपयोग झाला नाही. एकदा ती मोहनदासला म्हणाली, "अंधारातून जाताना तू रामाचे नांव घे. तुला भय वाटणार नाही. तो राम तुझे रक्षण करील. बस्. मोहनदासला एवढे बोलणे पुरे झाले. त्याच्या मनावर मोलकरणीने जे मनापासून सांगितले त्याचा उत्तम परिणाम झाला. आता जेव्हा तो काळोखात जाई तेव्हा रामनाम जपे. याच रामनाम जपातून मोहनच्या मनात ईश्वरावर श्रद्धा निर्माण झाली. या ईश्वरावरील अविचल निष्ठेतून निर्भयतेचा जन्म झाला.

## गांधी बॅरिस्टर झाले

इ. स. १८८७ मध्ये मोहनदास शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाले. विश्वविद्यालयाच्या अभ्यासासाठी ते भावनगर येथील सामळदास कॉलेजमध्ये दाखल झाले. पण लवकरच कॉलेजला रामराम ठोकून ते घरी बसले. इतक्यात बॅरिस्टर होण्यासाठी त्यांनी विलायतला जावे असे ठरले. मुलगा तेथे बिघडेल अशी आईला भीती वाटत होती. पण मोहनदासने

मद्य, मांस इ० स आपण स्पर्शही करणार नाही अशी शपथ घेतली ! भावाने पैशाची व्यवस्था केली आणि गांधींचे विलायतला जाण्याचे निश्चित झाले ! विलायतला जाणारे गांधी हे त्यांच्या जातीमधील पहिलेच ! त्यामुळे त्यांना जातीबाहेर काढल्याचे जाहीर करण्यात आले. जातीने असे वाळीत टाकले तरी गांधी डगमगले नाहीत. ४ सप्टेंबर १८८८ या दिवशी त्यांनी मुंबई सोडली !

लंडनमध्ये डॉ. मेहता यांच्याशी त्यांचा संबंध आला. विलायतेत कसे वागावे या संबंधी डॉ. मेहतांनी गांधींना सूचना दिल्या. मांसाहार करायचा नाही, मद्य घ्यायचे नाही या निश्चयामुळे गांधींना प्रथम उपास घडू लागले. थोड्या दिवसानंतर मात्र शाकाहारी खानावळ त्यांना मिळाली. त्यांची उपासमार थांबली !

गांधी विलायतेत अतीशय काटकसरीने रहात. पैशाचा नीट हिशोब ठेवीत. गैरवाजवी खर्च होणार नाही याची काळजी घेत.

इ. स. १८८९ च्या सुमारास गांधींचा थिऑसॉफिस्ट व्यक्तींशी संबंध आला व त्यामुळेच वेगवेगळ्या धर्मांची माहिती करून घेण्याची त्यांना इच्छा झाली. भगवत्गीतेचे त्यांनी नीट वाचन केले व इतर धर्मांचे तत्वज्ञान अभ्यासले. गांधी इ. स. १८९१ मध्ये बॅरिस्टर झाले.

लंडन मधील मोकळ्या वातावरणाचा गांधींच्या मनावर फार परिणाम झाला. 'आपले आयुष्य जर हिंदुस्थानात जाणार नसेल तर आपण लंडनमध्येच येऊन राहू' असा विचार इंग्लंड सोडताना त्यांच्या मनात आला होता.

## आईचा अंत

गांधी भारतात पाऊल ठेवतात तोच आईच्या निधनाचे दुःखद वृत्त त्यांना ऐकावे लागले ! आईला भेटण्याच्या आतुरतेने ते आले पण घडले मात्र वेगळेच !

गांधींनी आपली वकिली मुंबईस सुरू केली. पण तेथे त्यांचा नीट जम बसेना. गिरगावात त्यांचे बिऱ्हाड होते. तेथून ते कोर्टात रोज चालत जात असत. पण श्रम घेऊनही व्यवसायात जम बसेना म्हणून ते राजकोटला गेले. तेथे त्यांना थोडेफार काम मिळू लागले. इतक्यात दादा अब्दुल्ला आणि कंपनी यांच्या कायद्याच्या कामानिमित्त त्यांना दक्षिण आफ्रिकेत जावे लागले.

## प्रश्न

**प्रश्न १ :** खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या.

१) महात्मा गांधींचा जन्म कोठे झाला ? केव्हा ?

२) महात्माजींचे बालपण कसे गेले ?

३) महात्माजींचा विवाह कोणाबरोबर झाला ?

४) महात्माजींना कवायत कां आवडत नसे ? त्याचा परिणाम काय झाला ?

५) महात्माजींना 'असामान्य विभूती' का म्हणतात ?

**प्रश्न २ :** रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

१) गांधीजींच्या आईचे नाव·········होते.

२) गांधीजी इंग्लंडला·········साठी गेले.

३) गांधीजींनी विद्यार्थ्यांना·········असा संदेश दिला.

४) गांधीजींवर·········च्या जीवनाचा परिणाम झाला.

**प्रश्न : ३** कोणत्याही एकावर ५ वाक्ये लिहा.

१) गांधीजींची पितृभक्ती

२) कलियुगातील हरिश्चंद्र

मराठी ग्रं... वाचनालय शाखा.
अनुक्रमांक ७०६४७ ... ११.११.....
क्रमांक ३६१७ ... १८।११।६९

प्रकरण दुसरे

# दक्षिण आफ्रिकेतील कार्य

द. आफ्रिकेत जाताना गांधींनी आईने दिलेली तुळशीची माळ गळ्यात घातली होती.

द. आफ्रिकेत हिंदी लोकांना फार वाईट रीतीने वागविले जाई. गांधी-नाही त्याचा अनुभव आला. कोर्टात गेल्यावर त्याना प्रथम डोक्यावरील फेटा काढून टाकण्यास सांगितले ते गांधींनी नाकारले. ते कोर्टाबाहेर पडले 'नको असलेला पाहुणा' या शब्दात वृत्तपत्रातून त्यांच्यावर टीका झाली.

नाताळात दीड लाख हिन्दी रहिवासी होते. त्यांना 'जंगली' या नावाने इंग्रज संबोधीत. हिंदी लोकात एकी नव्हती. मजूर वर्गाची स्थिती फार वाईट होती. गांधींना ते लोक हमाल वकील म्हणत. परंतु गांधींना त्याचे वाईट वाटत नसे तर उलट अभिमान वाटत असे.

१० : असे होते बापू

## सामानासकट बाहेर फेकले !

गांधी मॉरिसबर्गहून आगगाडीने प्रथम वर्गातून प्रिटोरिया येथे जाण्यास निघाले. परंतु रेल्वे अधिकाऱ्याने त्यांना डब्यातून उतरण्यास सांगितले. गांधीनी ते मानले नाही. रेल्वे अधिकाऱ्यानी त्याना सामानासकट डब्याच्या बाहेर फेकले. एखादा सामान्य माणूस याप्रकाराने घाबरला असता ! मायदेशी निघून गेला असता ! पण गांधी हे धीट होते. येईल त्या प्रसंगाला तोंड देण्याची हिंमत त्यांचेजवळ होती. परमेश्वरावर श्रद्धा ठेवून गांधींनी तेथेच राहण्याचा निर्धार केला. गांधींनी झाल्या प्रसंगाबद्दल रेल्वे मॅनेजर-कडे तक्रार केली पण त्याचा काही उपयोग झाला नाही. अखेरीस ते प्रिटोरियास पोचले. तेथील वकील बेकर गांधींशी फार प्रेमळपणे वागले. बेकरनी गांधींची बाजू घेतली पण त्यांच्या अंतरि कोऽपि हेतु होता ! बेकरना वाटले गांधींना ख्रिश्चन करून घेता येईल. अर्थातच त्या प्रयत्नात बेकर यांच्या पदरी निराशाच आली !

गांधींनी दक्षिण आफ्रिकेत हिंदी लोकांची सभा घेतली. तेथे त्यांनी सत्यपालनाचा सर्वांना आग्रहाने उपदेश केला. आपण सर्व हिंदी आहोत. सर्वांनी एकत्र येऊन प्रसंगाला तोंड देणे जरूर आहे असे त्यांनी सांगितले. गांधी असेही म्हणाले की शितावरून भाताची परीक्षा केली जाते. त्या प्रमाणे तुमच्या येथील वर्तनावरून भारतामधील हिंदी लोकांची परीक्षा केली जात आहे. तरी आपण सर्वांनी हे लक्षात घेऊ-नच वागले पाहिजे !

प्रिटोरियात गांधींच्या मनात हिंदू धर्माबद्दल आस्था वाढली. त्यांचा आत्मविश्वास वाढला. ज्या अबदुल्ला आणि कंपनीच्या कामानिमित्त ते दक्षिण आफ्रिकेत आले होते त्या केसमध्ये कोर्ट दरबार करीत राहिल्यास

फार नुकसान होईल असे वाटल्यावरून त्यांनी त्या कंपनीस तडजोडीचा सल्ला दिला. हा मध्यम मार्ग त्या कंपनीसहि पसंत पडला व तो त्यांनी मानला.

गांधींचे काम संपले. ते भारताकडे जाण्याच्या तयारीस लागले. इतक्यात नाताळमध्ये हिंदी लोकांच्या विरूद्ध अनेक कायदे केले जाणार असून त्यांचे नागरिकत्वही नष्ट केले जाणार आहे अशी बातमी पसरली. तेव्हा नाताळमधील हिंदी लोक म्हणाले "गांधी, येथे जुलमी कायदे होणार असे दिसत आहे तेव्हा तुम्ही भारताकडे परत जाण्याचा बेत सध्या रद्द करा."

गांधींनी उत्तर दिले, "येथे भारतीयाच्यावर अन्याय होत आहे असे स्पष्ट दिसत असता मी परत भारताकडे जाईनच कसा." नाताळमधील हिंदी लोक म्हणाले, "गांधी तुम्ही येथे राहावे असे आम्हाला फार वाटते पण तुमची फी कोण देणार?"

गांधी म्हणाले, "हे सार्वजनिक काम आहे. येथे फीची मुळी जरूरच नाही"

हिंदी लोकांनी विचारले, "मग येथे जो आपणास खर्च येईल त्याचे काय? व कोर्टात व इतरत्र कामे करावी लागतील त्याच्यासाठी पैसे कोठून आणायचे?"

गांधी म्हणाले, "या सर्व कार्यासाठी खर्च तर निश्चितच लागणार आहे. तेव्हा आपण फंड उभा करू या. अशाप्रकारे पैसे जमा करू या. या पैशातून लागणारा खर्च भागवू म्हणजे झाले. आणखी एक काम आपणास करावे लागेल. ते म्हणजे हे काम करण्यासाठी अनेक माणसे तयार केली पाहिजेत."

इतके बोलणे झाल्यावर गांधींनी तेथे राहाण्याचे मान्य केले.

हिंदी लोकांचे नागरिकत्व नष्ट करणारा कायदा स्थगित करावा, त्यावर असेंब्लीमध्ये चर्चा होऊ नये अशा आशयाची तार गांधींनी तेथील स्पीकरला केली तेव्हा दोन दिवस चर्चा तहकूब केली. नंतर दहा हजारावर हिंदी लोकांच्या सह्या घेऊन एक अर्ज वसाहत मंत्री लॉर्ड रिपन यांचेकडे पाठविला. त्यांनीही याकडे सहानुभूतीने पाहिले व हा कायदा न करण्याचा निर्णय घेतला.

या सर्व घडामोडींच्यामुळे आपण हिंदी सगळे एक आहोत ही भावना निर्माण झाली. एकजुटीने उभे राहिल्यास अन्यायाविरुद्ध यशस्वी प्रतिकार करता येतो याची जाणीव झाली व त्याचा फायदा घेऊन गांधींनी 'नाताळ इंडियन काँग्रेस' ही संस्था २२ मे १८९४ रोजी स्थापन केली. हिंदू, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन असे सर्व या काँग्रेसमध्ये एकत्र आले.

## भारतात परतल्यावर

गांधी १८९६ मध्ये कस्तुरबा व मुले यांना घेऊन भारतात आले. भारताच्या लोकांना द० आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या स्थिती विषयी माहिती व्हावी म्हणून गांधींनी 'हिरवी पुस्तिका' या नावाची एक पुस्तिका प्रसिद्ध केली. या पुस्तिकेवर लोकांच्या उड्या पडल्या. द० आफ्रिकेतील हिंदी लोकांची कहाणी त्यात उत्तम रीतीने सांगितली होती. भारतात त्यावेळी राजकोट व त्याच्या आसपास प्लेग उद्भवला. गांधींनी लगेच स्वच्छता मोहीम हाती घेतली. त्या कामासाठी ते झटू लागले. नंतर मुंबईस येऊन त्यांनी डॉ. भांडारकर, न्या. रानडे, फिरोजशहा मेहता इत्यादींच्या गाठी घेतल्या. त्यांच्याहि कानावर त्यांनी दक्षिण आफ्रिकेतील लोकांच्या दयनीय स्थितीची हकिगत घातली.

## परत द. आफ्रिकेत

भारतात हिंडून येथील परिस्थितीही ते पाहू लागले. इतक्यात द. आफ्रिकेत गांधीना तेथील जनतेने परत बोलाविले. मग गांधी पत्नी मुलासह आफ्रिकेत जाण्यास निघाले.

गांधींनी आफ्रिकेत न जाता भारतात माघारी जावे अशी बोटीवर त्याना सूचना देण्यात आली अर्थातच गांधीनी ती अमान्य केली. तुम्ही परत न गेल्यास बोटीवरील सर्व हिंदी लोकांना आम्ही समुद्रांत फेकून देऊ, अशीहि धमकी दिली गेली. पण त्याचाहि गांधींच्यावर काही परिणाम झाला नाही. प्रवास चालूच होता. गांधी बोटी भरभरून हिंदी लोक आफ्रिकेत आणीत आहेत अशा अफवा पसरल्या.

## धाडसी पाऊल

बोटीवर गांधी हिंदी लोकांना धीर देत होते. अखेरीस बोट आफ्रिकेच्या किनाऱ्याला लागली. गांधींच्या जिवालाहि धोका होताच. त्यांनी कस्तुरबांना, मुलांना पुढे पाठविले व आपण खाली उतरले. गोऱ्या लोकांनी लगेच त्यांना घेरले. त्यांना पुढे चालणेहि अशक्य झाले. इतक्यांत दगड, अंडी यांचा मारा सुरू झाला. लाथा बुक्यांचा प्रसाद त्यांना मिळू लागला. त्यांची शुद्धही हरपली. जरा वेळाने ते शुद्धीवर आले व लगेच म्हणाले " ज्यांनी मला मारले त्यांचा काही गैरसमज झाला असावा. ती चांगली माणसे आहेत. " पण तेथील अधिकाऱ्यांनी गांधींना ज्यांनी मारले त्यांना पकडण्याचे हुकुम सोडले. गांधींनी कोणालाहि अटक करू नये " अशी विनंती केली. गांधीजींच्या मनांत चालू असलेल्या निराळ्या विचाराचा येथे प्रत्यय येऊ लागतो.

## सेवेची संधी

गांधींनी आपल्या घरी एका महारोग्यास आश्रय दिला. त्याची सेवा केली. स्वच्छतेवर त्यांचा भर असे. घरातील वातावरण प्रसन्न असावे असे त्यांना वाटे. इथे गांधीच्या सेवावृत्तीचे दर्शन घडते. बोअर विरुद्ध ब्रिटिश अशा स्वरुपाची जी लढाई याच सुमारास आफ्रिकेत झाली त्यामध्यें गांधींनी शुश्रुषा पथक उभे केले. यात हजारावर हिंदी सामील झाले. या शुश्रुषा पथकाने निरलसपणे जखमींची सेवा केली. हे कार्य गांधीनी तळमळीने केले. त्याचा अखेरीस चांगला परिणाम झाला. या सेवा पथकाची सर्वांनी वाहवा केली. सह्रदयतेच्या, माणुसकीच्या भावनेने त्यानी हे कार्य केले. गांधीना या कामामुळे पुष्कळ प्रसिद्धीही मिळाली. सार्वजनिक जीवनातील त्यांचे हे कार्य त्यामुळे अनेक दृष्टीने उपयुक्त ठरले.

## प्रेमळ निरोप

एकच महिना राहाण्यासाठी आफ्रिकेत आलेल्या गांधीना आता तेथे येऊन एक वर्ष लोटले. भारतात परतले पाहिजे असे त्यांना वाटू लागले खरे पण तेथील हिंदी जनतेची मने त्यांनी जिंकून घेतली होती. गांधीनी येथेच राहावे असा त्यांनी आग्रह धरला. अखेरीस ' जरूर पडेल तेव्हा परत येईन ' या आश्वासनावर त्यांची सुटका झाली. गांधी भारतात परतणार हे कळल्यावर अनेक हिंदी लोकांनी त्यांना प्रेमाने भेटी म्हणून देणग्या दिल्या. या सर्वाचा गांधीनी एक ट्रस्ट निर्माण केला. त्याचा उपयोग लोककल्याणासाठी व्हावा असे त्यात नमूद केले. हिंदी जनतेने त्यांच्यावर प्रेमाचा वर्षाव केला. भारावलेल्या अंतःकरणाने पण कर्तव्याच्या जाणिवेने गांधी इ. स. १९०१ च्या अखेरीस भारताकडे येण्यास निघाले.

## भारतातील अल्प मुक्काम

गांधी भारतात आले. त्या वेळी कलकत्ता येथे काँग्रेसचे अधिवेशन होते. गांधी तिकडे गेले. तेथे त्यांनी झाडलोट शौचकूप स्वच्छता अशा प्रकारची व इतर लेखन टिपण करण्याची कामे केली.

या काँग्रेस अधिवेशनाचे निमित्ताने बरेच भारतीय पुढारी एकत्र आले होते. लोकमान्य टिळक, नामदार गोखले, सुरेंद्रनाथ बॅनर्जी इत्यादींचा व गांधींचा परिचय झाला. गोखले यांच्या सांगण्यावरून गांधीनी भारताचा प्रवास केला. लोकांची स्थिती त्यांनी समजावून घेण्याचा प्रयत्न केला. सामान्य लोकांशी परिचय व्हावा म्हणून त्यांनी रेल्वेच्या तिसऱ्या वर्गाने प्रवास केला. हा सर्व प्रवास करून गांधी राजकोटला परतले तेव्हा त्यांचा प्रवास खर्च फक्त रु. ३१ झाला होता. पण हा भारतीय परिस्थितीचा अभ्यास अर्धवट टाकून आफ्रिकेतील निमंत्रणामुळे त्यांना परत द. आफ्रिकेत जावेच लागले ! “अन्याय घडो कोठेहि.... चाबूक आमच्या पाठीवर” अशीच गांधींची स्थिती झाली होती.

द. आफ्रिकेत पोचल्यावर चेंबरलेनची भेट घेतली व हिंदी लोकावर होत असलेल्या अन्यायाची त्यांना कल्पना दिली. त्याचा फारसा उपयोग झाला नाही. हिंदी लोकांच्यात जागृती निर्माण करण्याचे काम त्यांनी चालू केले पण त्याबरोबरच जोहान्सबर्ग येथे राहून वकिलीलाही सुरवात केली.

## सारी शिलक समाजासाठी

जोहान्सबर्ग येथे गांधीनी ऑफिस थाटले. त्यांना कामही भरपूर मिळू लागले. आजपर्यंत गांधी शिल्लक रक्कम भारतात भावाकडे पाठवीत पण गांधीनी आता विचार बदलला. त्यांनी भावाला कळवले ‘आजपर्यंत मी

आपणास पैसे पाठवीत होतो यापुढे ते पाठविणार नाही. जे पैसे शिल्लक राहातील ते सर्व मी येथील सार्वजनिक कामासाठीच खर्च करणार आहे.

## वाचन, मनन–विचार

विवेकानंदांचे वाङ्मय लक्षपूर्वक वाचले. गीतेचे पाठांतर सुरू केले. गांधींनी याच वेळी आपल्या जेवणावर स्वतःच नियंत्रण घातले. स्वतःच्या मनावर शरीरावर स्वतःच निर्बंध घालावेत व ते ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करावा असे 'स्व नियंत्रणाचे' विचार गांधींच्या मनात येत असत.

रस्किनचे 'अण्टु दि लास्ट' हे प्रसिद्ध पुस्तक गांधींनी याच वेळी वाचले. रस्किनने या पुस्तकात श्रमाचे महत्त्व वर्णन केले होते. वकिलीचा धंदा काय किंवा न्हाव्याचा धंदा काय श्रमाच्या दृष्टीने त्यांत फरक नाहीं. हे दोन्ही व्यवसाय त्या दृष्टीने सारखेच. श्रमाला प्राधान्य देणाऱ्या या रस्किनच्या विचाराचा गांधींच्या मनावर खोल ठसा उमटला. श्रमाच्या दृष्टीने कोणतेही काम श्रेष्ठ वा कनिष्ठ नाही असेच त्यांना वाटू लागले.

इ. स. १९०९ मध्ये सुरू झालेल्या झुलू लोकांच्या बंडानेही गांधींना काही नवविचार दिले. बंडातील जखमींची सेवा करणारे एक पथक गांधींनी काढले. या सेवापथकास अतिशय श्रम घ्यावे लागले. गांधींच्या मनात विचार आले की ज्याला समाजसेवेसाठी जीवन अर्पण करायचे असेल त्याने स्वखुषीने गरीबीच पत्करली पाहिजे. आणि जे पडतील ते कष्ट सहन करण्याची त्याने सदैव तयारी ठेवली पाहिजे ! ! याचवेळी ब्रह्मचर्य व्रत पालन करण्याचा निर्धारहि गांधींनी केला.

ट्रान्सवाल मधील काळ्या कायद्याचे विरुद्ध जी सविनय कायदेभंगाची चळवळ गांधींनी सुरू केली त्याचा परिणाम म्हणून गांधींना दोन महिने तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगातून सुटून आल्यावर चहा पिणे त्यांनी

सोडून दिले. सूर्यास्तानंतर अन्न ग्रहण करावयाचे नाही असेही त्यांनी ठरवले.

## विरोध अनुयायी झाला

ट्रान्सवालमध्ये नाव नोंदणीच्या विरुद्ध गांधींनी चळवळ सुरू केली. जनरल स्मटस् यांनी गांधींना मुलाखतीस बोलावले. स्वखुषीने हिंदी लोकांनी नांव नोंदणी केली तर हा कायदाहि आपण रद्द करु असे आश्वासन स्मटस्नी दिले म्हणून गांधींनी नाव नोंदणी करण्याचे ठरविले. त्यावेळी एक पठाण म्हणाला, "मला असे समजले आहे की तुम्ही स्मटस्कडून पंधरा हजार पौंड लाच घेतली आहे." गांधींनी आपण तसे मुळीच केले नाही असे त्या पठाणास सांगितले व नाव नोंदणी आपण करणारच असा निश्चय प्रकट केला. पठाण म्हणाला 'जो प्रथम नाव नोंदण्यास जाईल त्याला मी ठार मारीन"! पण गांधी काही सहकारी घेऊन नाव नोंदणीस गेलेच. पठाण तेथे आला होता. त्याने आपला सोटा गांधींच्या डोक्यावर मारला. गांधी धाडकन जमिनीवर कोसळले व बेशुद्ध झाले. पडतांना त्यांच्या तोंडून 'हरे राम' असे उद्गार निघाले. पठाणाने त्यांना लाथा बुक्यानेहि मारले. पण काही गोरे लोक पुढे झाले व त्यांनी पठाणास कैद केले. शुद्धीवर आल्यावर गांधींनी नाव नोंदणीचे काम पुरे केले. ते म्हणाले "ज्या पठाणाने मला मारले तो दोषी नाही. मी हिंदु व तो मुसलमान म्हणून त्याने मारले असेही नाही. माझे जे रक्त आज सांडले आहे त्याने हिंदु-मुसलमानांचे ऐक्य दृढ होण्यास मदत व्हावी अशी माझी इच्छा आहे." पुढे आश्वासनाप्रमाणे स्मटस्नी तो कायदा रद्द केला नाही. तेव्हा आपले दाखले जाळून टाकण्याचा निर्णय गांधींनी घेतला व एक जाहीर सभा घेतली. या सभेस तो पठाण हजर

होता. व्यासपीठावर जाऊन त्यांने 'भाई' म्हणून गांधींना हाक मारली! वैर विसरून मिठी मारली! आपला दाखला होळीत टाकण्यासाठीं गांधींच्या हाती दिला. पठाण गांधींचा अनुयायी झाला.

## कस्तुरबांचा आजार आणि गांधींचा निर्धार

कस्तुरबा आजारी होत्या. त्यांचे ऑपरेशन करण्याचे ठरले. पण शस्त्रक्रियेनंतर त्यांना अतीशय अशक्तपणा आला. औषधांचाहि काही परिणाम होईना. शेवटी गांधींनी कस्तुरबास विचारले "मी उपाय केले तर चालतील का?" त्यावर कस्तुरबानी लगेच तयारी दाखविली. मीठ व कडधान्य कस्तुरबानी खाऊ नयेत असे गांधीनी सांगितले. हे पथ्य सोपे नव्हते. पण गांधीनी निर्धार केला होता. कस्तुरबाना हा विचार नीट पटावा म्हणून गांधीनी स्वतःही मीठ व कडधान्य वर्षभर न खाण्याचे ठरविले. लिंबाचा रस, दूध आणि थोडा भाजीपाला असा कस्तुरबाचा आहार असे. डॉक्टरानी जिथे हात टेकले तेथेच गांधीनी उपाय सुरू केले. डॉक्टराना अपयश आले होते तर गांधीना यश आले. कस्तुबांची प्रकृती सुधारली. त्या बऱ्या झाल्या.

गांधींना द. आफ्रिकेत अनेक वेळा सत्याग्रह करावे लागले. हिंदी जनतेत जागृती निर्माण झाली. गांधींची लोकप्रियता वाढत होती. अन्याय झालेला दिसला की गांधी त्या विरुद्ध आवाज उठवीत. जनता त्यांच्या बाजूने लढा पुकारण्यास सिद्ध होई! आपल्या हक्कांची गांधींनी लोकांना जाणीव करून दिली. स्वाभिमानाने जगण्याची शिकवण दिली.

## शत्रूनेहि गौरवले

आफ्रिकेत गांधींनी नवचैतन्य निर्माण केले. त्यांच्या चळवळी भक्कम

पायावर उभारलेल्या असत. या चळवळी अधिकारी या नात्याने ज्यांना दडपण्याचे प्रयत्न करावे लागले, गांधीना अनेक वेळा तुरुंगवासाची शिक्षा द्यावी लागली त्या जनरल स्मटस्‌ने गांधींच्याबद्दल नंतर आपल्या आठवणीत नितांत आदर व्यक्त केला आहे.

स्मटस् म्हणतात "अशा एका माणसाचा प्रतिस्पर्धी होण्याचे माझ्या नशिबी आले कीं ज्या व्यक्तीबद्दल मला नितांत आदर होता. तुरुंगात शिक्षा भोगीत असता त्या माझ्या प्रतिस्पर्ध्याने माझ्यासाठीं एक चपलांचा जोड तयार केला. तुरुंगातून सुटल्यावर तो मला त्यानी भेट म्हणून पाठविला. त्या चपला मी कितीतरी दिवस वापरल्या. पण बनवणाऱ्याच्या जोड्याच्या शेजारीहि उभे राहाण्याची माझी लायकी नव्हती याची जाणीव मात्र मला सदोदित होती."

द. आफ्रिकेत गांधीनी केलेले कार्य महनीय होते. सडेतोड, स्पष्ट, सत्य बोलणे, निर्धाराचे वागणे, नियमित पण अल्प आहार घेणे, संकटास न जुमानणे, श्रमास सिद्ध असणे असे गांधींचे वर्तन होते. विरोधकही अनुयायी झाले आणि शत्रूनेहि पाठ थोपटली. जनतेची मने तर प्रेमादराने भारावून गेली. जनतेला नेता मिळाला आणि नेत्याला मिळाले अनुभव !

## प्रश्न

**प्रश्न १ :** खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

१) गांधीजी दक्षिण आफ्रिकेत का गेले ?

२) ट्रान्सवालमध्ये गांधीजींवर कोणी हल्ला केला ? त्याचे मत का बदलले ?

३) गांधीजी डॉक्टर कसे बनले ?

४) दक्षिण आफ्रिकेत गांधीजींनी कोणती पुस्तके वाचली ! त्याचा परिणाम काय झाला ?

प्रश्न २ : रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

१) सारी शिल्लक·········साठी खर्चावयाचे गांधीजींनी ठरवले.

२) नाताळात हिंदी लोकांना·········म्हणत.

३) गांधीजींनी अब्दुल्ला कंपनीस ·········चा सल्ला दिला.

४) हिंदी लोकांचे·········नष्ट करण्याचे सरकारने ठरवले.

प्रश्न ३ : कोणत्याही एका प्रसंगाची माहिती द्या.

१) दक्षिण आफ्रिकेतील आगगाडीचा प्रवास.

२) कस्तुरबांवर उपचार.

३) गांधीजींचे विरोधकांशी वागणे.

प्रकरण तिसरें

# गुरु–शिष्य

गोपाळ कृष्ण गोखले हे भारतातील नेमस्त पुढारी. त्यांना देशाच्या परिस्थितीचे अचूक ज्ञान होते. विधिमंडळात व कायदेमंडळात काम करण्याची संधी त्यांना मिळाली व त्यांना राजकारणाचीही उत्तम ओळख पटली. ' चारित्र्यवान, बुद्धिमान, प्रामाणिक आणि प्रयत्नांची शिकस्त करणारे एक सज्जन ' या शब्दांत न्या. रानडे यांनीं गोखल्यांचा गौरव केला आहे.

प्रथम भेटीतच गांधींना गोखले यांचेबद्दल नितांत आदर वाटू लागला. भारतात राहूनच देशसेवा करण्याची गांधीनी इच्छा प्रकट केली. गोखले यांनी गांधींना घाई न करण्याचा सल्ला दिला. भारतात काम सुरू करण्याचे आधी एकदा सर्व भारताचा प्रवास करण्यास सांगितले. भारतीय

जनता आहे कशी, त्या जनतेचे कोणते प्रश्न आहेत, त्यांची गाऱ्हाणी कोणती या सर्वांचा अभ्यास करण्याचा आग्रह केला.

## उपदेश अंमलात आणला

गोखल्यांसारख्या अति हुषार, मुरब्बी, तळमळीने काम करणाऱ्या श्रेष्ठ पुढाऱ्याचा सल्ला गांधींनी शिरोधार्य मानला. त्यानी भारताचा प्रवास करण्याचे ठरविले. ते दक्षिणेकडे आंध्र, मद्रास इत्यादि भागांत फिरले. उत्तर भारताचाही त्यांनी प्रवास केला. गांधींना भारतातील भीषण दारिद्र्य दिसले व ते उदास झाले. अज्ञान पाहून ते बेचैन झाले. अस्पृश्यतेचे ओंगळ रूप पाहून ते शरमून गेले.

भारतीय जनतेचे अज्ञान, त्यांची गरिबी, रुढिप्रियता, अस्पृश्यता या सारख्या भयंकर दोषांची त्यांना जाणीव झाली. गांधींनी हा सारा प्रवास तिसऱ्या वर्गाने केला.

भारतीयांचे प्रश्न त्यांनी बारकाईने अभ्यासिले. पण आता भारतात राहून कार्य करण्याचे गांधींच्या नशिबी नव्हते. त्यांना द. आफ्रिकेत परत जावे लागले. ते तिकडे जनता जागृतीचे, अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्याचे कार्य करीत असतानाही त्यांचा ना. गोखल्यांशी सतत पत्रव्यवहार चालू होता.

## ना. गोखले द. आफ्रिकेत गेले

गांधींनी ना. गोखले यांचेकडून राजकारणाचे पाठ घेतले. त्या ज्ञानाचा गांधीजींनी द. आफ्रिकेत उपयोग करून घेतला. गांधीजी ना. गोखले यांना पत्रे लिहीत व सल्ला विचारीत.

पुढे त्यांनी गोखल्याना द. आफ्रिकेत येण्याचा आग्रह सुरू केला.

अखेरीस शिष्याच्या निमंत्रणानुसार गांधी आफ्रिकेत गेले. द. आफ्रिकेच्या सरकारनेही गोखल्यांचे उत्तम स्वागत केले. गोखल्यांनी या वेळी गांधीचे कार्य जवळून पाहिले. त्यांना अतिशय समाधान वाटले. 'एका वर्षात तुम्ही भारतात परत आले पाहिजे' असा आग्रह गोखले यांनी धरला. गोखले यांनी गांधीच्या टॉलस्टाय फार्मवर तीन दिवस मुक्काम केला. गांधींनी यावेळी गोखल्यांच्या कपड्याना इस्त्री केली इतकेच नव्हे तर प्रत्येक बाबतींत त्यांची स्वतः सेवा केली. गोखल्यांचे कोणतेहि काम करण्यास गांधींना अतिशय आनंद होई. गुरु-शिष्याच्या जोडीने ते काही दिवस फार आनंदात घालविले.

## शिष्याचा गौरव

भारतात परतल्यावर मुंबईत गोखल्यांनी भाषण केले. ते म्हणाले, "गांधींचे व्यक्तिमत्व त्यांच्या सहवासात राहिल्याशिवाय नीट समजणारच नाहीं. ते शूर वृत्तीचे आहेत. विशेष असा कीं सामान्य व्यक्तीलाहि शूर बनविण्याचे सामर्थ्य त्यांचेजवळ आहे. निरक्षर, गरीब अशा जनतेला अलौकिक त्याग करण्यास त्यांनी प्रवृत्त केले. गांधींनी आपले काम निःस्वार्थपणे चालविले आहे. ते इंग्रजाविरुद्ध झगडा देत आहेत पण विशेष म्हणजे इंग्रज व्यक्तीचा ते द्वेष करीत नाहीत. खुद्द गोऱ्या लोकांनाही त्यांचेबद्दल आदर आहे. हे सर्व पाहून माझे अंतःकरण भरून आले आहे."

पुढे गोखले इंग्लंडला गेले. तेथे ते आजारी पडले. त्यांनी गांधींना भेटून जावे असे कळविले. त्याप्रमाणे गांधी लंडनला गेले पण त्याचवेळी गोखले प्रकृतीस्वास्थ्यासाठी फ्रान्समध्ये गेले होते व पहिले महायुद्ध सुरू झाले असल्यामुळे ते तिकडेच अडकून पडले. थोड्या

दिवसांनी ते लंडनला आले. पहातात तो गांधी प्रकृतीची हेळसांड करीत आहेत. रात्रंदिवस काम करीत आहेत. ते फारच अशक्त झाले होते. सत्याग्रह, तुरूंगवास आणि उपोषण या सर्वामुळे ते फारच थकले आहेत. गोखल्यांनी त्यांना विश्रांती घेण्याचा सल्ला दिला व ते भारतात परतले.

गांधीही काही दिवसानंतर भारतात आले. मुंबईत त्यांचा सत्कार झाला. दुरून डोंगर साजरे असे होण्याची शक्यता आहे असे गांधी म्हणाले. 'मी दूर आफ्रिकेत होतो, विजय मिळवीत होतो तोपर्यंत ठीक होते. आता मी येथेच राहाणार आहे. तेव्हा तुम्हाला माझे दोष समजतील, माझी सेवा तुम्ही गोड मानून घ्यावी अशी माझी प्रार्थना आहे.

## गोखले म्हणजे गंगोदक

गांधी पुण्याला गेले व तेथे गोखले यांना भेटले. सार्वजनिक कामासाठी जेवढे लागतील तेवढे पैसे गांधींना द्यावेत असे गोखले यांनी समाज सेवक सभेला सांगून ठेवले होते. कोणत्या पुढाऱ्याबद्दल आपणास काय वाटते याचे गांधींनी मार्मिक विवेचन केले आहे. ते म्हणतात " सर फिरोजशहा मला हिमालयासारखे वाटले. लोकमान्य समुद्रासारखे भासले. पण गोखले गंगौघाप्रमाणे वाटेल. हिमालय उल्लंघून जाणे कठीण, महासागर तरून जाणे कठीण पण गंगामाता मात्र आई सारखी वाटते. तिच्या मांडीवर खुशाल खेळावे.

गोखल्यांच्याबद्दल गांधींना अतिशय प्रेम वाटे. वरील उद्गारावरून ते आपल्या लक्षांत येतेच. गांधी त्यांच्याकडे आदराने पहात. त्यांचा सल्ला मानीत. मार्गदर्शन लाभावे म्हणून प्रयत्न करीत पूर्व काळांत आश्रमांतील गुरुजींच्याबद्दल जो आदरभाव शिष्याला वाटे तोच आदर गांधींना

गोखले यांच्याबद्दल वाटत होता. गोखल्यांच्या निधनानंतर गांधी एक वर्षभर अनवाणी राहिले व आपले दुःख त्यांनी अशा प्रकारे व्यक्त केले.

## पोषाखात बदल

ना. गोखल्यांच्या सांगण्यावरून गांधीजीनी भारताचा प्रवास केला. देशातील भयानक अज्ञान, भेसूर दारिद्य पाहून गांधी अतिशय अस्वस्थ झाले. दारिद्र्याच्या दर्शनाने ते हेलावून गेले. त्या लोकांच्या झोपड्या, त्यांचे फाटके तुटके मळके कपडे, अपुरी घाण भांडीकुंडी, अपुरे निकस अन्न, अंगावर घालायला धड वस्त्र नाहीं, पोटभर अन्न नाही, निवाऱ्याला जागा नाहीं असे हजारो, लाखो लोक भारतातील खेड्यापाड्यातून राहात आहेत हे त्यांनी डोळ्यांनी पाहिले.

अशा गरीब लोकासाठी आपण काय करु शकू? हाच एक विचार त्यांच्या मनांत थैमान घालू लागला. भारतातील अनेक समस्या आपल्या इच्छेप्रमाणे सोडवावयाच्या तर प्रथम देश स्वतंत्र झालाच पाहिजे. गांधीजीनी देश स्वातंत्र्यासाठी अहोरात्र अविश्रांत धडपड केली. गरीबाच्या झोपडीतही त्यांनी चरखा नेला. स्वतःचे वस्त्र विणण्यास शिकवले. ते खेड्यातून हिंडले. गरीबांच्या घरी जाऊन गांधीनी त्यांना स्वच्छतेचे महत्त्व सांगितले. एका झोपडीतील दृश्य पाहून ते अतीव दुःखी झाले. काही स्त्रियांना वापरण्याचे एकच लुगडे होते तर काहीजणीत मिळून एक धड लुगडे होते. त्यापैकी एक बाहेर आली तर उरलेल्या दोन झोपडीतच राहिल्या!! हे सर्व पाहून गांधीनी आपली टोपी, धोतर यांचा त्याग केला. फक्त ते पंचा वापरू लागले. पुढे ते इंग्लंडमध्ये गेले तरी पंचा व उपरणे याशिवाय त्यांनी वस्त्रे वापरली नाहीत. तेथे इंग्लंडच्या राजाने भेटीस बोलावले. दरबारात जायचे म्हणजे विशिष्टच पोशाख पाहिजे. पण गांधीनी पोशाख

बदलणार नाही असे कळविले. माझ्या नेहमीच्या पोषाखात मी जाईन. त्याला परवानगी नसेल तर मला राजेसाहेबाना भेटायचे नाही. राजेसाहेबांनी नमते घेतले आणि गांधी राजेसाहेबांच्या भेटीस गेले. त्या वैभवसंपन्न प्रासादात, उत्तम भारी पोषाख केलेल्या समुदायांत केवळ उपरणे परिधान केलेले गांधीजी एकदम वेगळे उठून दिसत होते. प्राचीन काळी ऐश्वर्यसंपन्न सम्राटांच्या वैभवशाली महालात एकादा तपस्वी येऊन उभा राहावा तसे ते दृश्य वाटले.

## प्रश्न

प्रश्न १ : खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

१) गांधीजींना ना. गोखलेंनी कोणता उपदेश केला ?

२) भारताच्या दौऱ्याचा गांधीजींवर काय परिणाम झाला ?

३) गोखल्यांनी आपल्या शिष्याचा गौरव कसा केला ?

प्रश्न २ : कोणत्याही अेकावर पाच वाक्ये लिहा.

१) नामदार गोखले.

२) गोखले यांचा गांधीजींवर परिणाम.

३) गांधीजींचा पोशाख.

प्रश्न ३ : (अ) या प्रकरणात आलेली विशेषणे सांगून त्यांचे प्रकार ओळखा

(ब) खालील शब्दांचा वाक्यात उपयोग करा.

गाऱ्हाणे, मुरब्बी, हेळसांड, विवेचन, अलौकिक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रमांक ........................
क्रमांक .................. दि. ..............

प्रकरण चवथे

# राजकारणात पदार्पण

गांधीजींनी पहिल्या महायुद्धात सरकारला मदत केली. त्यावेळी त्यांची कल्पना होती की सरकार भारतीयाना काही हक्क देईल. पण झाले उलटेच! सरकारने हक्क दिले नाहीतच. मात्र जुलमी रौलट कायदा पास केला. साहजिकच साऱ्या देशभर असंतोषाची लाट पसरली. गांधीजींनी या रौलट बिलाविरुद्ध मोहीम करण्याचे ठरविले. त्यानी 'सत्याग्रह' हे अस्त्र तयार केले. या चळवळीस वल्लभभाई पटेल, सरोजिनी नायडू इ. पुढाऱ्यांनी टेकू दिला. ही चळवळ देशव्यापी व्हावी असा गांधींचा विचार होता. त्यासाठी त्यांनी मुंबईस सत्याग्रह सभेची स्थापना केली. अवघ्या पंधरा दिवसात या सत्याग्रहासाठी पंधराशेहून अधिक लोकांनी नावे दिली. सत्याग्रह सभेने या लोकांना आदेश दिला, "सरकारने प्रक्षिप्त ठरवलेले

वाङ्मय जाहीरपणे वाचा. कायदेभंग करा. वृत्तपत्रे रजिस्टर करू नका ”

गांधीजींनी सत्याग्रहास प्रारंभ सार्वत्रिक हरताळाने करावयाचे ठरविले. त्यांची ही कल्पना राजगोपालाचारींनाही आवडली. गांधीजींचे म्हणणे होते की सत्याग्रह म्हणजे आत्मशुद्धी. सत्याग्रह हे एक अमोघ अस्त्र आहे. या अस्त्राने आपण जुलमी प्रतिस्पर्ध्यांवर विजय निश्चित मिळवू. प्रत्येक स्वयंसेवकाने सत्याग्रह केला की त्याची आत्मशुद्धी होईल. या आपल्या विचारांचा प्रचार त्यांनी वर्तमानपत्राद्वारे केला. यासाठी त्यांनी ‘ हिन्द स्वराज्य ’ व ‘ सर्वोदय ’ अशा दोन छोट्या पुस्तिका काढल्या. सरकार सावध होतेच. त्याने या दोन्ही पुस्तिकांवर बंदी घातली. यामुळे सत्याग्रह आंदोलनाला उलट अधिकच जोर चढला.

गांधींनी मुंबई, मद्रास, अहमदाबाद इत्यादी ठिकाणी जाऊन सत्याग्रह आंदोलनाची कल्पना सर्वांना समजावून सांगितली. ६ एप्रिल हा या सत्याग्रहासाठी दिवस मुक्रर केला. पण दिल्लीतील लोक अतिउत्साही होते. त्यांनी ३० मार्चलाच सत्याग्रहाचे शिंग फुंकले ! एक मोठी मिरवणूक काढून लोकांनी हरताळ पाडला. नंतर एक सार्वजनिक सभा घेण्यात आली. हजारो लोक या सभेत हजर होते. अनेक नेत्यांनी यात भाषणे केली. सरकारने ही सभा उधळविण्याचे ठरविले. त्यांनी अमानुषपणे या लोकांवर गोळीबार केला. स्वामी श्रद्धानंद भाषण देत होते. त्यांनी मोठ्या निधडेपणाने गुरख्याच्या संगिनीला छाती लावली ! ते जराही डगमगले नाहीत ! ! देशभर ही वार्ता वाऱ्यासारखी पसरली. लोक थक्क झाले ! त्यांच्या मनात सत्याग्रह करण्याची प्रबळ इच्छा निर्माण झाली.

## मुंबईत सत्याग्रह

गांधीजींनी मुंबईतील सत्याग्रहाचे नेतृत्व स्वीकारले. कोणतेही शुभ

काम करावयाचे ते शुचिर्भूत होऊन ! अशी भारतीयांची समजूत आहे. तेव्हा सर्व लोक एकत्र आले. प्रथम त्यांनी चौपाटीवर समुद्रस्नान केले. नंतर एक मिरवणूक काढण्यात आली. त्या दिवशी मुंबईत ठिकठिकाणी सभा घेण्यात आल्या. या सभांतून गांधींनी भाषणे केली व सत्याग्रहाचे मर्म समजावून सांगितले. हे सर्व कार्य शांतपणे पार पडले. त्याच दिवशी गांधी व सरोजिनी नायडू यांनी हिंद स्वराज्य व सर्वोदय ही पुस्तके विकावयास प्रारंभ केला. या पुस्तकाची किंमत चार आणे होती. पण लोकांनी स्वयंस्फूर्तीने जास्त पैसे देऊन ती खरेदी केली. तो पैसा सत्याग्रह फंडात जमा केला. मुंबईत हा सत्याग्रह दिन यशस्वीपणे पार पडला. दुसरेच दिवशी गांधीजींनी सरकारी परवानगीशिवाय ‘ सत्याग्रह पत्र ’ हे वर्तमानपत्र छापले.

## देशभर सत्याग्रह

मुंबईतील सत्याग्रहाचे लोण लवकरच अहमदाबादला पोचले. सहा एप्रिलपासून सबंध देशभर नवचैतन्याची लाट उसळली होती. ठिक-ठिकाणी लोक स्वयंस्फूर्तीने सत्याग्रह करत होते. गांधींचा संदेश देशाच्या कानाकोपऱ्यात पोचला होता. सरकार सगळीकडे अत्याचार व दडपशाही करत होते. पण त्याला भीक न घालता लोक गांधींचा आदेश मानत होते. १२ एप्रिलला अहमदाबादेत सरकारने गिरणीकामगारांवर गोळीबार केला. आतापर्यंत शांतपणे सत्याग्रह करणारे लोकही आता खवळले. सरकारच्या कडक धोरणामुळे ते मुळीच नमले नाहीत. त्यांनी दुप्पट उत्साहाने कार्य चालू ठेवले. गोळीबारामुळे काही लोक फार चिडले. त्यांनी आगगाड्या अडवल्या, सरकारी कचेऱ्यांवर हल्ले केले, टेलिफोनच्या तारा तोडल्या, इमारतींना आगी लावल्या. सरकारने याचा फायदा घेऊन अहमदाबादेत

लष्करी अंमल चालू केला. गांधींना ही बातमी कळताच ते त्वरेने अहमदाबादला गेले. त्यांनी लोकांना सांगितले, " आपला सत्याग्रह शांततेने चालला पाहिजे. आपण सत्य मार्गाने जात आहोत तेव्हा विजय नक्कीच मिळवू. पण आपला मार्ग शांततेचा हवा. तुम्ही जाळपोळ केलीत. तारा तोडल्या. आगगाड्या अडवल्या. पण नुकसान तुमच्याच बांधवांचे झाले ना! आपण जर शांततेने कार्य केले असते तर आतापर्यंत यश मिळाले असते. तेव्हा माझा आग्रह आहे की स्वयंसेवकानी शांततेने सत्याग्रह करावा." लोकांना गांधींचे म्हणणे पटले. अहमदाबाद शांत झाले. सरकारनेही लष्करी अमल संपवला.

## जालियनवाला बाग

अहमदाबादप्रमाणे सत्याग्रहाची लाट पंजाबमध्येही उसळली. अतमृसर येथे सरकारचा जाहीर निषेध करावयाचे ठरले. विषय होता रौलट ॲक्ट! जागा ठरली जालियनवाला बाग! हजारोंच्या संख्येने लोक या सभेच्या ठिकाणी उपस्थित झाले. सर्वजण खरे सत्याग्रही होते. जनरल डायरच्या लष्करशाहीला घाबरणारे नव्हते. त्याने ११ एप्रिलला अनेकाना अटक केली. सभा, मिरवणुकांना बंदी घातली. पण या हुकुमाची सत्याग्रह्यांना तमा नव्हती. त्यानी १२ एप्रिलला सायंकाळी साडेचार वाजता जालियनवाला बागेत सभा भरविली. सभेचे कामकाज सुरू होते तोच लष्कराने मैदानात प्रवेश केला. जनरल डायर हा त्यांचा अधिकारी. त्याने क्रूर अत्याचार केले. त्याने बागेला लष्कराचा वेढा बसवला. कोणतीही सूचना न देता गोळीबार सुरू केला. साहजिकच लोकांची त्रेधातिरपीट उडाली. या सभेत अनेक स्त्रिया व मुलेही होती. मैदानाचे सर्व दरवाजे रोखलेले होते. त्यामुळे लोकांना बाहेरही जाता येईना! या निशस्त्र अजाण लोकांवर

गोळीबार करून जनरल डायरने आपले शौर्य दाखवले! त्याने शेकडो निर्दोष लोकाना परलोकधाम दाखवले. स्वातंत्र्यभावनेचा बीमोड करण्यासाठी हजारो विद्यार्थ्यांना चाबकाचे फटके मारले. स्त्रियांवरही अत्याचार केले. या अत्याचारामुळे गांधीजी व भारतीय जनता क्षुब्ध झाली. अत्याचारामुळे जनतेच्या मनातील स्वातंत्र्यभावना वाढीस लागली. पंजाबमध्ये १५ एप्रिलपासून लष्करी अंमल सुरू झाला.

## देशभर असंतोष

पंजाबमधील हत्याकांडामुळे जनता चिडली आता या सत्याग्रहास अनिष्ट वळण लागेल असे गांधींना वाटले. म्हणून त्यानी १८ एप्रिल रोजी ही चळवळ काही दिवसांसाठी स्थगित केली.

सरकारच्या अत्याचाराचा परिणाम म्हणून लोकांमध्ये स्वातंत्र्याची भावना वाढली. निरनिराळ्या प्रकारे लोकांनी आपला असंतोष व्यक्त करण्यास प्रारंभ केला. रवींद्रनाथ टागोरांना सरकारने सर हा किताब दिला. त्यानी तो साभार परत केला. त्या वर्षी अलाहाबाद येथे राष्ट्रीय सभेची सभा भरली. या सभेत जालियनवाला बागेची चौकशी करण्याचे ठरले. त्यासाठी समिती बनवली. त्याचे सदस्य स्वामी श्रद्धानंद, मोतीलाल नेहरू व पं. मालवीय हे होते. देशातील वाढता असंतोष पाहून सरकारनेही आठ जणांची चौकशी समिती नेमली. त्याचे अध्यक्ष हंटर हे होते. गांधींनी व काँग्रेसच्या सदस्यांनी पंजाबमधील पुढाऱ्यांची सुटका करा म्हणून मागणी केली. हंटर कमिशनने काँग्रेसच्या मागण्या मानल्या नाहीत म्हणून काँग्रेसने गांधी, मोतीलाल नेहरू, सी. आर. दास, फजलूल हक् व अब्बास तय्यबजी यांची स्वतंत्र कमिटी नेमली. मोतीलालजींनी काँग्रेसचे अध्यक्ष होणार म्हणून राजीनामा दिला.

## समितीची पहाणी

गांधींनी स्वत: पंजाबमधील खेड्यापाड्यात जाऊन पहाणी केली. अनेक लोकांच्या मुलाखती घेतल्या. सत्य परिस्थितीवर त्यानी रिपोर्ट लिहिला. डिसेंबरमध्ये अमृतसर येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले. त्यात गांधींनी आपला रिपोर्ट सादर केला. प्रतिनिधींच्या भावना उचंबळल्या. जालियनवाला बागेचे स्मृतिचिन्ह त्याच जागी उभारण्याचा ठराव पास झाला गांधींनी गोळ्यांच्या वर्षावाला न भिता आपण सरकारशी शांतपणे सामना दिला पाहिजे असे मत प्रतिपादिले. यावेळी गांधींनी निवेदन केले की ६ एप्रिल ते १३ एप्रिल हा राष्ट्रीय सप्ताह पाळावा. गांधींचे अनेक नेत्यांशी मतभेद झाले. पण शेवटी गांधींच्या मताला प्राधान्य मिळाले. ‘ महात्मा गांधीकी जय ’ या आरोळ्यांनी वातावरण दुमदुमले. याचवेळी गांधींना ‘महात्मा’ ही पदवी मिळाली.

गांधींची इंग्रज सरकारबद्दलची कल्पना पालटली. त्यांनी लो. टिळकांप्रमाणे सरकारविरुद्ध सत्याग्रहाचे शस्त्र उगारले. यावेळी भारतीय राजकारणावर टिळकांचा जबरदस्त पगडा होता. ब्रिटिश सरकार त्याना ‘ असंतोषाचे जनक ’ म्हणून ओळखत असे. म. गांधींनाही टिळकांबद्दल फार आदर होता. दोघांची विचारसरणी पुष्कळच भिन्न होती. पण दोघांचे ध्येय एकच होते. ते म्हणजे “ स्वराज्य. ”

## टिळकांच्याबद्दल आदर

“ बहुजनसमाजावर इतके वजन असलेला लोकमान्यांशिवाय दुसरा पुढारी आधुनिक काळात झालेला नाही. जनता त्यांना परमेश्वराचा अवतारच मानत असे. देशभक्ती हा त्यांचा स्थायीभाव होता. देशप्रीतीशिवाय

अन्य कोणताही धर्म त्यांना मान्य नव्हता. ते लोकशाहीचे कट्टे पुरस्कर्ते होते. त्यांची जबरदस्त इच्छाशक्ति त्यांनी देशाच्या कारणी लावली. त्यांचे खाजगी जीवन पवित्र व शुद्ध होते. धैर्याचे ते मेरूमणी होते. त्यांचा आशावाद जबरदस्त होता. ते इंग्रजांचा द्वेष करत नसत. ते नोकरशाहीचे शत्रू होते. आधुनिक भारताचे ते जनक होते. 'स्वराज्य हा माझा जन्म-सिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच,' ही त्यांची गर्जना प्रत्यक्ष स्वराज्य मिळेपर्यंत प्रत्येक हिंदवासियाच्या कानात घुमत राहील. ते हिंदी जनतेसाठी जगले आणि तिच्यासाठीच त्यांनी देहत्यागही केला. शौर्य, साधेपणा, दीर्घोद्योग व देशभक्ती हे त्यांचे गुण आपण आत्मसात केले पाहिजे. "टिळकमहाराजांचे अपुरे राहिलेले कार्य आपण तळमळीने पूर्ण केले पाहिजे," असे गांधीजींनी टिळकांच्या मृत्यूनंतर लोकांना संदेश देताना सांगितले. गांधींच्या उद्गारावरून टिळकांबद्दल त्यांच्या मनात किती आदर होता हे व्यक्त होते.

१ ऑगस्ट १९२० ला टिळकांचे देहावसान मुंबईच्या सरदारगृहात झाले. त्याच दिवशी म. गांधींनी आपली 'असहकार आंदोलनाची' कल्पना लोकांसमोर मांडली. हा योगायोगही संस्मरणीय आहे. म. गांधींना टिळकांच्या मृत्यूची बातमी कळताच ते सरदारगृहात गेले. प्रेतयात्रेसाठी हजारो लोकांची झुंबड उडाली होती. प्रेतयात्रा सुरू होताच सृष्टीमातेने-देखील अश्रू ढाळावयास सुरवात केली. कारण तिचा पराक्रमी, धैर्याचा मेरूमणी 'बाळ' हरपला होता. लो. टिळकांबद्दलचा आदर दर्शविण्या-साठी गांधी शवाला खांदा देण्यास पुढे सरसावले. टिळकांचा एक कर्मठ नाते-वाईक त्यांना मनाई करू लागला. कारण टिळक ब्राह्मण व गांधीजी बनिया. पण गांधीजी दृढ संकल्पाने म्हणाले, "सार्वजनिक कार्यकर्त्याला जातपात नसते." आणि ताबडतोब पुढे होऊन त्यांनी खांदा दिला. या एकाच वाक्यात

त्यानी केवढे मोठे तत्त्वज्ञान सांगितले. चौपाटीवर टिळकांचा अग्निसंस्कार झाला. टिळकांसारखा ज्वलंत पुढारी गेल्याने भारतमाता खिन्न झाली. पण त्याचवेळी एका शांत, गंभीर पण तेजस्वी ताऱ्याचा—म. गांधींचा— भारताच्या राजकीय क्षितिजावर उदय झाला. एका नवीन विचाराचा प्रकाश पसरला.

## प्रश्न

प्रश्न १ : खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

१) गांधीजीनी रौलट कायद्यास कसा विरोध केला ?

२) गांधीजीना टिळकांबद्दल काय वाटे ?

३) राष्ट्रीय सभेच्या समितीने पंजाबमध्ये कायकाय पहाणी केली ?

प्रश्न २ : जालियनवाला बागेमधील घटनेबद्दल तुम्हाला काय माहीत आहे ? सविस्तर लिहा.

प्रश्न ३ : रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

१) लोकमान्याना ब्रिटीश सरकार········म्हणत असे ?

२) गांधीजींनी प्रचारासाठी········काढले.

३) सार्वजनिक कार्यकर्त्याला········नसते असे गांधी म्हणाले.

४) ६ एप्रिल ते १३ एप्रिल········म्हणून पाळला जातो.

प्रकरण पाचवे

# असहकार व दांडीयात्रा

## नवा मनु

गांधींनी ब्रिटिश सरकारशी सामना करण्याचे ठरविले. पण त्यासाठी त्यानी एक नवीनच अस्त्र काढले. ते म्हणजे 'असहकार'. १९२० साली नागपूर येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले. यावेळी गांधींनी आपला कार्यक्रम सभेपुढे मांडला. थोड्या विरोधानंतर तो मान्य झाला. या कार्यक्रमाद्वारे सरकारशी असहकाराचे धोरण अवलंबायचे असे ठरले.

## असहकार म्हणजे काय ?

ब्रिटिश सरकारच्या सर्व खात्यांचे काम भारतीय लोकच करीत. म्हणूनच

आपले असहकार आंदोलन यशस्वी होईल असा गांधींना विश्वास वाटला. यासाठी सरकारी पदव्यांचा त्याग करावा, कौन्सिल, सरकारी शाळा, कॉलेजे यांवर बहिष्कार टाकावा, सरकारी नोकऱ्या सोडाव्यात व सरकारला कर देऊ नये असे गांधींनी सांगितले. असे आपण केले की सरकार आपणास स्वराज्य देईल असे गांधीजींना वाटले.

हे आंदोलन देशव्यापी ठरले. सबंध भारतात नवीन विचारांची लाट उसळली. हजारो विद्यार्थ्यांनी शाळा, कॉलेजे सोडली. गांधीच्या कल्पने-प्रमाणे अनेक लोकांनी सरकारी नोकऱ्या सोडल्या. असेंब्लीवर बहिष्कार टाकला. अनेक व्यावसायिकांनी आपले व्यवसाय सोडले आणि असहकार आंदोलनात भाग घेतला. यावेळी एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट घडली. ती म्हणजे भारतीय आर्य स्त्री आपल्या अवगुंठनातून बाहेर आली. पाश्चिमात्य स्त्रीप्रमाणे पुरुषाच्या खांद्याला खांदा भिडवून ती आंदोलनांत सामील झाली. शेतीप्रधान भारतातील शेतकरी जागा झाला. त्याने जमीनदाराशी असहकार पुकारला. महाराष्ट्रात मुळशी येथे शेतकऱ्यांनी सामुदायिक सत्याग्रह केला. सामुदायिक कायदेभंगामुळे सरकारचे धाबे दणाणले. रोज हजारो सत्याग्रही सत्याग्रह करत. सारे जेल भरले. आता या सत्याग्रह्यांना कुठे ठेवायचे हा सरकारला प्रश्न पडला.

या आंदोलनाच्या जोडीला चरखा-प्रचार, स्वदेशीचा पुरस्कार, पंचा-यत राज्य या कल्पनाही त्यांनी लोकांपुढे मांडल्या. गांधींच्या आदेशानुसार जनता वागेल तर एक वर्षात 'स्वराज्य' मिळेल असा त्याना विश्वास वाटत होता.

## जोरदार चळवळ स्थगित का केली.

सबंध देशभर आंदोलन जोरदारपणे चालले होते. सरकार भांबावले होते.

पण उत्तर प्रदेशात चोरीचोरा येथे एक अनिष्ट प्रकार घडला. खवळलेल्या जमावाने पोलीसचौकीवर हल्ला केला. ती जाळली. काही पोलीसांना ठार मारले. गांधीजी अहिंसेचे पुजारी होते. त्यांना अहिंसापूर्ण, शांततामय आंदोलन हवे होते. आंदोलनाला लागलेले हिंसक वळण त्यांना आवडले नाही. त्यांनी आंदोलन स्थगित केले. पं. जवाहरलाल नेहरूंसारखे त्यांचे अनेक सहकारी याना हे मान्य झाले नाही. पण गांधी आपल्या निश्चया-पासून ढळले नाहीत. कारण अहिंसा तत्त्वावर त्यांची दृढ निष्ठा होती.

## गांधीजींची दांडीयात्रा

१२ मार्च सकाळची वेळ होती. साबरमती नदीच्या काठावर हजारो लोक जमले होते. भारताच्या निरनिराळ्या भागातून ते तेथे आले होते. समुदाय अगदी अधीर झाला होता. ते मधून मधून 'भारतमाताकी जय' अशा घोषणा करत होते. सुमारे ७८ स्वयंसेवक साबरमतीहून निघणार होते. ते आपल्या नेत्याची उत्सुकतेने वाट पहात होते. कारण त्याना पदयात्रेस निघायचे होते. ही पदयात्रा 'दांडीस' जाणार होती. साबरमती-हून दांडी हे ठिकाण दोनहजार मैल दूर होते. पण सर्वांचे चेहेरे आत्मविश्वासाने उजळले होते.

## नेत्याचे दर्शन

लोकांची उत्सुकता आता शिगेला पोचली होती. आणि 'पहा आले, आले' असा लोकांचा आवाज आला. आश्रमातून दांडीयात्रेचा नेता बाहेर आला. ते कोण बरे होते?

एकसष्ट वर्षांचे ते गृहस्थ होते. त्यानी स्वतः विणलेला खादीचा पंचा नेसला होता. तो पंचा अगदी पांढराशुभ्र होता. कमरच्या पंचाशिवाय

त्यांच्या अंगावर दुसरे कोणतेही वस्त्र नव्हते. त्यांची रुंद व भरदार छाती त्यांच्या उत्तम आरोग्याची ग्वाही देत होती. त्यांची कांती तेजस्वी व तजेलदार होती. त्यांच्या डोळ्यातून करुणा आणि सहानुभूती प्रगट होत होती. त्यांच्या हातात बांबूची एक काठी होती. अशा या वेषात ते एखाद्या शेतकऱ्याप्रमाणे दिसत होते. हे गृहस्थ बॅरिस्टर आहेत यावर कोणाचा तरी विश्वास बसेल का? त्यांच्या इंग्लंडमधील वास्तव्याची खूण म्हणजे त्यांच्याजवळ असलेले घड्याळ हीच होती. हे गृहस्थ म्हणजेच मोहनदास गांधी उर्फ महात्मा गांधी. म. गांधीच दांडीयात्रेचे नेतृत्व करणार होते. लोकांनी त्यांना पहाताच 'म. गांधीकी जय' अशी घोषणा केली. कारण त्यांचा गांधीजींवर पूर्ण विश्वास होता. त्यांनी दाखविलेल्या मार्गाने भारतास स्वराज्य मिळेल अशी त्यांची खात्री होती.

गांधीजींनी आपल्या अठ्याहत्तर सहकाऱ्यांबरोबर ऐतिहासिक दांडीयात्रेस प्रारंभ केला. ते सर्वजण शिस्तीचे भोक्ते होते. गांधीजीं प्रमाणेच सत्य व अहिंसेच्या मार्गावर त्यांची निष्ठा होती. हे लोक सकाळी व संध्याकाळी कूच करीत. दुपारी व रात्री वाटेत जे गाव लागेल तेथे मुक्काम करीत. मुक्कामावर गावातील लोक त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करीत. नंतर ते चरख्यावर सूत कातीत. गांधीजी जमलेल्या जनसमुदायापुढे स्वातंत्र्ययुद्धाचा संदेश देत. जेथे जेथे हे सत्याग्रही जात तेथे तेथे लोक त्यांचे मोठ्या आदराने व भक्तिभावाने स्वागत करीत. बापूजींचे दर्शन व बापूजींची वाणी ऐकून ते स्वतःला धन्य समजत. हे सत्याग्रही पाहून मला असे वाटते

चालले सत्याग्रही, ते चालले सत्याग्रही।
ज्योतिर्मय हे जीवन त्यांचे।

चिरनूतन अन् मांगल्याचे ।
शुभसूचक संदेश उधळिती, अपुल्या निःश्वासानी ॥ १ ॥
युधिष्ठिराची सत्यप्रियता ।
अन् दधिचीचा त्याग उमाळा ।
उरीं मुनींचे तप संचरता, काय उणें भूवरी ॥ २ ॥
बलशाली मृत्युंजयि श्रद्धा ।
सत्य शांतीची विमल प्रतिष्ठा ।
समतेची अन् स्वातंत्र्याची देत जगाला ग्वाही ॥ ३ ॥
या इतिहासा साक्ष कशाची ।
आज प्रभूची, उद्या यशाची ।
साक्षहि देईल भूमी येथील रुधिराने न्हालेली ॥ ४ ॥

शेवटी या सत्याग्रहींचा जथा दांडीस पोचला. सर्वांनी समुद्रात स्नान केले. नंतर सर्वांनी समुद्राच्या पाण्याचे मीठ बनवून कायदेभंग केला.

गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह का केला? मीठ हे भारतातील सर्व लोकांच्या भोजनातील अविभाज्य अंग आहे. ते नैसर्गिक रीतीने–समुद्राच्या पाण्यापासून बनविले जाते. मग सरकारने त्यावर कर का म्हणून बसवावा? या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह सुरू केला. 'सत्याग्रही' म्हणजे सत्याचा आग्रह धरणारा. तो कोणापासूनही काहीही लपवत नाही. म्हणूनच दांडी यात्रेपूर्वी गांधजींनीं सरकारला सूचना केली होती.

## पवित्र तीर्थयात्रा

ही दांडीयात्रा म्हणजे भारताच्या दृष्टीने एक प्रकारची तीर्थयात्राच होती. या यात्रेच्या वेळी जंबुसर या गावी पंडित जवाहरलाल नेहरू गांधीजींना

भेटण्यासाठी आले. दोघांची मुलाखत झाली. त्यानंतर जवाहरलाल अहमदाबादला आले. त्यांनी विद्यार्थ्यांसमोर भाषण केले. यानंतर भारतभर सत्याग्रहास सुरवात झाली.

लोक टोळ्याटोळ्यांनी समुद्रकिनाऱ्यावर जाऊन मीठ बनवू लागले. कायदेभंग करू लागले. सरकारने या सत्याग्रह्यांविरुद्ध धरपकडीचे सत्र सुरु केले. ठिकठिकाणी लोकांना पकडून तुरुंगात टाकले. पण एका टोळीला पकडावे तर दुसरी तयार असे. शेवटी पोलिसांनी लाठीहल्ला सुरू केला. याही सत्याग्रहात स्त्रिया व मुलांनी भाग घेतला होता. सत्याग्रह थांबवता येईना तेव्हा पोलिसांनी स्त्रिया व मुलांवरही लाठीहल्ला केला. या बातम्या जेव्हा गांधीजींना कळल्या तेव्हा ते व्यथित झाले. त्यांनी 'यंग इंडिया' मध्ये ब्रिटिश राज्य हे गुंडांचे राज्य आहे असे वर्णन केले. देशभर लोकांनी 'भारतमाता की जय'च्या घोषणा सुरू केल्या. तसेच गावोगावी लोक स्वयंस्फूर्तीने प्रभातफेऱ्या काढू लागले. राष्ट्रीय गाणी व घोषणा गल्लोगल्ली ऐकू येऊ लागल्या. स्वयंसेवकांनी लाठीमार खाल्ला, गोळ्या झेलल्या पण आपला सत्याग्रह सोडला नाही. जवळ जवळ लाख स्त्रीपुरुषांना सरकारने तुरुंगात डांबले. पण सरकारने अद्याप गांधीजींना पकडले नव्हते. त्यामुळे ते बेचैन झाले. शेवटी त्यांनी गुजरातमधील धारासणा येथील मिठाच्या गोदामावर हल्ला करण्याचे ठरविले. पण सरकारने तत्पूर्वीच गांधीजींना पकडून कैदेत टाकले.

सर्व देशभर स्वातंत्र्याचे वारे पसरले. सव्वीस जानेवारी १९२९ ला रात्री नदीच्या किनारी पंडित जवाहरलाल नेहरूंनी संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा केली होती. ती पूर्ण करण्यासाठीच गांधीजींनी हा देशव्यापी मिठाचा सत्याग्रह सुरू केला.

## प्रश्न

**प्रश्न १ :** खालील प्रश्नाची उत्तरे द्या.

१) गांधीजींच्या राजकारणास 'नवा मनु' का म्हणतात ?

२) गांधीजींनी सहकार चळवळ का थांबवली ?

३) गांधीनी मिठाचा कायदा का मोडला ?

**प्रश्न २ :** अेकावर ५ ते ६ ओळी लिहा.

१) दांडी यात्रा २ ) लोकनेता

**प्रश्न ३ :** जोड्या जुळवा

| अ | ब |
|---|---|
| कायदेभंग | रावी नदी |
| चळवळ | कांती |
| तजेलदार | वर्तमानपत्र |
| यंग इंडिया | असहकार |
| संपूर्ण स्वातंत्र्य | सामुदायिक |

प्रकरण सहावे

# गांधींचे आश्रमातील जीवन

२५ मे १९१५ या दिवशी अहमदाबादपासून जवळ असलेल्या कोचराब गावी गांधींनी आश्रमाची स्थापना केली. या आश्रमात स्त्रिया, मुले सर्व रहात. देशाची सेवा करणारानी नीतीनियमांनी वागले पाहिजे. त्याने सत्य, अहिंसा या व्रताचे आचरण केले पाहिजे. आत्मक्लेशाने जुलमी माणसालाही जिंकले पाहिजे.

आश्रमातील राहाणी अगदी साधी होती. तेथे स्वदेशीचे व्रत घ्यावे लागे. शारीरिक कष्टाची कामे करावी लागत. शक्यतर शेती करावी नाहीतर दुसरा एखादा व्यवसाय करावा असा आग्रह असे. चरखा फिरवून सूत काढावे व वस्त्र तयार करावे. यावर गांधींचा भर होता.

आश्रमातल्या मुलांना शिक्षण दिले जाई. वाङ्मय प्रादेशिक भाषेतून

शिकवले जात असे. इतिहास, भूगोल, अंकगणित, बीजगणित, अर्थशास्त्र ह्या विषयाबरोबर संस्कृत, हिंदी व एक प्रादेशिक भाषा इत्यादींचे शिक्षण दिले जाई.

आश्रमातील भोजन अगदी साधे असेच होते. मिरची, मसाले अस पदार्थ वर्ज्य असत. आश्रमात सुटीचा दिवस नसे. एक दोन दिवस कार्यक्रमात बदल केला जाई इतकेच.

आश्रमात फी नसे. देणगी स्वीकारली जाई. आश्रमात पाहुण्यांचे स्वागत होई पण त्यालाही आश्रमाचे नियम पाळावे लागत. आश्रम चालवणे काही वेळा पैशांच्या अडचणीमुळे कठीण होई. असेच एकदा गांधी अडचणीत होते. एक गृहस्थ मोटारीतून आले. त्यांनी गांधींना तेरा हजार रुपये दिले व ते निघून गेले. ती व्यक्ती म्हणजेच अंबालाल साराभाई.– पुढे कोचराब येथे प्लेग उद्भवल्यामुळे गांधींनी आश्रमाची जागा बदलली. साबरमतीच्या तीरावर आश्रमाची उभारणी केली.

आश्रमात गांधींचा खादीचा प्रचार सुरू झाला. पुरुषाप्रमाणे स्त्रियांनीही खादीची साडी वापरावी असा त्यांचा आग्रह होता. खादी जड असे व धुण्यास फार त्रास होई. पण बापूंनी यावर तोड काढली. ते म्हणाले तुमच्या साड्या आम्ही धुवून देऊ ! ! मग तर झाले. सरलादेवी चौधराणी या स्त्रीने खादीची साडी प्रथम नेसली. कस्तुरबांनी लगेच तिचे अनुकरण केले. मग आश्रमातील सर्व स्त्रियाही खादीच्या साड्या नेसू लागल्या. प्रथम त्रासदायक वाटणारी खादी अल्पकाळातच सर्वांना प्रिय झाली.

आश्रमातील एकूण जीवन कष्टाचे, त्रासाचे होते. कस्तुरबांनी तेथे आत्मीयता निर्माण केली. सर्वांच्यावर त्यांनी मायेचे पांघरूण घातले.

आश्रमात सर्वांचे एकच स्वयंपाकघर असे. प्रत्येकास त्याचे काम वाटून दिलेले असे. आश्रमातील अंगणांत भाजीपाला तयार केला जाई.

तोच शक्यतो स्वयंपाकात वापरला जाई. भाजी शक्यतो विकत न आणण्याचा नियम असे. आश्रमात भोपळ्याचे पीक भरपूर येई. तेव्हा बहुतेक भोपळ्याचीच भाजी असे. अनेक स्त्रियांना ती सोसत नसे. बांनी हे धीटपणे बापूजींच्या कानावर घातले व मग फोडणी मसाला घालून भाजी केली जाई. पण बापूजी व मुले फोडणी नसलेली भाजी खात असत.

आश्रमात प्रत्येकाला ठराविक वस्तूच मिळत. विशेषतः साबण स्त्रियांना पुरत नसे. तेव्हा सर्व स्त्रियांनी अर्ज केला व ज्यास्त साबणाची त्यांत मागणी केली. त्या अर्जावर कस्तुरबांचीही सही होती. बापूजींनी तो अर्ज वाचला बांची सही पाहून ते चेष्टेने म्हणाले 'बा, तुम्ही तर आम्हा दोघातही भांडण लावून देत आहात'–लगेच त्या अर्जाप्रमाणे अधिक साबण मिळण्याची व्यवस्था झाली.

आश्रमात गांधींना भेटण्यासाठी देशातील पुढारी येत. त्यांचे स्वागत करणे, त्यांच्या सोयी पाहाणे हे सर्व काम कस्तुरबा पहात. आश्रमात सुरवातीसच बांची झोपडी असे. येणारा पुढारी बांना भेटून मग पुढे जाई.

बापूजी आश्रमाला विनोदाने इस्पितळ म्हणत. कोणी आजारी पडले तर गांधी सेवा शुश्रुषा करीत. औषधोपचारही करीत.

बापूजींना भेटीदाखल फळे येत. ती बा सर्वांना व्यवस्थित वाटत असत. बापूजी व बा आश्रमांतील सर्वांची नीट व्यवस्था पहात. बा सणवारांचेवर लक्ष ठेवीत. उपासाचे दिवसही ध्यानात ठेवून त्याप्रमाणे पदार्थ करीत. पाहुण्यापैकी कोणाला काय आवडते इकडेही बांचे लक्ष असे. राजाजींना कॉफी तर जवाहरलालना कसा चहा आवडतो हेहि बांना माहिती होते. बांच्या या मातेच्या भूमिकेमुळेच आश्रमाचे जीवन खेळीमेळीचे–आनंदाचे झाले.

आश्रमात गुजराथी, महाराष्ट्रीय, पंजाबी, सिन्धी, मद्रासी, हिंदू, मुसल-

मान सर्व एकत्र रहात. इतकेच नव्हे तर युरोपांतील लोक, जपानी व इतर देशांतील माणसेही रहात. या सर्वांना खादीच वापरावी लागे.

पहाटे चार वाजता उठावे लागे. प्रार्थना म्हटली जाई. श्लोक पाठ केले जात असत. भजन म्हटले जाई. गीतेचे पाठ होत व गांधी आपले विचार सांगत असत. आश्रमात सर्वांच्याबरोबर हरिजनही रहात. ते सर्वांबरोबर एकत्र भोजन करीत. आश्रमात स्वच्छता असे. कोठेही घाण टाकली जात नसे.

म. गांधी कोणतेही काम कमी दर्जाचे वा हलके मानीत नसत. आश्रमात प्रत्येकास स्वतःचे सर्व काम स्वतःलाच करावे लागे. गांधीजींनी सेवाव्रतच स्वीकारले असल्यामुळे नोकर ठेवण्याचा प्रश्नच नव्हता. जवळच असलेल्या तुरुंगाकडे बोट दाखवून गांधी म्हणत, "थोडेच दिवसात आपणास तिकडे रहावयास जायचे आहे. तेथे ज्या प्रकारचे कष्टाचे त्रासाचे जीवन कंठावे लागणार आहे त्याचीच आपण येथे सवय करू या. आश्रमाच्या दुसऱ्या बाजूस स्मशान. तिकडे पाहून बापूजी म्हणत एक दिवस आपणास तिकडे कायमचे राहाण्यासाठी जावे लागणार आहे. आमचे कर्तव्य आहे की देशासाठी मरण्यास आम्ही सदैव तयार राहिले पाहिजे.

आश्रमात कोणाच्या हातून जर अपराध घडला तर त्याची शिक्षा बापूजी स्वतः घेत असत. आत्मक्लेश हा या विचाराचा पाया होता. दुसऱ्याच्या हृदयपरिवर्तनासाठी स्वतः प्रायश्चित घेणे त्यांना योग्य वाटे. एकदा असेच काही आश्रमवासीयांच्याकडून दोष घडला तेव्हा म. गांधींनी सात दिवस उपोषण केले. त्यांनी दुसऱ्याचे हृदय परिवर्तन करण्याचे जे विचार मांडले होते, त्यांची ही कृती त्या विचाराचेच प्रतीक होते.

## आश्रमातील दिनक्रम

आश्रमात सर्व जण पहाटे चार वाजता उठत. त्यावेळी प्रार्थना होई. त्यानंतर बापूजी अर्धा तास परत झोपत. परत उठल्यावर ते मध पाणी घेत. सातच्या सुमारास ते फिरावयास जात. बरोबर आश्रमातील तरुण असत. पण बापूजी इतक्या भरभर चालत की इतराना क्वचित पळावेही लागत असे. फिरुन परत येताना आश्रमातील आजारी लोकांची ते विचारपूस करीत. त्यांना आवश्यक वाटले तर औषधपाणी देत. नंतर ते स्वयंपाक-घरात जात. तेथे त्यांच्या वाटणीचे जे काम असे ते पूर्ण करीत तेथेच नास्ता घेऊन ते आपल्या झोपडीत येत. यावेळी बाहेरून भेटीला आलेल्या लोकांशी ते चर्चा करीत.

बापूजी फार काटकसरी होते. ते आलेली पत्रे वाचत, त्यांना उत्तरे देत. आलेल्या पत्रांतील कागदातील कोरा भाग ते कापून ठेवत. बोटा एवढे कपटे देखील त्यांनी साठविले होते. एकदा असेच ते कागद फाडत होते. इतक्यांत त्यांचेकडे २५-२६ वर्षाचा एक तरतरीत तरुण आला. त्याने बापूजींना कागद फाडताना पाहिले व मनांत काही विचार केला. बापूजींशी न बोलता तो निघून गेला. बापूजींनी त्याला मुद्दाम परत बोलाविले. तो आला.

बापूजींनी विचारले, “ मुला तू न बोलता परत का गेलास ? ”

तो म्हणाला, “ मला वाटले माझे काम तुमच्याकडून होणार नाही. ”

बापूजींनी प्रश्न केला, “ अरे तुझे असे कोणते काम आहे ? ”

तरुण म्हणाला, “ खेडेगावात सुधारणा घडवून आणण्यासाठी मला २५ हजार रुपये पाहिजे आहेत. ”

बापू म्हणाले, “ एवढेच. तुझी योजना तर सांग. ”

त्यांनी योजना मांडली. ती बापूजींना पसंत पडली. बापूजींनी त्या तरुणास ताबडतोब एक रकमी २५ हजार रुपये दिले. आश्चर्याने थक्क झालेला तो तरुण म्हणाला, " एवढे पैसे जवळ असताना तुम्ही हे कागदाचे कपटे काय फाडत बसलात. "

यावर किंचित् हसून बापूजी उत्तरले, " अरे एवढेच काय, हजारो रुपांयांच्या हुंड्या माझ्याकडे पडून आहेत. योग्य प्रकारे काम करणाराच मला भेटत नाहीं. कागदाचे कपटेही फुकट वाया का घालवायचे ? "

पत्र वाचनानंतर गांधीजी नवजीवन, यंग इंडिया किंवा हरिजन इत्यादीसाठी लेख लिहीत. जेवणाची घंटा झाली कीं सर्वजण स्वयंपाकघरात जात. बापूजींच्या खास पाहुण्यांना बा स्वतः वाढत. बापूजींनाही वाढण्याची फार हास होती. ते मधून मधून आश्रमात वाढण्याचे कामही करीत.

जेवणानंतर बापूजी झोपडीत जात व वर्तमानपत्रे वाचीत. यावेळी बा बापूजींच्या पायाला तूप चोळत. ते थोडा वेळ झोप घेत. विश्रांतीनंतर बापूजी सूत कातत. हे काम तासभर चाले. १६० तार सूत काढण्याचा त्यांचा नियम होता. बांची साडी ही बापूजींनी कातलेल्या सुताची असे. सुतकताईनंतर आश्रमातील स्त्रिया, मुले, बालमंदिरातील मुले यांना बापू शिकवण्याचे काम करीत. हे सर्व होईतो चार वाजून जात. सूर्यास्तापूर्वीच ते भोजन करीत. त्यानंतर थोडे फिरून येत. मग सायंप्रार्थना होई. यावेळी प्रार्थनेंत रामायण म्हटले जाई. कधी कधी बापूजी प्रवचने करीत. व साधारणपणे ते रात्री ९-९॥ वाजता झोपत. चळवळ, अधिवेशन अशा प्रसंगी त्यांच्या या कार्यक्रमात थोडा फार बदल होई. नाहीतर बापूजींची ही दिनचर्या अगदी वेळेवर पार पडे. आपले प्रत्येक काम वक्तशीरपणे पूर्ण करण्याची बापूजींची सवय होती.

## प्रश्न

प्रश्न १ : खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

१) गांधींनी आश्रमाची स्थापना का केली ?

२) बापूजींचा दिनक्रम कसा होता ?

३) बापूजी आश्रमाला इस्पितळ का म्हणत ?

४) आश्रमातील स्त्रियांची कोणती तक्रार होती ? ती कशी दूर झाली ?

प्रश्न २ : गांधीजींकडे आलेल्या तरुण मुलाचा अनुभव तुमच्या शब्दात सांगा. ?

प्रश्न ३ : (अ) आश्रमातील लोकांचा दिनक्रम सांगा.

(ब) आश्रमात कोणकोणते लोक येत असत ?

मराठी ... वाचनालय शाखा.

प्रकरण सातवे

# गांधीजींचे कौटुंबिक जीवन

## गांधी कुटुंब

गांधीजींचा विवाह वयाच्या तेराव्या वर्षी झाला. त्यांच्या पत्नीचे नाव कस्तुरबाई होते. महात्माजींचे वडील व कस्तुरबांचे वडील एकमेकांचे जिगरदोस्त होते. गांधीजींचे वडील पोरबंदरचे दिवाण होते. ही दिवाणगिरी त्यांचे कुटुंब सधन व सुसंस्कृत होते. गांधीजींचे वडील करमचंद हे धार्मिक प्रवृतीचे होते. तसेच सडेतोड बोलणारे व स्पष्ट वक्ते म्हणून प्रसिद्ध होते. गांधीजींची आई पुतळीबाई या एक आदर्श माता होत्या. त्यांची धार्मिक प्रवृत्ती व सत्यवचन यांचा गांधीजींच्या मनावर खोल परिणाम झाला. म्हणूनच पुढे ते महान बनले.

## समसमा संयोग

गांधीजींच्या पत्नी कस्तुरबाई याही पोरबंदरच्या. त्यांचे वडील गोकुळदास हे पोरबंदरचे प्रख्यात व्यापारी होते. त्यांच्या आईचे नाव राजकुवर होते. हेही कुटुंब श्रीमंत व सुसंस्कारित होते. कुटुंबात एकोपा असे. 'घर' म्हणजे प्रेमाचा ठेवा हे कस्तुरबाईला समजले. आदर्श गृहिणीचा आदर्श तिने मातेपासूनच घेतला. परस्परांवरील निष्कपट प्रेम, स्वार्थत्याग या गोष्टी कस्तुरबाला तिच्या आईकडून मिळाल्या. यामुळेच पुढील जीवनात गांधीजी देशाचे पिता बनले तेव्हा त्याही देशाच्या खऱ्याखुऱ्या 'बा' माता बनल्या. ह्या दांपत्यावर बालपणी सुसंस्कार झाल्यामुळेच ते आपल्या भावी जीवनात फारच उत्तम कार्य करू शकले. या उभयतानी भारतालाच नव्हे तर जगाला नवीन मार्ग दाखवला. या उभयतांचे त्यागी जीवनं हीच आपल्यापुढील महान् शिकवण आहे.

## बांचे शिक्षण

गांधीजींचा विवाह झाला त्यावेळी भारतात व विशेषतः काठेवाडात स्त्रीशिक्षणाची पद्धत नव्हती. स्वतः गांधी पुरोगामी विचारांचे होते. त्यांना कस्तुरबाईने शिकावे असे वाटे. पण नामवंत घरंदाज घराण्यात हे कसे जमणार? तसेच कस्तुरबाईंचे वय लहान असल्याने त्या सारख्या माहेरी जात. बांना स्वतःहून शिक्षणाची आवड नव्हती. त्यामुळे गांधीजींनी त्यांना शिकवण्याचा प्रयत्न केला पण तो बराचसा असफल झाला. त्यातच तरुण वयाच्या मोहामुळे गांधीजीही त्यांच्यावर शिक्षणाची सक्ती करू शकले नाहीत.

कस्तुरबा या पतिपरायण आर्य स्त्री होत्या. पतीच्या इच्छेचे पालन करा-

रा. प्र. दां. लाडे, पालमराठी ग्रंथालय
ग्रं. क्र. ९२८७३
बा. वा.


वयाचे हे त्यांच्या जीवनाचे ध्येय होते. म्हणूनच काही दिवसानंतर त्यानी अभ्यासास सुरुवात केली. सुरवातीस त्याना फार जड गेले. पण हळूहळू त्याना शिक्षणाची गोडी लागली. त्यानी रामायण, गीता यांचा अभ्यास केला. गुजराती भाषा त्यानी आत्मसात केली. त्यांच्याच इच्छेमुळे संक्षिप्त तुलसीरामायण बनविण्याची कल्पना गांधीजींना सुचली. आगाखान महालात (तुरुंगात) असताना गांधीजींनी त्याना नैसर्गिक भूगोल व इतिहास शिकविला. वयाच्या पंचाहत्तराव्या वर्षी अभ्यास करणाऱ्या या महिलेचे कोणाला बरे कौतुक वाटणार नाही? एवढेच नव्हे तर आश्रमात विविध जातींचे लोक येत. त्यांच्याशी बोलता यावे म्हणून त्या मोडके तोडके इंग्रजीही बोलू लागल्या. इंग्रजीचाही त्यांनी पद्धतशीर अभ्यास केला.

## आदर्श सून

गांधीजी १८८७ मध्ये मॅट्रिक झाले. सर्वांच्या मते त्यांनी बॅरीस्टर बनावे असे ठरले. त्याप्रमाणे गांधीजी इंग्लंडला गेले. कस्तुरबाईंना त्यावेळीं हरिलाल नावाचा मुलगा झाला होता. त्या मुलाला घेऊन त्या आपल्या सासूजवळ राहिल्या. त्यांनी मनोभावे वडील मंडळींची सेवा केली. त्यांची मर्यादशील व विनम्र वागणूक सर्वांना आवडे. विशेषतः सासूच्या तर त्या गळ्यातील ताईत बनल्या. नम्र व प्रेमळ वागणुकीने त्या सर्वांच्या आवडत्या बनल्या. भारतीय आदर्श महिलेचे त्या साक्षात् उदाहरण होत्या.

गांधीजी बॅरीस्टर होऊन परतले आणि त्यांच्या दांपत्यजीवनाला सुरवात झाली. त्यांनाही पत्नी ही आपली मालमत्ता आहे, तिने आपले सारे ऐकावे असे वाटे. या त्यांच्या विचाराचा परिणाम म्हणूनच या पती-पत्नीत खटके उडत. शिवाय गांधीजी फारच संशयी होते. बा जरा कुठे बाहेर गेल्या की ते त्या परतल्या की प्रश्नांची सरबत्ती

करीत, चिडत, आरडत ओरडत. पण बा संयमी, विवेकशील व शांत होत्या. त्यांनी बापूजींना उलट उत्तर दिले नाही; पण बाहेर जायचेही सोडले नाही. 'कर नाही तर डर कशाला ?' असा त्यांचा विचार होता. त्यांच्या दृढनिश्चयी व शांत स्वभावानेच त्या बापूजींचे मत बदलू शकल्या.

## खरी सहधर्मचारिणी

गांधीजींना दक्षिण आफ्रिकेत अब्दुल्ला कंपनीचे बोलावणे आले. ते यावेळी पत्नी व मुलांसह तेथे गेले. बा व बापू यांचे यावेळी खरे वैवाहिक जीवन सुरू झाले. त्यावेळी गांधीजींच्या जीवनात अनेक प्रकारची परिवर्तने झाली. त्यांनी काही प्रयोग केले. या प्रत्येक वेळी बांनी बापूजींना संपूर्ण सहकार्य दिले. काही बाबतीत तर त्या त्यांच्या शिष्या बनल्या. गांधीजींनी आपल्या, पत्नीच्या व मुलांच्या पोशाखात परिवर्तन केले. बांनी पार्शी साडीचा सहजपणे स्वीकार केला. पण बूटमोजे वापरण्यास विरोध केला. पण शेवटी त्यांनी बूटमोजे वापरण्यास सुरवात केली. बांच्या स्वभावाचा विशेष हा होता की त्या एकदा एखादी गोष्ट ठरवीत तेव्हा संपूर्णपणे त्याचे पालन करीत. गांधीजींच्या घरी स्वावलंबन होते. घरात जास्तीत जास्त साधेपणा असे. भाकरीसाठी जे पीठ लागे तेही घरीच दळले जाई. पीठ दळण्यासाठी सात पौंडाचे जाते. गांधीजींनी खरेदी केले होते. दळण्याचे काम घरातील पुरुष व मुले करत. मुलांना यामुळे व्यायाम होई व त्याचे मनोरंजनही होई. घरातील इतर सर्व काम बा स्वतः करीत.

## मी स्वतः मन आवरले आहे

एकदा बा घरात काम करत होत्या. त्यांनी साधीच साडी नेसली

होती. त्यावेळी त्यांच्याकडे एक नातेवाईक भेटावयास आले होते. कस्तुरबाला काम करताना पाहून ते म्हणाले, "अरे मोहनदास, तू तर सारे जीवनच बदलले आहेस. या कस्तुरबाने तर काहीच ऐश्वर्य भोगले नाही असे दिसते." गांधीजी हसत हसत म्हणाले, 'वा! मी काय तिला रेशमी जरीच्या साड्या वापरु नको असे थोडेच म्हणतोय! ती दागिने सुद्धा मागेल तर बनवीन."

कस्तुरबा पुढे येऊन चटकन् म्हणाल्या, "हो तुम्ही कशाला नाही म्हणाल! पण तुम्ही बनणार साधुसंन्यासी अन् मी काय नटवेपणा करू? यासाठीच मी माझे मन आवरून धरले आहे." या एका वाक्यातून बांच्या यशस्वी जीवनाचे मर्म आपणास कळते.

## बांशी संघर्ष

दरबानमध्ये गांधीजींचे कारकूनही त्यांच्या घरी रहात. गांधीजी त्यांच्याशी घरातील सदस्यांप्रमाणेच वागत. हे घर युरोपियन पद्धतीचे होते. प्रत्येक खोलीत रात्री लघवीसाठी भांडे वापरण्यात येई. हे घरातील प्रत्येकजण स्वतः साफ करी. नोकरांना असले काम सांगत नसत. एकदा एक ख्रिश्चन कारकून त्यांच्याकडे राहावयास आला. त्याचे आईवडील पंचम जातीचे होते. या नव्या कारकुनाने हे भांडे स्वतः उचलले नाही. अर्थातच हे उचलण्याचे काम यजमान किंवा यजमानीणबाईंनी करावयास हवे. बांची धार्मिक विचारसरणी सनातनी होती. त्या स्वतः ते भांडे उचलेनात. तसेच बापूजींनी ते भांडे उचलणेही त्यांना पसंत पडेना. यामुळे दोघांचा खटका उडला. शेवटी त्याचे पर्यवसान म्हणजे बापूजींनी बांना घराबाहेर काढले. पण बांच्या समजूतदारपणामुळे तो प्रसंग टळला. बांची सहनशीलता अशावेळी कसोटीला लागे.

आफ्रिकेत असतानाच एका अर्थी गांधीजींचे कौटुंबिक जीवन समाप्त झाले. व्यापक अर्थाने म्हणावयाचे तर त्यांच्या कुटुंबाची व्याप्ति वाढली. सारे जगच त्यांचे कुटुंब बनले. कारण त्यांनी ब्रह्मचर्यपालनाचे व्रत स्वीकारले. याही बाबतीत कस्तुरबांचे संपूर्ण सहकार्य लाभले. त्यामुळेच गांधीजी त्यात यशस्वी झाले, असे स्वतः गांधीनीच कबूल केले आहे.

भारतात आल्यावर बापूजींनी आश्रमाची स्थापना केली. या आश्रमचे बापूजी पिता बनले व बा माता बनल्या. हा आश्रम जातिधर्मनिरपेक्ष होता. गांधीजींना पुत्र होते पण कन्या नव्हती. तेव्हा त्यांनी आश्रमातील एक हरिजन मुलगी 'लक्ष्मी' हिला दत्तक घेतले. यावरून त्यांचे विशाल हृदय दिसून येते. बापूजींनी साऱ्या भारताला किंबहुना साऱ्या जगाला जिंकले. पण त्यांच्या जीवनात त्यांना स्वतःच्या मुलावर मात्र आपला पगडा बसवता आला नाही.

## पुत्राशी संघर्ष

गांधीजींचा सर्वात थोरला मुलगा हरिलाल. वास्तविक मोठा मुलगा म्हणजे पित्याचा उजवा हात. पण हरिलालचे बापूजींशी कधीच पटले नाही. त्याचा बापूजींवर फार मोठा आक्षेप होता की बापूजींनी आपल्या शिक्षणाची हेळसांड केली. बापूजींचा आधुनिक शिक्षण प्रणालीवर विश्वास नव्हता. त्यांचे स्वतःचे शिक्षणाचे प्रयोग चालत. पण त्यांना फारच थोडा वेळ मिळे. बापूजी म्हणत, "शिक्षणाची काय आवश्यकता आहे? आश्रमातील लोकांची सेवा करणे हेच खरे आपले कर्तव्य. माणुसकीचे पालन हेच खरे आपले कर्तव्य. माणुसकीचे पालन हेच खरे शिक्षण." पण हरिलाल म्हणे, "तुम्ही बॅरिस्टर झालात म्हणूनच ना हे देशकार्य करू शकलात?"

शेवटपर्यंत पितापुत्रांचे जमले नाही. हरिलाल त्यांना सोडून भारतात

गेला. पण चुकीच्या सल्ल्यामुळे लग्न मात्र करून बसला. पत्नीच्या मृत्यू-नंतर तो फारच भरकटला. पण आईविषयी मात्र त्याच्या मनात थोडीशी आत्मीयता होती.

एकदा बा व बापूजी आगगाडीतून प्रवासाला चालले होते. "माता कस्तुरबा की जय" अशी घोषणा ऐकू आली. बांनी उत्सुकतेने बाहेर पाहिले.

प्लॅटफॉर्मवर सुकलेल्या चेहेऱ्याचा हरिलाल उभा होता. त्याने बांना एक सुकलेले मोसंबे दिले. तो म्हणाला, "बा, हे तू खा." बापूजी हळूच पुढे येऊन म्हणाले, "अरे मला काही आणले नाहीस का?"

हरिलाल जोराने म्हणाला, "नाही. तुमच्यासाठी काही आणले नाही. माझ्या बाच्यामुळेच तुम्हाला मोठेपणा प्राप्त झाला आहे." बापूजी हसत उत्तरले, "हो रे, ते मात्र खरे!"

बाचे हरिलालशी बोलणे चालू होते तोच गाडी सुटली. हरिलालला काही दिले नाही म्हणून बा चुटपुटल्या.

गांधीजी तत्त्वनिष्ठ होते. स्थितप्रज्ञ होते. म्हणूनच हे सारे हल्ले ते पचवू शकले.

## गांधीजींचा वक्तशीरपणा

गांधीजी शिस्तीचे भोक्ते होते. प्रत्येक काम वेळच्यावेळी झाले पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता. ते स्वतः शिस्तीची चाकोरी सोडीत नसत. कर्तव्यपालन आणि शिस्त हा त्यांच्या जीवनाचा आत्मा होता. त्यामुळेच आश्रमात शिस्तीचे वातावरण असे. गांधीजींनी आश्रमाला शिस्त व शिकवण दिली. तर बांनी आईची माया दिली. प्रेमाचा ओलावा दिला.

## गांधी आणि विनोद

गांधी प्रवृत्तीने गंभीर असले तरी विनोदाचे त्यांना वावडे नव्हते. ते ज्यावेळी प्रवासास जात त्यावेळी काही ठिकाणी मजेदार प्रसंग घडत. असहकार आंदोलनानंतर त्यानी भारताचा झंझावाती दौरा काढला. म्हैसूर जिल्ह्यातील शिमोगा गावी त्यांनी सभा घेतली. सभा संपल्यावर कार्यकर्ते त्यांना म्हणाले, " बापूजी, तुम्ही गिरसप्पाला जा. "

बापूजी म्हणाले, " का ? "

लोक म्हणाले, " अहो तेथे ( जोग फॉल्स ) गिरसप्पाचा धबधबा शरावतीच्या काठी आहे. पाणी खूप उंचीवरून खाली पडते. ते रमणीय दृश्य आहे. "

बापूजी म्हणाले, " मी त्याच्यापेक्षाही उंचीवरून पडणारे पाणी पाहिले आहे. "

लोक म्हणाले, " कोठे "

" आकाशातून " बापूजी उत्तरले अन् एकच हशा पिकला.

याचवेळी बापूजी सीलोनमधील एका गावी गेले. तेथे एका गृहस्थानी कस्तुरबा तुमच्या माता का? असे विचारले. गांधीजी हसत हसत म्हणाले " हो "

दुसरे दिवशी सभेत त्यांनी त्याचा उल्लेख केला. ते म्हणाले, " ही कल्पना फारच चांगली आहे. जवळ जवळ चाळीस वर्षापूर्वी मी पोरका झालो. गेल्या तीस वर्षांपासून कस्तुरबाने माझ्या आईची उणीव भरून काढली आहे. ती माझी आई, मैत्रीण, परिचारिका व स्वयंपाकीण बनली आहे. आमचे उभयतांचे जीवन अगदी एकरूप झाले आहे. तिच्या समजुतदारपणामुळे आमचे जीवन यशस्वी झाले आहे. आम्ही आपा-

पसात तडजोड केली आहे. मानसन्मान मी उपटावयाचा व माझी उस्तवारी तिने करावयाची!

गांधीजींनी सेवाधर्माचे पालन करता करता आश्रमवासियानाही शिकवण दिली. त्यांनी सारे जग आपले घर मानले. त्यामुळे वैयक्तिक संपत्ती त्यांनी मुळीच जमविली नाही. त्यांना वेळोवेळी ज्या भेटी मिळत त्यांचा उपयोग ते सार्वजनिक कार्यासाठी करत असत. त्यांनी आपल्या जीवनात समानता, सत्य व अहिंसेचा अवलंब केला. निस्वार्थीपणा तर त्यांच्या स्वभावात ओतप्रोत भरलेला होता. कारुण्य व प्रेम हा त्यांचा स्थायीभाव होता. ते डामडौलाचा तिरस्कार करीत. स्वतःला जे पटले त्याचा स्वीकार ते निधड्या छातीने करीत.

१९२८ साली त्यांचा मुलगा रामदास याचा विवाह होता. पण हा विवाहाचा सोहोळा अगदी साधेपणाने पार पडला. वाजंत्री, जेवणावळ वगैरेचा मुळीच डामडौल नव्हता. गांधीजींनी अहेर म्हणून ज्या वस्तू दिल्या त्यावरून त्यांची वृत्ती दिसून येते. गांधीजींनी रामदासला एक मंगल माला, भगवद्गीता, आश्रम भजनावली, दोन टकळ्या दिल्या. जावयाला सासूबाईंनी एक चरखा भेट दिला. विवाहसमारंभ आनंदाने पार पडला.

## बापूंचा उपदेश


विवाहसमारंभानंतर बापूजी रामदासला म्हणाले, "या क्षणापर्यंत तू माझ्याशी सत्यधर्माने वागला आहेस. साऱ्या जगाने तुझी फसवणूक केली तरी तू कोणाचीही फसवणूक करणार नाहीस याची मला खात्री वाटते. आपले सर्व जीवन तू सत्यनिष्ठेने व्यतीत कर. तुझ्या पत्नीची प्रतिष्ठा सांभाळणे तुझ्या हाती आहे. तू स्वतःला तिचा मालक न समजता खराखुरा मित्र समज: आपल्या मातृभूमीची सेवा करण्या-

साठी तुम्ही आपले आयुष्य वेचावे. आपण दरिद्रीनारायणाचे व्रत अंगिकारिले आहे ते ध्यानात ठेव. गरिबांप्रमाणेच तुम्हीही निढळाच्या घामाने चरितार्थ चालवावा. एकमेकांसाठी तुम्ही आनंदाने कष्ट करावेत. भगवद्गीता ही मला अमूल्य रत्नांची खाण वाटते तशीच तुम्हालाही वाटो. सबंध आयुष्यभर ती तुम्हाला मार्गदर्शन करो. सेवावृत्तीने जगण्यासाठी परमेश्वर तुम्हा उभयताना उदंड आयुष्य देवो."

गांधीजींनी देशकारण केले. सारे भारतीय त्यांचे कुटुंबीय बनले. तरी देखील कस्तुरबांबद्दल त्यांच्या मनात आदराचे स्थान होते. आगाखान महालात कस्तुरबांचा शेवटचा आजार होता. त्यांच्या तोंडातून थुंकी बाहेर येई. तेव्हा स्वतः बापूजींनी सुशीलाबेनला चार रुमाल बनवावयास सांगितले. या रुमालानी परिचारिका बांचे तोंड पुसे. बापूजी स्वतः ते रुमाल धुवत. इतर कुणालाही ते रुमाल धुऊ देत नसत. कोणी हटकले तर ते म्हणत, "आयुष्यभर तिने तिचे शरीर माझ्यासाठीच झिजविले. आता एवढी तरी तिची सेवा माझ्या हातून घडू दे."

## मणीभवन

मुंबापुरीत म. गांधी लॅबर्नम रोडवरील मणीभवनमध्ये उतरत. टुमदार छोट्याशा त्या इमारतीला आता आगळेच पावित्र्य आले आहे. 'गांधी स्मारक निधी' या संस्थेने ती सर्वच इमारत विकत घेतली असून गांधी जीवनाचे विविध पैलू दिसावेत अशी तेथे खास योजना केली आहे. दुसऱ्या मजल्यावर ज्या खोलीत बापूजी बसत ती खोली तर पूर्वी होती तशीच अजूनही ठेवली आहे. गांधीजी ज्या गादीवर बसत असत ती गादी, त्यांच्या खडावा, त्यांची काठी, त्यांचा चरखा, त्यांचे लिहिण्याचे साहित्य, त्यांचा चष्मा व इतर साहित्य तसेच सुरक्षित ठेवले आहे. याशि-



मणीभवन मधील म. गांधींच्या काही वस्तु

वाय साबरमती व सेवाग्राम येथील आश्रमांच्या प्रतीकृती तेथे पहायास मिळतात. गांधीजींनी लिहिलेले वाङ्मय व गांधी जीवनावरील इतरानी लिहिलेली पुस्तके यांचे तेथे वाचनालय आहे. मणीभवन म्हणजे गांधी-

जींच्या स्मृतींना उजाळा देणारे एक पवित्र ठिकाण! मुंबई पहायला येणाऱ्यांनी या पुण्यस्थानाला भेट देऊन गांधीजींच्या स्मृतीला वंदन केले म्हणजेच त्यांची मुंबईयात्रा पूर्ण झाली.

## प्रश्न

**प्रश्न १ :** उत्तरे द्या.

१) बापूजींनी बांना शिकविण्याचा कसा प्रयत्न केला?

२) बा सर्वांच्या आवडत्या का झाल्या?

३) बांनी आपल्या मनावर ताबा का ठेवला?

४) बापूजींचा पुत्राशी संघर्ष का झाला?

५) मणीभवन हे गांधीजींच्या स्मृतींना उजाळा देणारे एक पवित्र ठिकाण आहे असे का म्हणतात?

**प्रश्न २ :** एकावर ५।६ ओळी लिहा.

१) कस्तुरबांचा स्वभाव  २) गांधीजींचा सेवाधर्म

३) बापूजींची पत्नी भक्ति  ४) मणी भवन

**प्रश्न ३ :** कारणे सांगा—

१) बांना आदर्श गृहिणी म्हणत.

२) गांधीजी द. आफ्रिकेत गेले.

३) द. आफ्रिकेत गांधीजींचे कौटुंबिक जीवन समाप्त झाले.

४) गांधीजींचा बाशी संघर्ष झाला.

प्रकरण आठवे

# गांधीजींचे उपवास

म. गांधीनी अहिंसेचे व्रत घेतले होते. सत्याच्या मार्गाने जायचे असा निर्धार केला होता. ज्यामुळे आपले म्हणणे अधिक प्रभावीपणाने मांडता येईल असे उपाय त्यांनी शोधून काढले. या फार प्रभावी उपायापैकीच उपवास हा एक उपाय होता. म. गांधीनी अनेक कारणासाठी उपवास केले. त्या उपासाने त्यांचे आत्मिक सामर्थ्य वाढले आणि प्रतिस्पर्धी अस्वस्थ झाले. उपवास हे गांधीजींचे एक प्रभावी शस्त्र ठरले.

म. गांधीनी हे नवीनच अस्त्र शोधले. प्रतिपक्षाचे हृदयपरिवर्तन करायचे या भूमिकेतून त्यांनी काही उपवास केले. काही उपवास आश्रमातील तरुणांनी केलेल्या अयोग्य वर्तनासाठी त्यांनी केले. त्या आश्रमातील व्यक्तीचे वर्तन सुधारावे, कृतकर्माचा त्याला पश्चात्ताप व्हावा व त्याचे दोष जाऊन तो

उत्तम रीतीने शिस्तबद्ध वागू लागावा असा त्या उपवासाचा हेतू असे. तर काही उपवास त्यांनी आत्मशुद्धीसाठी केले. आपण पवित्र असू, सत्याच्या मार्गाने जाणारे असू तर प्रतिस्पर्धीही नामोहरम होतो. तेव्हा आपले पावित्र्य वाढावे, आत्मिक बल अधिक उजळावे, असा त्या उपवासाचा उद्देश असे.

अहमदाबाद येथील मजूर लोकांचा पगार फार कमी होता. तेव्हा त्यांच्या पगारात योग्य ती वाढ करावी असे गांधीजींनी मालकांना कळविले. पण त्यांच्या अपेक्षप्रमाणे पगारवाढ देण्यात आली नाही. मजुरांनी जी चळवळ सुरू केली त्यात काही दोष होतेच. गांधीजींनी संपातील लोकाना धीर देण्याचा प्रयत्न केला. ' मजुरांनी आपल्या शपथा पाळल्या नाहीत तर आपण अन्नाच्या कणालाही स्पर्श करणार नाही " अशी घोषणा केली. त्याचा परिणाम मजुरांचेवर झाला. त्यांनी चुकांबद्दल गांधीजींची क्षमा मागितली व शपथ पाळण्याचे वचन दिले. तरीही संपाचा निकाल लागेपर्यंत अन्न न घेण्याचा त्यांनी निर्धार केला. १२ मार्चला उपोषणाचा पहिला दिवस होता. अनेकांनी गांधींच्या उपोषणास सहानुभूती म्हणून उपोषण केले. तीनच दिवसानी गिरणीमालक तडजोडीस तयार झाले. तेव्हा गांधीजींनी आपले उपोषण सोडले. अशा रीतीने हृदयपरिवर्तनाचे उपोषण हे यशस्वी शस्त्र ठरले.

महात्माजींनी १ ऑगस्ट १९२० या दिवसापासून असहकारितेची चळवळ करण्याचे ठरविले. ३१ जुलै हा पूर्व दिवस म्हणून पाळण्याचे ठरले. त्या दिवशी सर्वांनी उपवास व प्रार्थना करावी अशी सूचना गांधींनी केली. या उपवासासंबंधी ते म्हणाले " ज्या थोर विभूतींनी जगांत मोठी कामे केली त्यांनी उपवास व प्रार्थना याच्या जोरावर सामर्थ्य मिळविले. या बाबतींत कोठे अपयश आलेच असले तर या गोष्टी अन्तःकरणापासून केल्या नसतील. आपण सर्वजण या व्रताचे मनापासून पालन करु या.

चुका करतच आपण शिकतही असतो. आपण शिस्त पाळू या. अनत्याचार हा तर चळवळीचा आत्मा आहे."

या चळवळीचा जोर वाढत गेला. हजारो तरुण यात सामील झाले. गांधीजींनी व अन्य पुढाऱ्यांनी तुफान दौरे केले. जनतेत शांतता राखण्याचा प्रयत्न त्यांनी चालूच ठेवला. सरकारने दडपशाहीला सुरवात केली. काही मुलकी नोकरांनी नोकऱ्या सोडल्या. हळू हळू चळवळ जोरात वाढू लागली. इंग्लंडचे युवराज भारतात येणार होते त्यावर काँग्रेसने बहिष्कार घालण्याचे ठरवले. परळला परदेशी कापडाची प्रचंड होळी पेटवली. तेथे गांधीजींनी आपण बार्डोलीस सार्वत्रिक सविनय कायदेभंग करणार असल्याचे जाहीर केले. पण हे भाषण चालू असतानाच मुंबईच्या अन्य भागांत गडबड झाल्याची बातमी आली. गांधी लगेच तिकडे गेले. एक पोलीस चौकी जाळण्यात आली होती व चार पोलिसाना ठार मारले होते. हे पाहून गांधीजींची खात्री झाली की ही चळवळ आता शांततेने, अहिंसेच्या मार्गाने पुढे नेणे शक्य नाही. दुसऱ्या दिवशीतर दंग्याची आग अधिकच भडकली. म. गांधींनी चळवळ स्थगित केल्याचे जाहीर केले व १९ रोजी आपण उपोषण करणार असल्याची घोषणा केली. त्याचा परिणाम होऊन दंगल शमली व शांतता प्रस्थापित झाली असे पाहून दि. २३ रोजी गांधीजींनी उपोषण सोडले.

म. गांधींनी गोलमेज परिषदेत अल्पसंख्य लोकांच्या हक्काचा प्रश्न चर्चिला गेला. सरकारने त्यांना वेगळा मतदार संघ देण्याचे योजले. ही कल्पना म. गांधीना मुळीच पटली नाहीं. कारण अस्पृश्य हे हिंदूच होते. त्यांनी ब्रिटिश पंतप्रधानास पत्र पाठवून कळविले, "या वेगळ्या मतदार संघास विरोध म्हणून मी दि. २० सप्टेंबर १९३२ पासून प्राणांतिक उपोषण करणार आहे. केवढे हे धाडस! मनाची व शरीराची तयारी

किती प्रचंड असली पाहिजे! जनतेच्या कल्याणासाठी आत्मक्लेश सहन करण्याचा गांधीजींचा मुळी बाणाच होता!!

गांधीजींच्या उपोषणाची बातमी भारतात वाऱ्यासारखी पसरली. जवाहरलाल नैनीच्या तुरुंगांत होते. या बातमीने त्यांना धक्काच बसला त्यांना काय करावे ते मुळीच सुचेना. म. गांधींनी त्यांना कळवले, "हा उपवास मी परमेश्वरी आदेशानुसार करीत आहे. तुम्ही काळजी करू नये. आजपर्यंत अनेक वर्षे आपण अस्पृश्याना वाईट रीतीने वागवले आहे, पण माझ्या या उपवासाने आणि आत्मबलिदानाने जर हिंदूच्या मनोवृत्तीत व आचरणात क्रांती घडली तर माझे बलिदान सार्थकी लागेल." अस्पृश्य समाजास पूर्वी नेता नव्हता. आता डॉ. आंबेडकरांसारखा विद्वान पुढारी त्याना लाभला. पूर्व आयुष्यात आंबेडकराना अत्यंत दुःख, अपमान व क्लेश सहन करावे लागले होते. गांधीजींनी उपोषण सुरू करताच डॉ. आंबेडकर त्यांना भेटण्यासाठी येरवड्याच्या तुरुंगात गेले. आंबेडकरांचा गांधीमार्गावर विश्वास नव्हता. त्यांना दया नको होती हक्क पाहिजे होता.

डॉ. आंबेडकर गांधीजींना म्हणाले, "तुम्ही आमच्याशी अयोग्य असेच वागत आहात." यावर म. गांधी म्हणाले, "वर वर पहाता तुम्ही म्हणता तसेच वाटते. दुसऱ्याशी अयोग्य रीतीने वागण्याचेच जणू माझ्या दैवी लिहिलेले दिसते. पण माझा सल्ला असा की आपण आपले हे मतभेद आपापसात विचार विनिमय करून मिटवू या. हे मतभेद मिटविण्यासाठी दुसऱ्या कोणाची मदत घेणे इष्ट ठरणार नाही. डॉ. आंबेडकर त्यावर म्हणाले," माझा सवर्ण हिंदूच्यावर विश्वासच राहिला नाही.

वादविवाद करून हा प्रश्न सुटणार नव्हता.

जनतेवर गांधीच्या उपवासाचा जबरदस्त परिणाम झाला. हजारो देवळे अस्पृश्यांसाठी खुली झाली. २२ सप्टेंबरला म. गांधींची प्रकृती एकदम

विघडली. त्यांना स्ट्रेचरवरून हलवावे लागे. भारताचेच नव्हे तर सर्व जगाचे डोळे त्यांच्या उपोषणाकडे लागले होते. त्यांच्या प्रकृती विषयी साऱ्यांना अतिशय चिंता वाटू लागली. म. गांधीच्या प्रकृतीस आराम पडावा म्हणून गावोगाव प्रार्थना झाल्या ! शेवटी उपवासाच्या ५ व्या दिवशी कराराचा मसुदा म. गांधी व डॉ. आंबेडकर यांनी तयार केला व तो उभयता मान्य करण्यात आला. इतर पुढाऱ्यांनीही तसेच सरकारनेही या करारास मान्यता दिली. हा करार इतिहासात 'पुणे करार' या नावाने ओळखला जातो.

कविवर्य रवींद्रनाथ टागोर म. गांधींना भेटण्यासाठी म्हणून मुद्दाम कलकत्त्याहून पुण्यास आले. टागोर म्हणतात "I have come floating on the tide of good news."



शांतीनिकेतनमध्ये म. गांधी, कस्तुरबा व रविंद्रनाथ टागोर चर्चा करताना असे होते...५

म. गांधींनी या उपोषणानंतर हरिजनांसाठी कार्य करण्याचे ठरविले. ‘ हजारो वर्षे हरिजनांनी जे अपरंपार दुःख भोगले आहे त्या मानाने मी या उपोषणात काहीच दुःख सोसले नाही ’ असे गांधी या उपोषणासंबंधी म्हणाले. त्यांनी ‘ हरिजन संघाची ’ स्थापना केली. देशांतील अनेक ठिकाणाहून त्यासाठी वर्गणी जमा केली.

## प्रश्न

प्रश्न १ : खालील प्रश्नांची उत्तरे द्या

१) गांधीजींनी कोणते व्रत घेतले होते ? का ?

२) गांधीजी उपवास का करीत ?

३) गांधीजींनी ‘असहकार’ चळवळ स्थगित का केली ?

प्रश्न २ : म. गांधी व आंबेडकर यांच्यात काय चर्चा झाली ? त्याचा परिणाम काय झाला ?

प्रश्न ३ : रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

१) उपवासाने·········सामर्थ्य वाढले.

२) ·········हा चळवळीचा आत्मा आहे.

प्रश्न ४ : टागोर पुण्याला काय म्हणाले ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम........ दि..................
क्रमांक.............. दि..................

प्रकरण नववे

# गांधीजींची प्रभावळ

महात्मा गांधी असामान्य पुढारी बनले. ते असामान्य कसे बनल ? तर सतत परिश्रम, चिकाटी, सत्य व सदाचरण यांच्या कार्यवाहीमुळे. महान् आत्मे फक्त स्वतःचेच जीवन उजळून टाकतात असे नव्हे, तर आपल्या-बरोबर ते इतरांचे जीवनही गतिमान करतात. महात्माजींचे जीवन सूर्या-प्रमाणे होते. त्यांचे तप प्रखर होते. श्रद्धा दृढ होती व कार्य परिश्रमांचे होते. सूर्याला जशी सूर्यमाला असते तसेच गांधींनीही आपल्या कार्यास गती आणण्यासाठी सहकारी मंडळी जमवली होती.

गांधी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परत आले. त्यांनी भारताचा दौरा केला. यावेळी राजकारणात पडावयाचे नाही केवळ सामाजिक सुधारणा करावयाच्या असे बंधन त्यांनी स्वतःवर घालून घेतले होते. १९१६ साली

फेब्रुवारीत हे बंधन संपले. याच सुमारास लखनौ येथे भारतीय राष्ट्रीय सभेचे अधिवेशन भरले. हे अधिवेशन फारच महत्त्वाचे होते. जहाल मवाळ एक झाले.

१९०७ साली राष्ट्रीय सभेत जहाल व मवाळ अशा दोन विचारधारा निर्माण झाल्या. त्यांच्यातील संघर्ष विकोपाला गेले. शेवटी ते फुटून स्वतंत्र झाले. १९१६साली या दोन्ही पक्षात समझोता झाला. त्यामुळेच हे अधिवेशन फार गाजले. याचवेळी मुस्लिम लीग व राष्ट्रीय सभा यांच्यातही करार झाला. हाच 'लखनौ करार' होय. महात्मा गांधीही या अधिवेशनात सामील झाले. गांधीजींबद्दलच्या गोष्टी सर्वांनी ऐकल्या होत्या. त्यामुळे सर्वांना त्यांना पहाण्याची उत्सुकता होती. यावेळी त्यांचा जवाहरलाल नेहरूंशी प्रथम परिचय झाला.

## आणि नेहरूही बदलले !

पं. नेहरू गर्भश्रीमंत होते. ऐश्वर्य त्यांच्या पायाशी लोळण घेत होते. त्यांचे लालनपालन इंग्रजी संस्कारात झाले. त्यांचे शिक्षण परदेशातच झाले होते. गांधींशी त्यांचा परिचय झाला अन् जणू जादूची कांडी फिरली. त्यांच्या आचारविचारात, पेहरावात आमूलाग्र बदल झाला. गांधीजींचे म्हणणे त्यांना पटले. लोहचुंबकाप्रमाणे जवाहरलाल राजकारणाकडे ओढले गेले. लक्ष्मीनारायण स्वखुशीन दरिद्रीनारायण बनला. आपल्या स्वातंत्र्यप्रिय विचारांचा प्रचार करण्यासाठी त्यांनी 'इंडिपेंडेंट' नावाचे वर्तमानपत्र सुरू केले. जवाहरलालांचे वडील पं. मोतीलाल हे राष्ट्रीय सभेच्या मवाळ पक्षाचे सदस्य होते. १९२० साली गांधीजींनी 'असहकार आदोलन' सुरू केले, त्यात पितापुत्रांनी भाग घेतला. कोणतीही वस्तू मिळत नाही, तेव्हा मी त्याचा त्याग केला म्हणणे म्हणजे खरा त्याग नव्हे.

पण सर्व सुखे हात जोडून उभी असता स्वखुशीने त्याकडे पाठ फिरवणे हा खरा त्याग. असा त्याग जवाहरलालांनी केला. पण हे हृदयपरिवर्तन कोणी घडविले?

महात्मा गांधींनी!

## शिस्तप्रिय जवाहरलाल

१९२० पासून जवाहरलाल गांधीजींचे सच्चे अनुयायी बनले. यानंतर गांधीजींनी जे जे सत्याग्रह केले, जी जी विधायक कामे केली त्यात पं. जवाहरलालजींनी भाग घेतला. त्याचा अर्थ असा नव्हे की त्यांच्यात मतभेद नव्हते. अनेक वेळा उभयतात मतभेद होत. जवाहरलाल गांधीजींशी वाद घालत. पण शेवटी सैनिकाने सेनापतीची आज्ञा पाळावी तसे गांधीजींचा आदेश पाळत. १९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यावर जवाहरलाल स्वतंत्र भारताचे पंतप्रधान बनले. पण स्वतः गांधीजींनी मात्र कोणतेही मानाचे पद घेतले नाही. निःस्वार्थीपणाचेच हे द्योतक नव्हे काय?

## बिहारचे गांधी

१९१६ साली लखनौच्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे वेळी बिहारचे राजकुमार शुक्ल गांधीजींना भेटले. त्यांनी बिहारच्या शेतकऱ्यांची दारुण परिस्थिती त्यांना सांगितली. त्यांनी गांधीजींना बिहारला येण्याची विनंती केली. गांधीजी लखनौ काँग्रेसनंतर कलकत्त्यास गेले. तेथे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अधिवेशन होते. गांधीजींनी श्री. शुक्ल यांना तेथे बोलावले. ते लगेच कलकत्त्यास गेले. राजेंद्रबाबू देखील या सभेत हजर होते. ते गांधीजींच्या शेजारीच बसले होते. पण संकोची स्वभावामुळे

त्यांनी कोणाशीच परिचय करून घेतला नाही. इतक्या जवळ असूनही परिचय झाला नाही.

## गांधी बिहारमध्ये

या बैठकीनंतर म. गांधी व श्री. शुक्ल पाटण्यास गेले. ते राजेंद्रप्रसादांच्या घरीच गेले. पण घरी एका नोकराशिवाय कोणीच नव्हते. गांधीजींच्या साध्या पोशाखावरून नोकर त्यांना शेतकरी समजला. त्याने त्यांची बोळवण व्हरांड्यात केली. काही वेळाने मजहरूलहक आले व गांधीजींना आपल्या घरी घेऊन गेले. सायंकाळी गांधीजी मुजफ्फरपूरला पोचले. त्यांनी चंपारण्याची पहाणी करण्याचे ठरविले. या जिल्ह्याचे मुख्य शहर मोतीहारी आहे. गांधीजी प्रथम तेथे गेले. तेथील लोकांनी आपआपली हकीकत सांगितली पण एवढ्यात कलेक्टरने गांधीजींवर मनाईहुकुम बजावला. गांधीजींनी नकार दिला. गांधीजींवर खटला झाला असता, त्यासाठी त्यानी राजेंद्रप्रसादांना येण्यासंबंधी तार केली.

## गांधीजींशी पहिली मुलाखत

राजेंद्रबाबू तारेनुसार मोतीहारी येथे गेले. तोपर्यंत गांधीजींवर खटला भरलेला होता. गांधीजी अगदी साध्या पेहेरावात होते. राजेंद्रप्रसादांची त्यांच्याशी ओळख झाली. गांधीजींनी राजेंद्रबाबूंना तुमच्या घरी गेलो होतो असे सांगितले. त्यामुळे ते अधिकच लज्जित झाले. गांधीजींचे बोलणे, पोशाख यांचा त्यांच्यावर काही खास ठसा उमटला नाही. रात्रभर गांधीजींचे काम चालू होते. मधेच बिहारी लोकांना गांधीजींनी विचारले, "मी तुरुंगात गेल्यावर तुम्ही काय कराल ?" एकाने गमतीने म्हटले, "तुम्ही तुरुंगात गेलात की आमचे काम थांबेल."

गांधीजी म्हणाले, "म्हणजे तुम्ही हातात घेतलेले काम पुरे करणार नाही ?" त्यांच्या स्वरात आश्चर्य प्रकट होत होते. तेव्हा श्री. धरणीधर म्हणाले, "आम्ही माहिती गोळा करण्याचे काम चालू ठेवू. जर जेलमध्ये जाण्यास कोणी तयार नसले तर दररोज माणूस बदलू."

या उत्तराने गांधीजींचे पूर्ण समाधान झाले नाही. राजेंद्रबाबू विचार करू लागले. "ज्या माणसाचा बिहारशी काही संबंध नाही तो तुरुंगात जाण्यास तयार आहे आणि आम्ही मात्र कच खातोय." दुसरे दिवशी राजेंद्रप्रसाद व इतरानी तुरुंगात जाण्याचे ठरविले. गांधीजी खुश होऊन म्हणाले, "आता आपण नक्की विजयी होऊ." अशाप्रकारे गांधीजींनी चंपारण्य सत्याग्रह सुरू केला व त्यात यश मिळविले.

## खरा अनुयायी

चंपारण्य सत्याग्रहापासून गांधीजींना राजेंद्रप्रसादांनी पूर्ण सहकार्य दिले. त्यांनी प्रत्येक सत्याग्रहात स्वतः तर भाग घेतलाच, पण बिहारमध्येही क्रांती घडवून आणली. भारत स्वतंत्र झाल्यावर भारताची राज्यघटना बनविली. या घटनेनुसार राजेंद्रप्रसाद भारताचे राष्ट्रपती बनले. नम्रता, सहिष्णुता, सहृदयता व उदारता या गुणांचे पाठ त्यांनी बापूजींजवळूनच घेतले. ते बापूजींचे सच्चे अनुयायी होते. त्यांच्या निर्मळ जीवनामुळे परदेशी भारताची छाप पडली. त्यांच्या कार्यकालामध्ये अनेक चांगल्या चांगल्या गोष्टी त्यांनी सुरू केल्या. "ते संताप्रमाणे निर्दोष, अलिप्त व निरभिमानी होते." असे डॉ. राधाकृष्णन् यांनी म्हटले आहे.

एकदा स्वतः गांधीजी त्यांच्याविषयी म्हणाले, "या भारतात निदान एक व्यक्ति अशी आहे जी मी विष दिले तरी प्राशन करील. ती व्यक्ति म्हणजे डॉ. राजेंद्रप्रसाद होत." गांधीजींच्या या उद्गारावरून बापूजींचा त्यांच्यावर केवढा विश्वास होता हे दिसून येते.

## भारतीय चाणक्य

गांधीजींनी असहकाराची चळवळ पुकारली. त्यांनी देशातील व्यावसायिकांना आपले व्यवसाय सोडून आंदोलनात सामील होण्याचे आवाहन केले. दक्षिणेकडील मद्रास राज्यातील चक्रवर्ती राजगोपालाचारियर नामवंत वकील होते. पण गांधीजींच्या हाकेला त्यांनी ओ दिली अन् राजकारण हे त्यांचे कार्यक्षेत्र बनले. गांधीजींच्या प्रत्येक स्वातंत्र्ययुद्धात त्यांनी भाग घेतला. त्यांना अनेक वेळा जेलमधे जावे लागले. पण १९४२ साली त्यांचा काँग्रेसशी मतभेद झाला.

राजाजी १९४८ ते १९५० पर्यंत ते भारताचे गव्हर्नर जनरल झाले. भारताच्या दृष्टीने मोठी गौरवाचीच गोष्ट होती ही! त्यांच्या या नेमणुकी-बद्दल अनेक राष्ट्रांनी आनंद व्यक्त केला. पाकिस्तानचे बॅ. जिना तर म्हणाले, "आमच्या दोघांच्या प्रयत्नांमुळे उभय राष्ट्रात शांतता नांदेल, दोघात प्रेमाचे संबंध रहातील. राजाजींमध्ये दूरदृष्टी, पांडित्य व वाक्शक्ती प्रभावशाली होती. त्यांनी काही काळ गृहमंत्री व मद्रासचे मुख्यमंत्री-पदही भूषविले आहे.

राजाजी गांधीजींचे एकनिष्ठ भक्त होते. स्वतःला जे पटेल ते ते करत. मग कोणाचाही विरोध ते जुमानीत नसत. याचमुळे त्यांनी आपल्या मुलीचा विवाह गांधीजींच्या मुलाबरोबर करून दिला. याकरिता त्यांना बराच त्रास सहन करावा लागला. तो त्यांनी आनंदाने सहन केला. राजाजींचे जीवन अत्यंत साधे आहे. आयुष्यात ते एकदाच सिनेमाला गेले. सिनेमाचे नाव होते 'मिकी माऊस' आणि साथीदार होते गांधीजी. त्यांचे हास्य गूढ, रहस्यमय आहे. सध्या ते स्वतंत्र पक्षाचे अध्वर्यु आहेत. अजूनही त्यांची बुद्धी तीक्ष्ण आहे.

## महात्माजींचे दर्शन

१९१५ साली म. गांधी हिंदु विश्वविद्यालयात बनारस येथे आले होते. तेथे त्यांनी भाषण दिले. या भाषणात गांधीजींनी सरकारवर व संस्थानिकांवर सडकून टीका केली. त्याचा परिणाम होऊन बरेचसे श्रोते व स्वतः अध्यक्ष सभास्थानातून निघून गेले. सरकारी अधिकारीही मधूनच सटकले. यावेळी गांधीजींच्या निर्भय वृत्तीचा लालबहादुरांवर फारच परिणाम झाला. विद्यार्थीदशेतच त्यांचे मन देशभक्तीने भारावले. गांधीजींच्या हाकेला ओ देऊन विद्यार्थीही सत्याग्रहात सामील झाले. हरिश्चंद्र कॉलेजच्या फाटकासमोर काही विद्यार्थी झोपले. त्यांनी इतराना परीक्षा न देण्याची विनंती केली. शास्त्री परीक्षेसाठी गेले. पण झोपलेल्या विद्यार्थ्यांना ओलांडणे त्यांना पटले नाही गरिबीची त्यांना जाणीव होती. तरीही ते परत फिरले.

शास्त्रीजी परीक्षेला बसले नाहीत म्हणून त्यांचे नातेवाईक व हितचिंतक यांनी त्यांना ठपका दिला. पण शास्त्रीजी म्हणाले, “ देशाच्या हाकेला ओ देणे हे माझे आद्य कर्तव्य आहे.

शास्त्री रामनगरला मुद्दाम आईला जाऊन भेटले. त्यांनी तिची समजूत घातली. आईने प्रेमाने सांगितले, “ बचवा तुझ्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. तू मात्र एकदा पुढे पाऊल टाकलं आहेस ते कधी मागे घेऊ नकोस. ”

शास्त्रीजींनी आईची ही शिकवण सत्याग्रही असताना, मंत्री असताना किंबहुना पंतप्रधान असतानाही तंतोतंत पाळली.

## भारतकोकिळेचा राजकारणात प्रवेश

गांधीजींनी असहकाराचे शस्त्र उपसले अन् भारतीय स्त्रियांना राज-

कारणात खेचले. या स्त्री नेत्यात सरोजिनीदेवी या अग्रणी होत्या. त्या महान् कवयित्री होत्या. म्हणूनच त्यांना भारतकोकिळा हे नाव पडले. १९१६ च्या लखनौ काँग्रेस अधिवेशनास त्या हजर होत्या. तेथेच त्यानी गांधीजींना प्रथम पाहिले. त्यानंतर जेव्हा जेव्हा गांधीजी भेटले त्या प्रत्येक वेळी सरोजिनीदेवींच्या संस्कारक्षम कविमनावर गांधीजींच्या आचारविचारांचा उत्तम परिणाम झाला. त्यांच्या प्रेरणेमुळेच त्या राजकारणात भरीव कार्य करू शकल्या. १९२२ साली राष्ट्रीय सभेच्या प्रतिनिधी बनून त्या दक्षिण आफ्रिकेत गेल्या. १९२५ मध्ये त्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्ष बनल्या. त्यांची वक्तृत्वशैली तडफदार होती. आपल्या भाषणाने त्या श्रोत्यात अभूतपूर्व चेतना निर्माण करत. प्रकृती फारशी बरी नसतानाही त्या स्वातंत्र्य आंदोलनात उडी घेत.

म. गांधीवर त्यांची अढळ निष्ठा होती. गांधींचा उपदेश त्या तंतोतंत पाळत. त्यानी देशोदेशीचे दौरे केले व भारताचे नाव उज्ज्वल केले. आगाखान महालात बापूजींबरोबर त्याही १९४२ साली कैदेत होत्या. भारत स्वतंत्र होताच त्यांनी उत्तरप्रदेशचे राज्यपालपद भूषविले. १९४९ साली त्यांनी आपली जीवनयात्रा संपविली. पण त्यांची आठवण आजही ताजी आहे.

गांधीजींनी भारतीय राजकारणात पाऊल टाकले. त्यांनी भारतीय राजकारणाचा आढावा घेतला व व स्वतःची अशी योजना ठरविली. आता त्यांना खाजगी चिटणिसाची आवश्यकता भासली. सुशीला नय्यरचा भाऊ प्यारेलाल याने ही उणीव भरून काढली. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाने, उपदेशाने तो भारून गेला होता. त्याने आपले सर्वस्व देशाला अर्पण केले. तो स्वतः गांधीजींचा खाजगी चिटणीस बनला. प्यारेलाल आपल्या-जवळ नाही म्हणून त्याच्या आईला दुःख वाटे.

एकदा प्यारेलालची आई प्यारेलालला भेटण्यासाठी आश्रमात गेली. बापूजी कामात होते. तोपर्यंत त्या बांजवळ बसल्या. बांनी त्यांच्याशी खूप गप्पा मारल्या, पण प्रथम त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली. बांशी गप्पा मारता मारता बांचे वात्सल्य आईस दिसले. त्यांनी आपल्या येण्याचे कारण सांगितले. हळूहळू बोलता बांनी त्याना समजावून जेवायला घातले. पण या अवधीत अगदी सहजपणे बांनी त्यांचे हृदय परिवर्तन घडवून आणले, प्यारेलालच्या आईला वाटले ही स्त्री इतके काम करू शकते, आपली मुले दूर ठेवते मग आपण का बरे राहू शकणार नाही? जे काम वादविवादाने झाले नसते ते सहजपणे झाले. पण आपण एखादे काम केलेय असा डांगोरा पिटायची त्यांना सवय नव्हती. बांच्या सहानुभूतीमुळेच बापूजींना प्यारेलाल मिळाला, तो शेवटपर्यंत छायेप्रमाणे बरोबर राहिला, देशासाठी अनेक प्रकारे त्याग करू शकला.

गांधीजींचे असे अनेक शिष्य होते. भूदान यज्ञाचे प्रवर्तक, सर्वोदयवादी विनोबा हे गांधीजींचे पहिले व आदर्श सत्याग्रही होते. पोलादी पुरुष म्हणून ओळखले जाणारे वल्लभभाई पटेल यांनी बारडोलीच्या सत्याग्रहात भाग घेतला व गांधीजींना अखेरपर्यंत हरएक कामात मदत केली. दृढनिश्चयी गोविंद वल्लभ पंत हेही गांधीजींचे सच्चे भक्त होते. एक ना दोन भारतातील अनेक बुद्धीमान लोकांनी, श्रीमंतांनी, गरिबांनी, कामगारांनी व अन्य व्यावसायिकांनी गांधीजींचे हरएक प्रकारे अनुकरण केले. सामान्य जनतेतही त्यांनी देशप्रीती निर्माण केली. भित्र्यांना निर्भय बनविले, दुर्बलांच्यात शक्ती निर्माण केली. राईएवढ्या असलेल्या गुणाला त्यांनी विचाराचे खतपाणी देऊन पर्वतप्राय मोठे केले. अशाप्रकारे आपल्या अखंड तपश्चर्येने, प्रदीर्घ परिश्रमाने गांधीजींनी सारा देशच हलवून सोडला.

## प्रश्न

**प्रश्न १ :** खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

१) गांधीजींचे ध्येय कोणते होते ?

२) राजेंद्रप्रसादानी काय कार्य केले ?

३) गांधीजींना 'शिक्षणशास्त्रज्ञ' का म्हणतात ?

४) हिंदु मुस्लिम ऐक्यासाठी गांधीजींनी काय केले ?

**प्रश्न २ :** अेकावर लिहा

१) गांधीजींचे चिटणीस

२) भारतीय चाणक्य

३) शिस्तप्रिय जवाहरलाल

**प्रश्न ३ :** रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

१) ·········ना भारतकोकिळा म्हणतात.

२) शास्त्रीजींना·········आईची शिकवण होती.

३) प्यारेलालच्या आईचे ········· बांमुळे झाले.

४) पोलादी पुरुष ·········ना म्हणत.

प्रकरण दहावे

# चले जाव

सन १९४२ हे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील एक अविस्मरणीय वर्ष! ९ ऑगस्ट १९४२ हा दिवस तर भारतात क्रान्ति दिन म्हणून मानला जातो!

दुसरे महायुद्ध भडकले होते. ब्रिटिशांचे हात युद्धात गुंतले होते. या वेळी आलेल्या संधीचा फायदा स्वातंत्र्य लढ्याच्या दृष्टीने कसा घ्यायचा याचा विचार करण्यासाठी भारतीय पुढारी मुंबईत एकत्र आले होते. त्यांत महात्मा गांधी, जवाहरलाल, सरोजिनीदेवी, अबुल कलम आझाद, शास्त्रीजी, जयप्रकाश आदि थोर नेते होतेच.

स्वातंत्र्य लढ्यातील या आणीबाणीच्या प्रसंगी मुंबईत गवालिया टँक मैदानावर भारतीय जनता प्रचंड संख्येने उपस्थित होती. हजारो, लक्षा-

वर्धीच्या नजरा व्यासपीठाकडे लागल्या ! सारी घटनाच रोमांचकारी होती. भारतातील सर्व जनतेचे लक्ष या दिव्य दिवसाकडे लागले. त्यांचे सार-सर्वस्वच जणू मुंबईत एकत्र झाले.

मैदानावर अचानक गंभीर शांतता पसरली. लाखावर समुदाय एकदम इतका शांत स्थिर झाला की टाचणी पडली तरी आवाज ऐकू यावा. गांधीजी व्यासपीठावर आले. धीर गंभीर मूर्ती शांतपणे पावले टाकीत पुढे आली. त्या मूर्तीने हात जोडले, सर्वांना अभिवादन केले आणि आपल्या ऐतिहासिक भाषणास प्रारंभ केला.

आपण फार वाट पाहिली. न्याय्य अशी आपली मागणी खरे तर ताबडतोब पूर्ण व्हावयास पाहिजे होती. आमची मागणी इंग्लंडने पूर्ण करावी. आम्ही त्यांना मदत करण्यास तयार आहोत. पेला काठोकाठ भरला आहे असे आपण इंग्रजांना बजावले पाहिजे. ब्रिटिशांनी आता भारत सोडून निघून जावे. ही अपेक्षा प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आपणास फार मोठ्या अग्निदिव्यातून जावे लागेल. तुरुंगवास भोगावा लागेल. 'करा किंवा मरा' हेच आता आपले ब्रीद राहील.

गांधीजींना पाठिंबा देणारे जोरदार भाषण जवाहरलालनी केले. नंतर आणखीही प्रभावी भाषणे झाली.

'चले जाव' च्या ठरावाने सभेत निराळेच वारे संचारले. 'करेंगे या मरेंगे' या घोषणेने सारे वातावरण दुमदुमून गेले. ब्रिटिश सरकारही चकित झाले. जनतेला घाबरवून सोडण्यासाठी सरकारने म. गांधी, जवाहरलाल, अबुल कलम आझाद इ. नेत्यांना ९ ऑगस्टला पहाटे पकडले. पण या घटनेचा जनतेवर निराळाच परिणाम झाला आणि सर्व भारतात इंग्रजांच्या विरुद्ध तीव्र लढा सुरू झाला.

१८५७ पासून चाललेल्या स्वातंत्र्यलढ्याच्या परिसमाप्तीची वेळ

जवळ आली. भारतीय जनता आता अन्याय सहन करण्यास मुळीच तयार नव्हती. ब्रिटिश सरकारच्या अन्यायाच्या जुल्म जाचाला प्रजा अगदी कंटाळून गेली होती. सर्व समाज जणू क्रान्तीच्या कल्पनेने पेटून निघाला होता. म. गांधीजींचे धारदार शब्द प्रत्येकाच्या अन्तःकरणास जाऊन भिडले. आपण आता काहीतरी केलेच पाहिजे असे सर्वांना वाटू लागले.

९ ऑगस्ट या दिवशी सायंकाळी गांधीजी शिवाजीपार्कवर एक जाहीर सभा घेणार होते पण सरकारने त्यांना त्या पूर्वीच पकडले. सरकारला वाटले होते की चळवळीचे प्रवर्तक गांधी याना पकडले की सारे शांत होईल. स्वतः गांधीजींना या वेळी सरकार त्यांना अटक करेल असे तिळमात्रही वाटले नव्हते ! तसे त्यांनी अनेकांजवळ बोलूनही दाखविले. त्यामुळेच त्यांच्या परिवारतील लोक विशेषतः कस्तुरबा यांना या अटकेचा मोठा धक्का बसला. पण कृश शरीरात निर्भय मन होते ना ! म. गांधीजींनी तुरुंगाकडे जाताना ‘ माझे काम चालव ’ असे बांना सांगितले. त्यांनी सायंकाळच्या सभेत भाषण करण्याचे ठरविले. डॉ. सुशीला नय्यर यांना सांगून पुरुष व स्त्रिया यासाठी दोन संदेश तयार करवले. सभेच्या आधी एक तास बा व डॉ सुशीला सभास्थानी जाण्यास निघाल्या. बिर्ला हाऊसच्या दारातच पोलीस अंमलदाराने त्यांना रोखले. तो बांना म्हणाला, “ माताजी हे आपले सभेला जायचे वय आहे काय ? आपण भजन पूजन करावे. ते सोडून राजकारण कसले खेळता ? त्यावर बा म्हणाल्या, “ तो माझा प्रश्न आहे. काही झाले तरी मी सभेला जाणारच ! तेव्हा नाइलाजाने पोलीस अंमलदाराने त्यांना पकडले. डॉ. सुशीला हिने तयारी करून ठेवली होतीच. त्या दोघांना आर्थर रोड जेलमध्ये नेले व पुढे आगाखान पॅलेसमध्ये बापूजींच्याकडे नेले. बापूजींनी चटकन विचारले “तू सरकारकडे काही

अर्ज केला आहेस काय ?" बा म्हणाल्या "छे हो आम्हालाहि तुमच्या-प्रमाणे कैद केले आहे."

९ ऑगस्टच्या सकाळी पुढाऱ्यांच्या अटकेची बातमी वाऱ्यासारखी पसरली. टिकठिकाणी स्वयंस्फूर्तीने हरताळ पडले. दुकाने बंद झाली. गिरणतिल कामगारही काम सोडून बाहेर पडले. सरकारने अत्यंत निर्दयपणे चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला. अनेक जागी अश्रुधुराचा मारा केला. अमेरिकन सैनिक रस्तोरस्ती गस्त घालू लागले. कर्मधर्मसंयोगाने मी त्या वेळी येथेच होतो. हे सर्व दृश्य पाहून भारावून गेलो होतो. वहातुक विस्कळीत झाली होती. सुंदर मुंबापुरी आश्चर्यचकित झाली होती. लोक गटागटानी जमत होते. पुढाऱ्यांना कोठे ठेवले असेल याची चर्चा करीत होते. आता कदाचित् सरकार उरलेल्या पुढाऱ्यांनाही पकडेल असे वाटू लागले. तेव्हा हे सर्व पुढारी भूमिगत झाले ! सरकारने ठरविले एक आणि झाले भलतेच. मुंबईतील चळवळीचे लोण इतर सर्व शहरातही पसरले. तेव्हा चिडून सरकारने ठिकाठिकाणी विद्यार्थी, स्त्रिया यांचेवर अमानुष लाठी हल्ला केला. यांतच १४ वर्षाचा शिरीषकुमार बळी पडला. म. गांधी यावेळी कैदेत होते पण त्यांचे डोळे बाहेरील चळवळीकडे लागून राहिले होते. त्यांनी या अत्याचारांचा निषेध करणारे पत्र व्हाइसरॉयना लिहिले. पण त्याचा काही उपयोग झाला नाही.

भूमिगत नेत्यांनी गुपचुपपणे चळवळीचे काम चालूच ठेवले. विशेषतः उत्तर प्रदेश व महाराष्ट्र येथे काही ठिकाणी प्रतिसरकार स्थापन केले. सरकारने गांधीजींचा बाहेरच्या जगाशी संबंध तोडला. गांधीजींच्या फक्त निकटच्या नातेवाईकाना पत्रे लिहिण्याची परवानगी दिली. ! पण बापूजी फार स्वाभिमानी होते. त्यांनी सरकारला उत्तर दिले कीं सर्व भारतीय माझे नातेवाईक आहेत. असे म्हणून गांधीजींनी कोणासच पत्र न लिहिण्याचा

निर्णय घेतला. महादेवभाई व सुशिला नय्यर यांनी गांधीजींचे अनुकरण केले.

'भारत सोडा' असे सांगूनही ब्रिटिशांनी भारत काही सोडला नाही. पण या सत्तेचे दिवस आतां संपत आल्याची स्पष्ट चिन्हे दिसत होती. जुलमी बंधने झुगारून देऊन भारतीय आपण स्वतंत्र आहोत अशाप्रकारे वागू लागले. सरकारी कचेऱ्याचेवर हल्ले झाल. पोष्ट ऑफिसे जाळली. रेल्वेचे रूळ उखडून टाकले. अनेक स्टेशने जाळून भस्म केली. जाळपोळीन भारतात भीषण स्वरूप धारण केले! जनतेला पुढाऱ्यांना सरकारने कोठ ठेवले आहे याची कल्पना नव्हती. पुढाऱ्यांनाही वेगवेगळ्या तुरुंगांत अडकून ठेवले. तेव्हा त्यांनाही एकमेकांच्या विषयी काहीच समजेना! त्यांना तुरुंगात वृत्तपत्रेहि मिळत नसत!! त्यांचेपुढे सर्वत्र अंधार होता पण या अंधारातूनही काही वेगळेच बाहेर घडत असावे असा अंदाज त्यांना येत होताच!

म. गांधी व व्हाइसरॉय यांच्यामध्ये पत्रव्यवहार झाला. भारतात ब्रिटिशांच्या विरुद्ध जी प्रचंड आंदोलने चालू झाली, जाळपोळीचे सत्र सुरू झाले होते त्याला म. गांधी जबाबदार आहेत असा आरोप त्या व्हाइसरॉयनी केला तर उलट या सर्व अनर्थ परंपरेस सरकारच पूर्णपणे जबाबदार आहे असे गांधीजींनी निक्षून कळवले व सरकारने जो म. गांधींच्या वर आरोप केला त्या विरुद्ध म्हणून १० फेब्रुवारी १९४३ ला म. गांधींनी २१ दिवस उपोषण करणार असल्याचे जाहीर केले. या उपोषणाचे वेळी म. गांधींचे वय ७४ होते. अशावेळी हे उपोषण झेपणार नाही असेच सर्वांना वाटत होते. कस्तुरबा तर चिंतेने चूर झाल्या. पण महात्मा गांधींनी एकदा निश्चय केला म्हणजे मग त्यात बदल होणे शक्य नाही हे कस्तुरबाना माहिती होते. त्यांच्या हाती फक्त म. गांधींच्या प्रकृतीची अधिकात अधिक

काळजी घ्यावयाची एवढेच होते. ते त्यांनी केलेही. म. गांधींच्या उपवासांत अविश्रांत श्रम करून कस्तुरबांनी त्यांची उत्तम सेवा केली.

म. गांधींच्या प्रकृतीबद्दल सर्वांना फारच काळजी वाटत होती. सरोजिनीदेवी बापूजींना उपवासापूर्वी म्हणाल्या, "बापूजी, तुम्ही उपवास केलात तर बा जगणारही नाही." बापूजी म्हणाले, "इतके दिवस तुम्ही बांच्या सहवासात आहात पण अजून बांना पुरते ओळखलेच नाहीत. बा तुम्हा सर्वांपेक्षा अधिक खंबीर आहे." बापूजींचे हे शब्द किती खरे होते! बापूजी उपवासाबद्दल बा जवळ बोलले. सरकार निर्दय आहे, खोटेपणा करत आहे. जुल्म चालूच आहे. या सर्वांचा निषेध केलाच पाहिजे. बापूजींच्या जवळ उपवासाशिवाय दुसरे साधन आहेच कोठे? बांचे हे बोलणे ऐकून बापूजींचे सारे सहकारी आश्चर्यचकित झाले!

बापूजींचा उपवास सुरू झाला तर बा फक्त फलाहार करून राहिल्या. म. गांधीजींना उपवासांत बरे वाटेनासे झाले. प्रकृती फारच क्षीण झाली. ते बेशुद्ध होऊन पडू लागले. बोलणे नाहीच पण खुणाही करणे शक्य नव्हते. नाडी मंद झाली. शरीर घामाने भिजू लागले. पण ठरलेली मुदत संपेपर्यंत कोण काय करणार? दि. ३ मार्चला म. गांधींनी मुसंब्याचा रस घेऊन उपोषण सोडले. जनता आणि सरकार दोघानाही हायसे वाटले.

लवकरच बा आजारी पडल्या. १९४३ च्या डिसेंबरमध्ये त्या आजारी झाल्या व फेब्रुवारी १९४४ मध्ये मरण पावल्या. म. गांधीजींना वयाच्या १३ व्या वर्षापासून बांनी साथ दिली. ६२ वर्षाचा प्रदीर्घ सहवास संपला. गांधीजींना बांच्या मृत्यूचे अतिशय दुःख झाले. अखेरच्या आजारात बापूजींनी बांची मनोभावे सेवा केली.

## प्रश्न

**प्रश्न १ :** खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

१) १९४२ साली गांधीजीनी कोणती घोषणा केली ? त्याचा काय परिणाम झाला ?

२) गांधीजीनी लोकाना कोणता संदेश दिला ?

३) सरकारने चळवळ दडपण्यासाठी काय केले ? त्याचा परिणाम काय झाला ?

**प्रश्न २ :** अेकावर लिहा.

१) बापूजींच्या उपवासावर बांची प्रतिक्रिया

२) करू किंवा मरू

३) बांची निर्भयता

**प्रश्न ३ :** अेका वाक्यात उत्तरे द्या.

१) बाना सरकारने का पकडले ?

२) सरोजिनीदेवी बापूजींना काय म्हणाल्या ?

३) गांधीजीनी कोणासही पत्रे का लिहिली नाहीत ?

४) इतरानी बाना ओळखले नाही असे बापूजी का म्हणाले ?

प्रकरण अकरावे

# गांधीजींचे विधायक कार्य

## द्रष्टे गांधीजी

गांधीजीं महान् विभूती होते. त्यांच्या अंगी अनेक सद्गुण होते. पण केवळ सद्गुणानी मनुष्याच्या अंगी मोटेपणा येत नाही. त्यांच्या बुद्धीची झेप प्रचंड होती. भारतीय जनतेची नाडी त्यानीं नीट पारखली होती. भारताची उन्नती घडवायची असेल तर ग्रामसुधारणा घडवणे आवश्यक हे त्यानी ओळखले. भारतातील बहुजनसमाजाला शिक्षण दिल्याशिवाय भारत प्रगती करू शकणार नाही याची त्याना खात्री होती. स्त्रियाना पुरुषांच्या बरोबरीने हक्क दिले पाहिजेत, सर्वांना समानतेने वागवले पाहिजे असे त्यांचे मत होते. मानवामध्ये मानवता जागृत केली पाहिजे, राष्ट्रीयतेसाटी

राष्ट्रीय शिक्षण दिले पाहिजे असे त्यानी ठरविले. म्हणूनच त्यानी विविधांगी विधायक कार्यक्रमाची योजना केली. यावरूनच त्यांचा द्रष्टेपणा दिसून येतो. त्या विधायक कार्याची आपण तोंडओळख करून घेऊ या.

## ग्रामसुधारणा

भारत हा खेड्यांचा देश आहे. येथील बहुसंख्य जनता खेड्यांत राहाते. या खेड्यांची सुधारणा घडवणे म्हणज देशाची उन्नती करणे, हे लक्षात घेऊन गांधीजींनी सुरवातीस आपल्या कार्यक्रमात ग्रामसुधारणेस अग्रस्थान दिलें. ग्रामीण लोकाना आधी स्वच्छतेचे व सभ्यतेचे धडे द्यावयाचे त्यानी मनात योजले. या कामासाठी त्याना बरेचसे स्वयंसेवकही लाभले. त्यानी प्रथम या प्रयोगास बिहारमध्ये सुरूवात केली.

## प्रत्यक्ष कार्य

यासाठी गांधजीनी प्रत्येक गावी एका शाळेची स्थापना केली. शाळेत एक पुरुष व एक स्त्री शिक्षिकेची नियुक्ती केली. हे लोक गावातील लोकाना स्वच्छतेचे महत्व समजावून सांगत. त्याचप्रमाणे गावातील लोकांच्या आरोग्याकडे लक्ष पुरवीत. या शाळेत जुजबी औषधांची तयारी असे. शिक्षण याचा अर्थ गांधींजी 'जीवनाकरिता योग्य शिक्षण' असा करीत. म्हणूनच या शाळेत पुस्तकी शिक्षणावर भर नव्हता. गावातील लोकाना सफाईचे शिक्षण स्वयंसेवकांनीं देण्यास सुरूवात केली. रस्ते, विहिरी व घरांची अंगणे साफ करणे हे त्यांचे पहिले काम होते. 'आधी केले, मग सांगितले' या उक्तीप्रमाणे स्वयंसेवक नेहमी वागत. त्यामुळे त्यांच्या ह्या वागण्याचा त्या लोकांच्या मनावर खोल परिणाम झाला. त्यानी आपले गाव स्वतः साफ करण्यास प्रारंभ केला.

## गरिबीचे दुःख

बिहारमध्ये सभ्यतेचे धडे देत असता कस्तुरबाना एक विचित्र अनुभव आला. त्या गावोगावी जात. लोकाना स्वच्छतेचे व शिक्षणाचे धडे देत. भीतीहरवा गावाजवळ त्यांनी अशीच एक सभा भरवली. म. गांधीजींही त्या सभेस उपस्थित होते. गांधीजींनी सर्वांना स्वच्छतेचे व शिक्षणाचे महत्व समजावून दिले. जमावातील असंख्य स्त्रिया अस्वच्छ साडया नेसल्या होत्या. गांधीजींनी कस्तुरबांना या स्त्रियाना अलगपणे स्वच्छतेबद्दल समजावून सांग असे सांगितले. कस्तुरबा त्या स्त्रियांना म्हणाल्या, "तुम्ही दररोज स्नान करा, रोज साडी धुवा. त्यामुळे तुमचे आरोग्य सुधारेल." एक बाई म्हणाली, "बा, जरा माझ्याबरोबर चला." ती बाई बांना आपल्या झोपडीत घेऊन गेली. तेथे रिकाम्या गाडग्यामडक्यांशिवाय काही नव्हते. ती म्हणाली, "बा आमच्याजवळ नेसूच्या साडीशिवाय दुसरे कपडे नाहीत. मग आम्ही साड्या कशा धुणार? अन आंघोळ तरी कशी करणार?" भारतातील शकडो खेडयांची स्थिती अशीच आहे. हे पाहून गांधीजींचे मन हेलावले. त्यानी ग्रामसुधारणेचे काम अधिकच जोराने सुरु केले.

## वर्धा शिक्षण योजना

ग्रामसुधारणा करावयाची म्हणजे लोकांना शिक्षण देणे आवश्यक आहे असे गांधीजींना वाटले. पण यावेळी इंग्रजांचे राज्य होते. त्यांनी पाश्चिमात्य पद्धतीने शिक्षण दिले होते म्हणूनच गांधीजीच्या मनात राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना आली. त्यांनी शिक्षणाची नवीन पद्धती काढली. यासाठी त्यानी १९३८ साली सेवाग्राम येथे एक समिती स्थापन केली. या समितिचे

अध्यक्ष म्हणून डॉ. झाकीर हुसेन यांना नेमले. या शिक्षण पद्धतीस वर्धा शिक्षण पद्धती किंवा बेसिक शिक्षण पद्धती म्हणतात.

ही शिक्षण पद्धती काढण्याचे दुसरे कारण म्हणजे पाश्चिमात्य शिक्षणाचा भारतीयांवर झालेला विपरीत परिणाम होय. देशाची पहाणी केल्यावर गांधीजींना असे आढळून आले की इंग्रजी शिक्षणामुळे देशात फक्त कारकूनच निर्माण होत आहेत. देशाची उन्नती करावयाची असेल तर व्यवसायात उन्नती होणे आवश्यक होते. स्वावलंबनामुळे देश प्रगती करेल. मुलानी व्यावसायिक शिक्षण घेतले तर ती स्वयंपूर्ण होतील. भारताचे नागरीक स्वावलंबी बनले तर राष्ट्र प्रगतीपथावर जलद वाटचाल करेल हाच विचार गांधींच्या वर्धा शिक्षण योजनेमागे आहे.

## व्यवसायप्रधान शिक्षण

या योजनेचें मुख्य सूत्र असे होते की विद्यार्थ्याला कोणतातरी व्यवसाय आला पाहिजे. यात मुख्य स्थान व्यवसायाला होते. या व्यवसायाबरोबर आवश्यक असे इतर विषय विद्यार्थ्याला शिकवत. यात विशेषतः भाषा, इतिहास, गणित व हस्तकला असे. पण केंद्रबिंदू होता व्यवसाय ! ज्या त्या गरजेनुसार व्यवसायाची निवड केली जाई. खरे शिक्षण म्हणजे विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास ! यात विद्यार्थ्याचा कल, मानसिक तयारी, शारीरिक कुवत व आवड लक्षात घेऊन त्याला योग्य ते मार्गदर्शन करावयाचे ! या योजनेचे ध्येय होते, विद्यार्थ्याला व्यवहारात यशस्वी करणे. त्याच्या अंगी धडाडी आणणे म्हणूनच शाळांना जीवन शिक्षण मंदिर असे नाव मिळाले. स्वत: गांधीजानी सूतकताई व शेती या व्यवसायांना जास्त प्राधान्य दिले.

## गांधीजींची कल्पना

१९४५ साली हिंदुस्तानी तालिमी संघाच्या परिषदेत गांधीजींनी आपले विचार स्पष्ट केले. “अथांग सागरातून प्रवास करताना ध्रुवतारा हा एकच मार्गदर्शक असतो. त्याप्रमाणे वर्धा शिक्षणामध्ये ग्रामोद्योग हा आहे. या योजनेमुळे आपण खेडेगावांचे शिक्षक बनणार आहोत. म्हण-जेच खेड्यांचे सेवक. हे काम आपण मोबदला मिळेल म्हणून करावयाचे नाही. या योजनेस सरकारी सहाय्य नाही. म्हणूनच हा शिक्षणक्रम आपण यशस्वी करून दाखवावयाचा आहे' यामुळे बालकाच्या मनाचा पूर्ण विकास होईल. खेड्यांची उन्नती खेड्यातील लोकच करू शकतील. त्याना म्हणूनच स्वावलंबन शिकवावयाचे ! हेच आमच्या शिक्षणपद्धतीचे ध्येय आहे. ही लोकशिक्षणपद्धती असल्याने शिक्षणाचे माध्यम मातृभाषा राहील. मात्र प्रत्येकास हिंदी भाषा आली पाहिजे.”

शिक्षणक्षेत्रातील गांधीजींचा हा अभूतपूर्व प्रयोग होता. तो लवकरच देशभर पसरला. गांधीजींना ‘शिक्षणशास्त्रज्ञ’ ही पदवी मिळाली. ठिक-ठिकाणी वर्धा योजनेनुसार शाळा निघाल्या.

## स्त्री शिक्षण

आपल्या विधायक कार्यात गांधीजींनी स्त्री शिक्षणास प्राधान्य दिले. भारताच्या सुधारणेसाठी स्त्री शिक्षणाची फार मोठी जरूरी होती. त्यांच्याच प्रेरणेने भारतीय स्त्रीने राजकारणात पदार्पण केले. भारतात गांधीजींनी आश्रमाची स्थापना केली. या आश्रमात स्त्रियांच्या शिक्षणासाठी एक स्वतंत्र वर्ग त्यांनी काढला. स्वतः गांधीजी या वर्गास शिकविण्याचे काम करीत असत.

## गंगाबाई वैद्य

या वर्गाची प्रतिनिधी म्हणून गांधींनी गंगाबाईंची नेमणूक केली. त्या सुरूवातीस निरक्षर होत्या. पण हुशार व तरतरीत होत्या. या वर्गास प्रथम 'रामनाम' शिकविले. नंतर काही भजने शिकवली. ज्या स्त्रिया अगदी मागासलेल्या होत्या त्यांना गांधीजी मुद्दाम पुढे बसवत. त्याना सहानुभूतीने मदत करत. त्यामुळे या स्त्रियांची झपाट्याने प्रगती झाली. त्या डोळस बनल्या. पुढे त्यांच्याचकडे गांधींनी आश्रमातील मुलांच्या शिक्षणाचे काम दिले. स्वतः साक्षर झाल्यावर अनेक स्त्रियांनी . साक्षरता,ग्रामसुधारणा व सत्याग्रह यात भाग घेतला.

## हरिजन सेवा

गांधीजींचे विचार प्रगत होते. स्पृश्यास्पृश्य भेदभाव त्यांच्या मनात कधीच नव्हता. दक्षिण आफ्रिकेत असताना सुद्धा त्यांनी आपल्या घरी एका ख्रिश्चन कारकुनास ठेवून घेतले होते. त्याचे आईवडील पंचम जातीचे होते. त्या काळी स्पृश्य लोक अस्पृश्यांना फारच अपमानास्पद रीतीने वागवत. गांधीजींना याचे फार दुःख होई. त्यांचे मन तिळतिळ तुटे.

## काही प्रसंग

एकदा गांधीजी दक्षिण भारताचा दौरा करत होते. सायंकाळी सभा भरली. लोक जमले. पण अस्पृश्य लोकांना लोकानी दूर बसवले. गांधीजी रंगमंचावर भाषण देण्यासाठी गेले. त्यांच्या तीक्ष्ण दृष्टीला बाजूला बसलेले लोक दिसले. त्यानी व्यवस्थापकाना विचारले, "ते लोक कोण ?"

"ते अस्पृश्य लोक आहेत." व्यवस्थापक उत्तरले.

गांधीजी काही न बोलता व्यासपीठावरून उतरले व अस्पृश्यांजवळ जाऊन त्यांची चौकशी करू लागले.

अस्पृश्यता निवारण समितीची दुसरी बैठक भरली होती. गांधीजींना अध्यक्षांनी भाषण करावयाची विनंती केली. गांधीजी व्यासपीठावर गेले, "या सभेत किती अस्पृश्य लोक आहेत!" असा त्यांनी पहिलाच प्रश्न विचारला.

त्यात एकही अस्पृश्य नाही हे पाहून त्यांनी भाषण करण्यास नकार दिला.

## आश्रमात हरिजन

साबरमती आश्रम स्थापन करताच गांधीजींनी जाहीर केले. 'आश्रमाचे नियम पाळण्यास कोणी हरिजन तयार असेल तर मी त्याला प्रवेश देईन.'

थोड्याच दिवसात असे एक कुटुंब आश्रमात आले. लोकांच्या विरोधाला न जुमानता गांधीजींनी त्याना आश्रय दिला. एवढेच नव्हे तर पुढे या परिवारातील कन्या लक्ष्मी हिला त्यानी दत्तक घेतले.

## उपवास

१९३२ साली सरकारने अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ द्यावयाचे ठरवले. गांधीजींनी यासाठी उपोषण केले. त्यांच्यात व डॉ. आंबेडकरात 'पुणे करार' झाला. या वेळेपासून गांधीजी अस्पृश्याना 'हरिजन' म्हणू लागले. त्यानी 'हरिजन सेवा संघ' स्थापन केला. हरिजनांच्या उन्नतीसाठी हजारो रुपये जमवले व खर्च केले. तसेच 'हरिजन' नावाचे साप्ताहिकही काढले.

## राष्ट्र भाषा

गांधीजींनी भारताचा दौरा केला. विविध भाषा, विविध जाती यांचे दर्शन घेतले. या सर्वांना एकाच सूत्रात बांधल्याशिवाय भारतीय स्वराज्य मिळणार नाही हे त्यानी ओळखले. यासाठीच त्यांनी ‘ राष्ट्रभाषेचा ’ प्रश्न उपस्थित केला. देशातील बहुसंख्य जनता समजू शकेल अशी भाषा म्हणजे ‘ हिन्दी ’ ! म्हणूनच गांधीजींनी ‘ हिन्दी ’ भाषेस राष्ट्रभाषेचे स्थान दिले. त्यांच्या आदेशानुसार १४ सप्टेंबर हा हिन्दी भाषा दिवस म्हणून पाळला जातो. हिन्दी प्रत्येक भारतीयास आली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.

## राष्ट्रभाषा प्रचार समिती

सबंध भारतात राष्ट्रभाषेचा प्रचार करण्यासाठी गांधीजींच्याच प्रेरणे-मुळे वर्धा येथे ‘ राष्ट्रभाषा प्रचार समितीची ’ स्थापना झाली. त्यानी ठिकठिकाणी प्रचारकेन्द्रे काढली. परीक्षा सुरु केल्या व काही पुस्तके प्रसिद्ध केली.

## हिन्दु मुस्लिम भाईभाई

भारतात फार पूर्वीपासून हिन्दु व मुसलमान यांच्यात झगडे चालत. गांधीजी म्हणत, ‘ आपण शेजारी शेजारी गुण्यागोविंदाने नांदावे. आपण सर्वजण एकाच परमेश्वराची लेकरे आहोत. ’

गांधीजींची ही शिकवण उदात्त आहे. या शिकवणुकीचे त्यानी स्वतः पालन केले. खिलाफत चळवळीच्या वेळी त्यानी मुसलमान बंधूंना मदत केली.

## ९२ : असे होते बापू

गांधीजी म्हणत, “आपणाला स्वराज्य मिळवावयाचे असेल तर आपण एकीने उभे राहिले पाहिजे.”

यासाठीच मिठाच्या सत्याग्रहानंतर त्यानी आपले लक्ष हिन्दु–मुस्लिम ऐक्याकडे वळवले.

अशाप्रकारे गांधीजींनी राजकीय चळवळीबरोबरच विधायक कार्यक्रमाकडेही लक्ष पुरविले. स्वावलंबनाच्या प्रचारासाठी त्यानी चरखा संघ, मानवतेच्या प्रचारासाठी सर्वोदय संघ स्थापले. स्वतःच्या मतप्रचारासाठी ‘हरिजन’ व ‘यंग इंडिया’ ही वर्तमानपत्रे–काढली. या विधायक कार्यासाठी त्यांनी डॉ. झाकीर हुसेन, नभकृष्ण चौधरी, आप्पासाहेब पटवर्धन इ. माणसे वेचली.

या त्यांच्या कार्यावरूनच त्यांची भारताच्या उन्नतीसाठी असणारी तळमळ दिसून येते. हे त्यांचे कार्य पाहून त्यांना भारताचे द्रष्टे म्हटले तर ते योग्य ठरेल.

### प्रश्न

**प्रश्न १ :** खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

१) गांधीजींमध्ये कोणकोणते गुण होते ?

२) ग्रामसुधारणेसाठी गांधीजींनी काय केले ?

३) शिक्षणक्षेत्रात त्यानी काय सुधारणा केली ?

**प्रश्न २ :** कारणे द्या

१) हिंदु मुसलमानानी एकी राखली पाहिजे असे गांधीजी म्हणत.

२) गांधीजींनी राष्ट्रभाषेचा प्रचार केला.

**प्रश्न ३ :** अेकावर ५/६ ओळी लिहा.

१) हरिजन सेवा संघ.

२) वर्धाशिक्षण योजना

मराठी ग्रंथ [illegible], ठाणे. वाचनालय शास्त्र
अनुक्रम 00686 वि. व्या. वी.
[illegible] 3289.6 नोंद दि. 9411/18

प्रकरण बारावे

# अखेरचे दिवस

दि. २२ फेब्रुवारीस कस्तुरबांचा मृत्यू झाला तेव्हा गांधीजी म्हणाले, " बा आता स्वतंत्र झाल्या. ' करा किंवा मरा ' हे शब्द तिच्या हृदयावर कोरलेले होते. बा शिवाय जीवन जगणे ही केवळ कल्पनाच मला असह्य वाटते. वेव्हेल यांना पत्रांत म. गांधीजींनी लिहिले " बांची इच्छाशक्ती जबर. त्या जोरावर अनत्याच्यारी असहकारितेच्या कलेत तीच माझी गुरू झाली. म. गांधी बांच्या मृत्यूने फार उदास झाले. सरकारही भारतीयांना स्वातंत्र्य देण्याच्या विचारात नव्हते व त्यामुळे गांधीजींचे औदासिन्य वाढलेच !

६ मे १९४४ रोजी म. गांधीजींची तुरुंगातून अचानक सुटका झाली. निघताच त्यांनी कस्तुरबा व महादेवभाई यांच्या समाधीचे दर्शन घेतले.

ते म्हणाले "बा आणि महादेव अमर झाले." पुढे मुंबईत जुहू येथे ते आले व १४ दिवस त्यांनी मौन स्वीकारले. जीनांना त्या सुमारास लिहिलेल्या पत्रांत महात्माजींनी भारतात मुसलमानांना स्वतंत्र राष्ट्राची कल्पना त्यांना संपूर्णतः अमान्य असल्याचे सांगितले आहे. २ ऑक्टोबर १९४४ या दिवशी म. गांधींचा ७५ वा वाढदिवस सर्व जगांत साजरा झाला. ने. सुभाषचंद्र बोस त्या प्रसंगी म्हणाले "हे राष्ट्रपित्या, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी सुरू केलेल्या या युद्धात विजयी होण्यासाठी आम्हाला आशीर्वाद द्या"

१८ डिसेंबर १९४४ मध्ये गांधीजी शांतिनिकेतनला गेले. तेथे रविंद्रनाथ टागोर व विद्यार्थ्यांकडून काय अपेक्षा होती ते गांधीजींनी स्पष्ट केले.

म. गांधी दिल्लीस आले व हरिजन वस्तीत उतरले. २४ ऑगस्टला हंगामी सरकार स्थापन झाले. त्यानंतरच्या एका प्रार्थना सभेत गांधीजी म्हणाले "आजचा दिवस परमशुभ आहे. पूर्ण स्वातंत्र्याची ही पहिली पायरी आहे. हिंदुस्थान व इंग्लंड यामध्ये तडजोड झाली हे पाहून मला आनंद झाला आहे."

## एकला चलो रे

थोड्याच दिवसात भारतात ठिकठिकाणी जातीय दंगली झाल्या. पूर्व बंगालमधील नवाखली येथे मुसलमानानी अनेक हिंदूंची कत्तल केली. त्यांची घरेदारे लुटली. त्यामुळे इतरत्रही जातीय दंगली झाल्या. राज्याच्या सूर्योदयाच्यावेळीच या अशुभ घटना घडाव्यात याचे म. गांधींना फारच वाईट वाटले. ते म्हणाले, "ही माझ्या अहिंसेच्या परीक्षेची वेळ आहे. नवाखलीत मला गेलेच पाहिजे. तेथे कदाचित मला मृत्यूही येईल पण मला पराभव नको आहे. अत्याचार करणाऱ्या मुसलमानाना मी भेटणार

आहे. त्यांची समजूत घालणार आहे. क्षमा हे शूराचे भूषण आहे. ७६।७७ वर्षांचे म. गांधी नवाखलीत गेलेच. तेथे ते १८ तासावर काम करीत. ही कृश मूर्ती हाती काठी घेऊन दंगलग्रस्त भागांत एकटी फिरत होती. ते रोज पहाटे चार पासून रात्री ८-३० पर्यंत काम करीत. भारताचा हा पुढारी सकाळपासून रात्रीपर्यंत दंगलग्रस्त भागात अविरत फिरत होता. या वयातील या श्रेष्ठ तपस्व्याचे हे काम पाहून असंख्य व्यक्तींच्या मनांत त्यांचेबद्दल प्रेमादर निर्माण झाला-मुसलमानांची मने त्यांनी जिंकली. त्यांची ही धोक्याची स्नेह यात्रा अखेरीस यशस्वी झाली. 'आपण प्रवासी आहोत. व स्वतःची मेलेल्यांत गणना करा' हे महंमद पैगंबरांचे अर्थपूर्ण वचन म. गांधींनी या प्रसंगी आपल्या डोळ्यापुढे ठेवले होते. "अल्पसंख्य असलेल्या जमातीस त्या भूमीतून हाकलणे हे कदापीही योग्य नाहीं" असे महात्माजींनी नवाखलीत मुसलमानाना सांगितले.

बिहारमध्ये दंगली उसळल्या होत्या तिकडे म. गांधी गेले व शांतता प्रस्थापनेचे बिकट काम करु लागले. म. गांधी व बॅ. जीना यांनी शांततेबद्दल संयुक्त पत्रक काढले.

नवाखलीतील पदयात्रेत त्यांनी द्वेषाऐवजी प्रेम व रागाऐवजी संयम याची शिकवण दिली. ते ४७ खेडयांतून गेले. अनवाणी ११६ मैल चालले. त्यांनी हिंदूचे अश्रू सहानुभूतीने पुसले व मुसलमानाना शांततेचा संदेश दिला. भारतातील जनतेच्या हे लक्षांत आले की म. गांधींचे समाजावर निरतिशय प्रेम आहे व त्यासाठी सर्वस्वाचे बलिदान करण्यासही ते तयार आहेत. नवाखलीत पदयात्रेत म. गांधी अंधारांतून चालले होते. त्यांना लोकांचे अश्रू पुसायचे होते. हिंदूंना निर्भयतेचा व मुसलमांनाना प्रेमाचा संदेश ते देत होते. या यात्रेत ते एकाकी होते. त्यांचा मार्ग कष्टाचा, त्रासाचा

व धोक्याचा होता. त्यांची ही कृश मूर्ती त्या भयंकर संकटातून एकटी चाललेली पाहून गुरुदेव टागोरांच्या 'एकला चालो रे' या वचनाची सर्वांना आठवण होत होती.

१५ ऑगस्ट १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला. सर्वत्र आनंदोत्सव साजरा होत होता. पण म. गांधींनी कलकत्त्यास उपवास केला व सर्व दिवस शांतपणे सूतकताईत घालविला. रात्री गीतेचे अध्ययन केले.

म. गांधी नंतर दिल्लीस आले. हिंदू निर्वासितांचे लोंढे तेथे येऊन धडकत होते. गाड्या भरभरून येत होत्या. त्या लोकांच्या दुर्दैवी व भीषण कहाण्या ऐकून हिंदू अतिशय संतापले. तरीही म. गांधींनी त्यांना शांत राहाण्याचा आदेश दिला. त्यावेळी हिंदूना वाटले की म. गांधी हे मुसलमानांचे पक्षपाती आहेत. भारतातही प्रतिक्रिया झाली. मुसलमानांवर अत्याचार केले. तेव्हा मुसलमानांना त्यांनी शांत राहाण्याचाच उपदेश केला. त्या प्रसंगी मुसलमानाना वाटले की काही झाले तरी म. गांधी हे अखेरीस हिंदूच. ते हिंदूंचीच बाजू घेणार.

म. गांधींनी रागालोभाची पर्वा केली नाही. हाती घेतलेले शांतता प्रस्थापनेचे कार्य ते अविरत करीतच राहिले. त्यांतच ३० जानेवारी १९४८ रोजी म. गांधी सायंप्रार्थनेसाठी बाहेर येत असताना त्यांचेवर जवळून तीन गोळ्या झाडण्यात आल्या. आणि 'हे राम' हे शब्द उच्चारून या पुण्यात्म्याने जगाचा अखेरचा निरोप घेतला.

लक्षावधी भारतीयांना अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहून निर्भयपणे प्रतिकारास सिद्ध करणारा एक प्रभावी आवाज या क्षणीच लुप्त झाला.

## प्रश्न

**प्रश्न १ :** उत्तरे द्या

१) बांच्या बद्दल गांधीजींना काय वाटत होते? या बाबतीत त्यांनी वेव्हेल यांना काय कळवले?

२) नवाखालीत म. गांधींनी शांतता प्रस्थापनेचे कार्य कसे केले? तेथे त्यांनी कोणता संदेश दिला?

३) स्वातंत्र्य-दिन म. गांधींनी कोठे व कसा साजरा केला?

४) म. गांधींचा शेवट कसा झाला?

**प्रश्न २ :** कारणे द्या.

१) म. गांधींनी स्वातंत्र्य दिनी उपवास केला.

२) म. गांधी बिहारमध्ये गेले.

३) 'एकला चालो रे' हे रवींद्रांचे शब्द म. गांधींना अनुरूप ठरतात.

४) 'करा किंवा मरा' हे शब्द बांच्या हृदयावर कोरलेले होते.

५) बा आणि महादेव अमर झाले.

प्रकरण तेरावे

# असे स्मरूया गांधीजी

३० जानेवारी १९४८ चा दिवस उजाडला. बापूजी नेहमीप्रमाणे आपला दिनक्रम पार पाडत होते. दुपारी चार वाजता सरदार पटेल हे त्यांना भेटण्यासाठी गेले. दोघांच्या मोकळेपणाने गप्पागोष्टी झाल्या. पांच वाजले. प्रार्थनेची वेळ झाली. गांधीजी खोलीतून बाहेर पडले. नातीच्या खांद्यावर हात टाकून ते प्रार्थनास्थानाकडे जाऊ लागले. प्रार्थनेसाठी पुष्कळ. लोक बाहेर जमले होते. त्यांना नमस्कार करण्यासाठी म्हणून गांधीजींनी नातीच्या खांद्यावरील हात काढले. इतक्यांत नथुराम गोडसे गर्दीतून वाट काढीत पुढे आला. गांधीजींच्या समोर येऊन त्याने त्यांचेवर एकापाठोपाठ एक अशा तीन गोळ्या झाडल्या. पुढे जाण्यासाठी उचललेले पाऊल तेथेच राहिले. नमस्कारासाठी वर केलेले हात गळून खाली पडले. अंगातला त्राण गेला.

आणि 'हे राम' हे अखेरचे शब्द त्यांच्या मुखातून बाहेर पडले आणि ते कोसळून खाली पडले!!

आत्मा परमात्म्यांत एकरूप झाला. अखेरच्या क्षणीही गांधीजींच्या तोंडून 'हे राम' असेच शब्द बाहेर आले!

पूर्वी एकदा गांधीजींना त्यांच्या एका निकटच्या शिष्याने विचारले होते की "गांधीजी तुम्ही योगी आहात काय?" प्रथम त्यांनी उत्तर देण्याचे टाळले पण शिष्याने प्रश्नाचा पाठपुरावा केला. अखेरीस ते म्हणाले, माझ्यावर जर कोणी गोळ्या झाडल्या व त्याने मरण येत असता मी 'अग आई' असे म्हणालो तर मी सामान्य माणूस. पण माझ्या तोंडून 'हे राम' असे उद्गार बाहेर पडले तर मी योगी असे तू समज." गांधीजींच्या त्या शिष्याला गांधीजींच्या अखेरच्या उद्गारावरून ते योगी होते हे लक्षात येईल. पण भारतीय जनता जेव्हा त्यांच्या दैदीप्यमान जीवनाकडे आज पहाते तेव्हा त्यांना 'गांधीजी एक महान् योगी' असे म्हणावे असे वाटते.

जन्मापासून अंतापर्यंतच्या गांधीजींच्या जीवनचित्रपटाकडे जरा अभ्यासू दृष्टीने पाहिले तर सहज लक्षात येते की या महान नेत्याने देशबांधवांसाठी केवढा मोठा त्याग केला आहे.

प्रथम मातापित्याची अनन्यभावाने त्यांनी सेवा शुश्रुषा केली. या सेवेत गांधींना जणू स्वर्गसुख मिळत होते. आई वडिलांचेवरील त्यांचे नितांत प्रेम, अढळ श्रद्धा, अपरंपार आदर पाहून वाटते की प्राचीन काळचा श्रावणच परत अवतरला आहे कीं काय?

## सत्यव्रत गांधी

गांधीजींनी जीवनात सत्यव्रताचे अगदी कठोरपणे पालन केले.

या सत्यवक्तेपणामुळे त्यांना अनेक बिकट प्रसंगाना तोंड द्यावे लागले. त्यांच्या जिवावर बेतण्याचे प्रसंग आले. पण म. गांधी कधी डगमगले नाहीत. सत्याचा त्यानी अहर्निश पाठपुरावा केला. सत्यव्रत अंगिकारणे ही सोपी गोष्ट नाही. ते एक असिधारा व्रतच आहे. पण गांधीजींनी एकदा निश्चय केला आणि तो अंतापर्यंत अविचल पाळला. सत्यवचनासाठी केवढे धैर्य पाहिजे ! ! सत्यावर केवढी श्रद्धा पाहिजे ! ' स्वप्नांत दिलेले वचन खरे करु पाहाणाऱ्या हरिश्चंद्राचे गांधीजी सच्चे अनुयायीच शोभतात '

## अहिंसक गांधी

गांधीजींनी अहिंसेचे पालन केले. ही त्यांची अहिंसा म्हणजे भित्रेपणा नव्हे, दुबळेपणा नव्हे. अहिंसा माणसाला निर्भय बनवते. त्या व्यक्तींच्या अंगात एक वेगळे बळ निर्माण करते. अहिंसा हा मार्ग खऱ्या शूरालाच आचरता येईल. जोपर्यंत आपल्या अंगावर कोणी हात टाकीत नाही तोपर्यंत अहिंसेचे पालन कोणीहि करील पण आपल्यावर हात उगारल्यावरही न डरता न दुःख करता मार सहन करणे मुळीच सोपे नाही. आफ्रिकेत गांधीजींच्या डोक्यावर सोट्याचा तडाखा ज्या पठाणाने मारला त्याचा थोडातरी प्रतिकार गांधीजीना करता आला असता. नंतरही त्याला अद्दल घडविता आली असती. पण गांधीजींनी यातील काहीच केले नाही. उलट तो पठाण निर्दोषी असल्याचे सांगितले. केवढे हे मनोधैर्य. पण तोच पठाण पुढे क्षमा मागून गांधीजींचा अनुयायी बनला. अहिंसेने घडवून आणलेली ही मनःक्रांती स्पृहणीय नाही काय ?

गौतम बुद्धाने अहिंसेचे पालन केले. त्याच व्रताची गांधीजीनी पूजा केली. अहिंसेने गांधीजींचे आत्मिक सामर्थ्य सहस्रपटीने वाढविले. दुबळ्या

देहात प्रचंड शक्ति निर्माण केली. बुद्धानंतर अहिंसेचा पुजारी गांधीजीं-शिवाय दुसरा कोणी झालाच नाही.

म. गांधी अतिशय शूर होते. धैर्यशाली होते. त्यांच्यावर गंभीर संकटे कोसळत होती पण दृढ निश्चयापासून ते रतिभर ढळले नाहीत. जो विचार मांडला तो प्रत्यक्षांत उतरविण्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. या प्रयत्नांत आलेले व्यत्यय त्यांनी धैर्याने दूर केले. मोहाचे प्रसंग असोत वा जिवावर बेतण्याचे प्रसंग असोत गांधीजींनी दोन्हीही प्रकारच्या प्रसंगांना असामान्य धैर्याने तोंड दिले ! ! धैर्याचे ते मेरूमणी होते. ‘ कैक संकटांच्या राशी शिरी कोसळोत कदर करायची नाही ’ हाच मुळी गांधीजींचा बाणा होता.

एखादे कार्य गांधिजींनी आपल्या हाती घेतले म्हणजे मग चिकाटीने ते कार्य पूर्ण करीत. आपल्या सर्व शक्ती पणाला लावीत. प्रचार करून रान उठवीत. सतत अभ्यास करून प्रयत्न करून ‘ शेंडी तुटो वा पारंबी तुटो ’ अशा चिकाटीने ते कार्य करीत. मध्येच त्यांना कोणी रोखू शकत नसे ! प्राण पणाला लावलेल्या व चिकाटीने कार्य तडीस नेण्याचा दृढ संकल्प केलेल्या म. गांधीना परावृत्त करण्याचे सामर्थ्य होतेच मुळी कोणात ? द. आफ्रिकेतील हिंदी जनतेवरील जुलूम म. गांधीनी पाहिले, तेव्हापासून त्यांच्या अन्यायाविरुद्ध झगडयास प्रारंभ झाला. हजारो पौंडाची चलती प्रॅक्टिस सोडून गांधीजींनी अन्याय निवारणाचे कार्य हाती घेतले ! सार्वजनिक जीवनक्रमास येथून सुरूवात झाली. मग गांधीजीनी हातचे असे काही राखलेच नाही. त्यांचे जे काही म्हणून होते ते सर्व देशाचे झाले. प्रथम पैशावर पाणी सोडले मग कपडयावर गदा आली. गरीब शेतकरी हा भारताचा खरा प्रतिनिधी आहे तेव्हा आपणहि तसेच असावे या विचाराने त्यांनी आपला पोशाखहि बदलला सारे जीवन त्यानी देशकार्यासाठी समर्पित केले !

## त्यागी गांधी

गांधीजींनी साबरमतीला आश्रम काढला. त्या आश्रमाजवळ एक दधीचीचे मंदीर होते. प्राचीन काळी असुरनाशासाठी दधीचीने इंद्राला आपल्या अस्थि दिल्या. त्या साठी त्याने हसत मरण स्वीकारले. त्या अस्थीचे वज्र बनवले व त्या वज्राचे शक्तीवरच देवांनी दानवांच्यावर विजय मिळविला. म. गांधीजींनीहि तेच केले! म्हणून गांधीजींना दधीचीची उपमा सार्थच ठरते.

## साधी राहाणी

गांधीजींची राहाणी किती साधी. डॉ. राजेंद्रप्रसादांच्या घरी पाटण्यास जेव्हा प्रथम ते गेले तेव्हा त्यांचा पोषाख पाहून त्यांच्या नोकराला वाटले कोणी शेतकरी आला असेल भेटायला! म्हणून त्यांनी गांधीजींना बाहेर-च्या, व्हरांडयात बसविले. साधी राहाणी आणि उच्च विचारसरणी हे बोल गांधीजींच्या बाबतीत अगदी सत्य ठरतात. भारतीय जनता गरीब म्हणून त्यांनी हसतमुखाने गरीबी पत्करली. त्यांचे जेवणही साधे असे. कृत्रीम बडेजाव गांधीजींना मान्य नव्हता. कोणतेही काम करण्यास गांधीजींना कधी संकोच वाटला नाही. गांधीजींचे रहाणे साधे तसेच बोलणेही साधेच पण अतिशय प्रभावी असे.

गांधीजींच्या ७८ व्या वाढदिवशी नभोवाणीवरून भाषण करताना सरोजिनी नायडू म्हणाल्या—

"पहिल्या महायुद्धानंतर मी गांधीना प्रथम लंडनमध्ये पाहिले त्यावेळी द. आफ्रिकेत जनरल स्मटसूवर विजय मिळवून ते आले होते. बुद्ध, येशू, ख्रिस्त, महंमद अशी थोर माणसे या जगांत पूर्वी होऊन गेली आहेत.

आज आपणात गांधीजी प्रत्यक्ष वावरत आहेत. दिसण्यात ते किती लहान! किती कृश! जगाच्या व्यवहाराचे दृष्टीने त्याना महत्व नाही. त्यांच्या मालकीची अशी त्यांच्या जवळ कपर्दिकहि नाहीं, असे असून ते जगातील सर्व बादशहांच्या पेक्षा थोर आहेत. हा अस्थिपंजर झालेला भग्नदंत, अर्धनग्न मनुष्य कोणत्याही शक्तीपुढे छातीठोकपणे उभा राहू शकतो. प्रत्यक्ष मृत्यूवरहि विजय मिळवू शकतो. असे हे अतिमानवी सामर्थ्य या माणसाच्या अंगी आले तरी कसे?

मोठमोठ्या धर्मसंस्थापकात असलेले गुण या माणसाच्या अंगी असल्यामुळे त्यांना हे सामर्थ्य प्राप्त झाले आहे. निराशेने दिङ्मूढ झालेल्या अंतःकरणात ते आशेचा फुलोरा निर्माण करू शकतात. भेकड, नामर्द माणसाना ते मर्द बनवू शकतात. अवनत झालेल्यांचा ते उद्धार करतात. आज सर्व जगाची नजर म. गांधीवर खिळून राहिली आहे!

त्यांच्याहून अधिक विद्वान आज अनेक आहेत, श्रीमंत आहेत, सत्ताधिकारी आहेत पण अतुलनीय धैर्य, दुर्दमनीय श्रद्धा आणि सर्वाठायी परमेश्वर पाहाण्याची वृत्ती या गुणात त्यांच्याशी तुलना तरी होऊ शकेल असा दुसरा कोण आहे?

चमत्काराचे युग संपले आहे असे कोण म्हणतो? या माणसाच्या रुपाने प्रत्यक्ष चमत्कार आपल्यात वावरत आहे. ते माझे पुढारी आहेत. मित्र आहेत, पिताश्रीही आहेत. आजच्या त्यांच्या ७८ व्या वाढदिवशी त्यांना शतशः प्रणाम!"

## लढ्याची साधने—

म. गांधीनी आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जनतेत एक शक्तीच निर्माण केली. सैन्याशिवाय, शस्त्राशिवाय स्वातंत्र्यासाठी

लढा करता येतो ही कल्पनाच महात्माजींच्यापूर्वी अस्तित्वात नव्हती. गांधीजींची दांडीयात्रा, त्यांची असहकारितेची चळवळ, चंपारण्य व इतर ठिकाणी झालेले सत्याग्रह आणि त्यांची उपोषणे हीच महात्माजींच्या लढ्याची खरीखुरी साधने. ही साधने पवित्र राहावीत म्हणून गांधीजी कोण काळजी घेत. या साधनातील सामर्थ्य लक्षावधी सैन्याच्या सामर्थ्यापेक्षा अधिक होते. त्याचा वेग बंदुकीच्या गोळीपेक्षा जास्त होता. प्रतिपक्षावर त्याचा अचूक परिणाम होई. या साधन-निर्मितीत गांधीजींची श्रेष्ठ कल्पकता अनुभवास येते. ती साधने त्यांनी कोठे व कशी वापरली हे पाहून त्यांचे बुद्धिचातुर्य जाणवते. ही साधने उपयोगात आणताना ते जणू आपला पाय जळत्या निखाऱ्यावर ठेवीत असत. आत्मक्लेशाचे भयंकर दिव्य ते सहज पार पाडीत. स्वातंत्र्याच्या लढ्यात आता सैन्यदलांची जरूरी नव्हती. पूर्वी लोकांनी किल्ले लढवले, गावे जिंकली, कत्तलींनी शत्रूवर मात केली. गांधीजींनी लढविले मीठ ! केला सविनय कायदेभंग ! यातून स्वातंत्र्याच्या लढ्याचे पाऊल पुढेपुढेच पडू लागले. आपण या मातीचे मालक ही श्रेष्ठतम व पवित्र भावना या लढ्यांच्या द्वारे गांधीजींनी जनतेच्या हृदयात निर्माण केली. याच मंगल भावनेतून स्वतंत्र भारत निर्माण केला.

म. गांधींच्या नेतृत्वाखाली भारताने ब्रिटिश साम्राज्यशाही विरुद्ध निकराचा पण निःशस्त्र लढा दिला. शस्त्राविना लढाई जिंकली. ब्रिटिश सत्तेशी हा सामना देत असतानाच या देशांत एक नैतिक सामर्थ्य निर्माण झाले. त्याचा परिणाम म्हणजे जगाचे लक्ष भारताकडे वेधले. काही देशांनी तर भारतीयांच्या या आगळ्या प्रतिकार पद्धतीबद्दल कौतुकच केले. या सर्व अद्भुतरम्य भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास म्हणजेच म. गांधींच्या जीवनाचा इतिहास. म्हणूनच प्रेमादराने व कृतज्ञताबुद्धीने आम्ही

भारतीय म. गांधींना ‘ राष्ट्रपिता ’ या शब्दांनी गौरवितो.

म. गांधी हे भारताचे राजकीय नेते होते. त्यांनीं आपली विविध स्वरूपाची विचारसरणी व कार्यपद्धती भारतीय अध्यात्माच्या सुस्थिर बैठकीवर उभारली होती. त्यांच्या कार्यामागे नीतीचे भक्कम बळ होते. पण त्यांचे कार्य हे केवळ भारतीय जनतेपुरते मर्यादित नव्हते. प्रत्येक व्यक्तीच्या अंतःकरणातील ‘ मानवतेस ’ त्यांनी आवाहन केले. त्या दृष्टीने म. गांधी सर्व जगाचें नेते ठरले. ते मानवतेचे पुजारी होते. सत्याचा अत्यंत कठीण पण अंती श्रेयस्कर पंथ त्यांनी अनुसरला. न्यायासाठी प्राण पणाला लावला. जुलमाचा नाश व्हावा म्हणून आत्मक्लेश सहन केले. आपसातील वैर जिथे विकोपास जात होते तेथे त्यानी स्नेहाचे, मैत्रीचे वातावरण निर्माण करण्यासाठी ‘ पदयात्रा ’ काढल्या. त्यांचे निर्भय हास्य तोफांच्या विकट गडगडाटापेक्षा प्रभावी ठरले. इतकेच नव्हे तर त्यांची स्मितें चैतन्य फुले ठरली ! द्वेष आणि मत्सर याने कुंद व विषारी बनलेल्या वातावरणात ‘ सर्वा भूती प्रेमाच्या ’ आचरणातून गांधीजींनी इष्ट तो बदल घडवून आणला.

म. गांधीजींना लोकमान्यांसारखी अलौकिक बुद्धिमत्ता लाभली नव्हती. बालपणात तर एक सामान्य संकोची, भित्रा असाच त्यांचा स्वभाव होता. शाळेतील अक्षर खराब असणारा व इतरही पुष्कळ चुका करणारा एक सामान्य विद्यार्थी. असा हा तुमच्या आमच्यातील एक सर्वसाधारण मुलगा जगातील असामान्य पुढारी होतो हे पाहिल्यावर त्यांच्या जीवनापासून स्फूर्ति, धैर्य घेऊन तसे बनण्याचा प्रयत्न करणे सामान्यालाही अशक्य नाही.

म. गांधींचे जीवन म्हणजे अंतरबाह्य युद्ध. मनोभूमीतील दोषांची तणे नाहीशी करण्यासाठी त्यानी स्वतःशी युद्ध-पातळीवर झगडा दिला. बाहेर

जुलुमाशी अन्यायाशी त्यांनी घनघोर लढाई केली. पण ही लढाई होती निःशस्त्र !

म. गांधी यांची स्वातंत्र्यप्रीती प्रखर होती. त्यांचे सर्वसमन्वयाचे धोरण उत्कट होते. शुद्ध चारित्र्याबद्दल त्यांचा आग्रह स्पृहणीय होता. ते मानवतावादी होते. जीवनाबद्दलची त्यांची दृष्टी उदात्त होती.

म. गांधींनी सामान्य लोकांतून असामान्य त्याग करणारे असंख्य देशभक्त निर्माण केले. पारतंत्र्याच्या बेड्या तोडल्याच पाहिजे, अन्यायाचा साऱ्या शक्तीनिशी प्रतिकार केलाच पाहिजे या विचारांनी भारलेल्या प्रचंड लोकांची जबर संघटना त्यांनी उभी केली.

श्रीरामकृष्ण परमहंस यांच्याबद्दल म. गांधींच्या मनात नितांत आदर होता. रामकृष्णाच्या एका चरित्राला म. गांधींनी छोटीशी प्रस्तावना लिहिली. त्यात म. गांधी म्हणतात, 'रामकृष्ण परमहंस यांचे चरित्र म्हणजे सत्याचे मूर्तिमंत प्रतीकच, या वाक्याशी म. गांधीही एकनिष्ठ राहिलेले दिसतात. म. गांधींना समाजातील अनेक दोष दिसत होते! ते दोष घालविण्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. जिवाचा आटापिटा केला. प्रसंगी समाजाचा विरोध सहन केला. पण दोष दाखवून ते नष्ट करण्याचे आपले यत्न अव्याहत चालूच ठेवले.

म. गांधीजींच्या भव्य पुतळ्यास सुगंधित पुष्पांचा भारी हार घालून त्यांचे खरे स्मरण होणार नाही. 'म. गांधीकी जय' या जयघोषानेही त्यांचा आत्मा संतुष्ट होणार नाही. केवळ त्यांचे बाह्यानुकरण करून त्यांचेबद्दल योग्य आदर प्रगट होणार नाही. रस्त्याला नाव देणे, तिकिटे काढणे हे सारे बाह्य उपचार झाले! म. गांधी शताब्दी निमित्त पोष्टाचे खास तिकिट काढले व ते खान अब्दुल गफारखान यांना जेव्हा दाखविले तेव्हा बादशहा खान म्हणाले, " नुसती त्यांच्या छायाचित्राची तिकिटे कसली काढता?

त्यांची शिकवण प्रत्यक्ष आचरणात आणा की!" त्यांचे स्मरण करीत असताना आपण त्यांच्या शिकवणुकीप्रमाणे वागले पाहिजे. शील, चारित्र्य, सत्य, सत्व यांची काळजीपूर्वक जोपासना केली पाहिजे. म. गांधीनी आपणास निर्भय बनण्यास सांगितले आहे. सत्याचा आग्रह आपण सदोदित धरला पाहिजे, आणि त्यांना वाटणारी सर्वांबद्दलची आत्मीयता प्रत्यक्षात आणली पाहिजे.

**प्रश्न १ :** खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

१) गांधी 'महात्मा' होते हे कशावरून ?

२) गांधीजीना दधीचीची उपमा का देतात ?

३) जनरल स्मट्स गांधीजीबद्दल काय म्हणाले ?

४) महात्मा गांधींना राष्ट्रपिता का म्हणतात ?

**प्रश्न २ :** विरोधी अर्थाचे शब्द द्या.

एकरूप, सत्यव्रत, बिकट, दुबळा, अहिंसा, धैर्यशाली

**प्रश्न ३ :** टीपा लिहा. कोणत्याही दोन

१) महात्माजींची अहिंसा

२) गांधींची साधी राहाणी

३) गांधींचा त्याग

**प्रश्न ४ :** या प्रकरणातील विशेषणे ओळखा व त्यांचा वाक्यात उपयोग करा.

**प्रश्न ५ :** म. गांधींच्या लढ्याची साधने कोणती होती ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. वाचनालय शाखा.
अनुक्रम ६०८४६ वि. ७१.७१.
क्रमांक ३४९६ नोंद दि. १८।११।८९

म. गांधी, जवाहरलाल नेहरू, खान अब्दुल गफारखान, सरदार पटेल
व मौलाना आझाद



म. गांधी व पं. जवाहरलाल नेहरू



IRBK-0112737
IRBK-0112737

१९४२ च्या 'चले जाव'च्या चळवळीवर गंभीरपणे चर्चा करीत आहेत.